वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. 5 AKOLA:—SATURDAY EVENING— SEPTEMBER 3. 1870 NO 36

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख ३ माहे सप्तंबर सन १८७० इ०. अंक ३६

पाहिजेत.

इंग्लिश व मराठी कामांत हुशार असा एक कंपाझिटर (खिळे जुळणारा) पाहिजे. पगार वीस पंचवीस पावेतों योग्यत पाहून मिळेल. तसाच शिळापेसाकरितां एक लेखक पाहिजे, त्यास पगार बारा पंधरा रुपये पर्यंत मिळेल.

लांच.

सरकारी कामदार पगाराशिवाय लोकांपासून गुप्त रितीनें जे पैसे अगर वस्तु घेतात त्यास लांच म्हणतात. लांच खाण्याविषयीं सरकारचा प्रतिबंध आहे, कायद्यामध्यें लांच खाणारांस मोठी शिक्षा सांगितलेली आहे, व कायद्याचें अवलोकन रयते पक्षां कामदारांस विशेष असतें, तरी बहुत कामदार लांच खातात. कामदारांस पगार थोडा असल्या कारणानें त्यांची लांचाकडे प्रवृत्ति होत असेल असें सरकारास वाटून त्यानीं कित्येक कामदारांचे पगार वाढविले परंतु त्यामुळें लांच खाणें कोठें कांहीं कमी झालें असेल असें आम्हांस वाटत नाहीं. कदाचित आपणास पगार मोठा झाला तेव्हां आतां लांच थोडा काय खावा म्हणून त्यांनीं लांचाचे दरही त्याप्रमाणें वाढविले असतील असा संभव आहे. कामदार लोकांनीं शहाणपणाची विशेष तोड लांचाची गुप्तता राखण्यांत लढविलेली आढळते. त्यामुळें लांचाच्या गोष्टी फारशा बाहेर येत नाहींत. कदाचित अतिशय झाला तरच बाहेर येतात. बेताबातानें लांच खाणारे हजारो असावेत पण लोकांत त्यांचा बोभाटा विलकुल नाहीं, एवढेच नव्हे, यांतून कित्येकांस लोक म्हणत असतात कीं अमके कामदार ना! यांस लांच म्हणजे शिवनिर्माल्य. ते पैसा खात नाहीं म्हणून गंगेंत उभे राहून शपथ घेतील. अशा प्रकारें बातबेतानें लांच खाणाराचें बाह्यलक्षण असतें व उथळ बुद्धीचा लांच खाणारा समयाविशेषीं फसला जातो. लोक कार्यार्थी असतात यांस कामदार बुभुक्षित दिसला म्हणजे त्यास वश करण्याची गरज असतेच. उदाहरण पहा कीं कुत्र्याचे तोंडावर भाकरीचा तुकडा फेकला म्हणजे तो भोंकणार नाहीं व चावणार नाहीं अशा समजुतीनें आर्त लोक कामदारांस लांच देतात. धर्म बुद्धीनें म्हणून देत नाहींत. तर समजुतदार घेणारांनीं ती का घ्यावी? विस्तव हातावर दिल्यावर कोणी घेतील काय? चोरानें एकादे शिरस्तेदारास, मुनसफास किंवा मामलेदारास म्हटलें कीं अमके सावकाराचे दुकानीं कुलपांत ठेवलेलें बहुत द्रव्य आहे. चला आमचे बरोबर, आम्हीं तुम्हांस पाचशें रुपये देतों, तर ते या चोराची साथ करतील काय? नाहीं. करणार नाहींत. आणि त्या चोरावर फिर्याद झाली व तो तुरुंगांत जात असला आणि इतक्यांत जो दोनशें रुपये देऊन यानें मूठ दाबली म्हणजे त्याचा गुन्हा शाबिद नाहीं, पुरावा बरोबर नाहीं वगैरे कांहीं सबबी दाखवून यास सोडून देतील व लांचाचे रुपये पशाखालीं उतरतील. हें चोराची साथ करणेंच नव्हे काय? आम्हांस वाटतें कीं चोरावर मोर म्हणतात तसा कामदारांचा हा चोरावर दरवडा आहे. कामदारास सरकारांतून मोठाले पगार असतात मग त्यांनीं दिवसां दरवळ्या हें उमाजी नाईकाचें कृत्य कां करावें? न्याय निवडण्यासाठीं त्यास नेमलें असतां ते लांच खाऊन अन्याय करितात या बद्दल परमेश्वराकडे त्यांस जबाब द्यावा लागेल व त्याबद्दल घोर शासन मिळेल. याची दहशत घेऊन पश्चात्तापी होऊन ईश्वरा जवळ क्षमा मागितली व निर्दोष बागणूक पुढें ठेविली तर अजून गोष्ट सुधारण्या जोगी आहे. मोठा चमत्कार हा कीं लोकांच्या माना मुरगाळून दोषी व्हावें आणि देवघरांत भस्माचे टिळे पट्टे लावून व माळांचीं पेंडकीं गळ्यात घालून देवांवर तुळशी फुलांच्या परड्या झोकाव्या. अशानें देव संतुष्ट होईल काय? दोषदूरीकरणार्थ देवासही हा लांच देतो काय? छीः छीः देव असा पापी नाहीं व त्याजवळ अशीं ढोंगें खपणार नाहींत. लोकांचे डोळ्यांत माती टाकून आपण चांगलें म्हणविण्या करितां हा सर्व दांभिकपणा आहे.

कोणा कोणा कामदारांस वाटत असेल कीं आपण मुख्य न्यायाधीश नाहीं तेव्हां अंतर हुकुम सांगण्याचें काम आपणाकडे नाहीं मग आपण लांच खाल्ल्यानें अन्याय होण्याचा संभव नाहीं, तेव्हां अर्थात आपण दोषी नाहीं. पण ती समजूत खोटी आहे. लांच खाल्ल्यानें मनुष्य मिंधे व पक्षपाती होतें तेव्हां तें आपलें काम बरोबर करित नाहीं, अधिकाऱ्यास सहाय बरोबर करित नाहीं, व चोरीदाखल उगीच पैसा खातें असे तीन दोष याकडून घडतात.

लांच खाण्याचे प्रकार बहुत आहेत ते सर्व सांगण्यास स्थलावकाश नाहीं. कोणास वाटतें प्रत्येक कामांत थोडा तरी लांच घ्यावा हें चांगलें नाहीं, तशानें बोभाटा होतो, सबब महिन्याच्या काठीं एक दोन गोठींशीं घबाडें साधावीं म्हणजे पुरे. कोणास वाटते कीं, मुकद्दम्यांतील लोकांशीं प्रत्यक्ष गाठ नसावी, चांगलासा मध्यस्थ पाहून त्याच्या वकिलानें पैसे खावे म्हणजे बरें. कोणास वाटतें तिसरा मनुष्य मध्यें नको, ही गुप्त गोष्ट षट्कर्णीं जितकी न होईल तितकी चांगली. कोणास वाटतें रोकड पैसे घेतले म्हणजे बरे, तशानें कदाचित वक्त गुदरून झाडाझडतीवर आल्यास मुद्देमाल मिळणार नाहीं. कोणास वाटतें कीं, बायकोला सोन्यामोत्याचे दागिने पाहिजेत, आपल्याला चांदीचीं भांडीं पाहिजेत, आणि तीं विकत घेण्याचा पसारा मांडला तर उगाच बोभाटा होईल ते व्हां ज्याचें काम करून द्यावें त्याकडूनच एकेक जिन्नस मिळवावा हें बरें. कोणाला वाटतें, लांच खाऊन अन्याय करणें पाप आहे सबब आपल्या हिमायतीनें काम करून द्यावें व दुसरे कोणे वेळीं त्यापासून पैसे घ्यावे. कोणास वाटतें बागणूक साधी ठेवावी. पागोटें लहान घालावें, म्हणजे लाचाचा बोभाटा होत नाहीं. कोणी खरोखरी लांच खात नाहींत, पण सुगीचे दिवस आले म्हणजे म्हणावें कीं, अमुक देशमुख, तुम्ही दोन खंडी गहू पाठवा, अमुक देशपांडे, आपण पांच हजार कडबा द्या, अमुक पाटील, तुमच्याकडील एक दुभती हैस द्या. काय करावें? एथील बाजारांत तुप्पट पैसे देऊनही बक्तशीर चांगला जिन्नस मिळत नाहीं. तेव्हां आपण एवढी मेहेरबानी करावी. मग ते लोक गावांत धमधूम करून कामदारांस व स्वतांसही अर्धे मोलानें किंवा चौथाई मोलानें जिन्नस मिळावितात, आणि भरदामाच्या पावत्या होतात. कोणी बिगारी फुकट काढितात, कोणी दुसऱ्याची मनुष्यें व जनावरें वगैरे फुकट राबवितात, कोणी लांच न खाण्याविषयीं नेम धरितात, पण भानीपाला, केळीं, तूप, पानपत्रावळ घेतली असतां ती लाचाच वर्गांत येत नाहीं म्हणतात. असे अनेक प्रकार आहेत. व ते सर्व अधिक उण्या अंशानें अनीतिचे व पापप्रवृत्तीचे आहेत सबब प्रत्येक मनुष्यानें त्याचा मोह टाळतां तेवढा टाळावा हें फार चांगलें आहे.

लांच वगैरे वाईट कामाबद्दल ईश्वराची शिक्षा मनुष्यास दृग्गोचर अशी ठरीव नाहीं म्हणून ईश्वराविषयीं व कामाच्या वाईट स्वरूपाविषयीं कधीं कधीं क्षणमात्र विचार झाला तरी मनुष्य द्रव्याच्या व दुष्ट मनोवृत्तीच्या पाशानें बद्ध होतसतां त्याविषयीं डोळेझाक करून आपल्या नीच वासना तृप्त करून घेतो, परंतु राजकीय शिक्षेची तरी त्यानें भीति मनांत बाळगावी हें योग्य आहे. गुन्हा उघाडीस आला नाहीं तोपर्यंत सर्व गमजा यथास्थित चालतात, आणि एकदां कां गुन्हा उघाडीस आला व अधिकाऱ्यांची इतराजी झाली म्हणजे कुत्ता न हाकलाय. प्रथम पोलिसाचे तावडींत सांपडून यमाजीभास्कराचे हपिसांत यातना कशा भोगाव्या त्याचा कित्ता वळवावा लागतो किंवा कृष्णमुख करून रुपावें लागतें; आणि शेवटीं सापडल्यास अलंकारविभूषित होऊन ज्ञानमठांत (तुरुंगांत) वास करावा लागतो. सबब शहाण्यानीं त्यापासून दूर राहावें हेंच सर्व गोष्टींचें सार आहे.

सदरीं आम्हीं हा इतका पाल्हाळिक व कठोर मजकूर लिहिला आहे तरी हा कोणा एका व्यक्तास अनुलक्षून लिहिला आहे, किंवा कोणाविषयींच्या द्वेषबुद्धीनें लिहिला आहे असें तिळमात्र समजूं नये. लिहिण्याची कठोरता कामदारास अनुलक्षून नाहीं, ती लांचरूपी दुर्व्यसनास अनुलक्षून आहे. लांच न खाणारेही बहुत कामदार आहेत व ते आपलीं कामें इमानें इतबारें करित असतां ही अदावतीनें किंवा मत्सरानें त्यांवर कोणी कधीं किटाळ आणितात असेंही आम्हांस ठाऊक आहे. म्हणून तसा कोठें प्रकार असेल तर त्यांसही अनुलक्षून हा लेख नाहीं. लांच खाणारांनीं ती दुष्ट खोड टाकावी, व सातारयास माधवराव गोविंद, बाळकोबा काका, खानदेशांत श्रीधर विठ्ठल, आपले वऱ्हाडांतच लक्ष्मणराव तात्या गरुड वगैरे कामदारांचे काय प्रकार झाले व बुलढाण्यास काय प्रकार चालला आहे तिकडे अवधान देण्याकरितां हें आमचें अनुसंधान आहे.

पिनल कोडास पुरवणी.

आकीकडे सिविल प्रोसिजर, क्रिमिनल प्रोसिजर, पिनलकोड इत्यादि आक्ट विस्तृत व फार विचारांचे झालेले आहेत तरी त्यांत अपूर्णता आढळतेच. हें इंग्लिश राज्यांतील न्यायतत्वाच्या शोधाचें लक्षण आहे असें म्हटलें पाहिजे. आतां अल्प स्वल्प पुरवण्या झाल्या तरी ते आक्ट रचणारांची योग्यता कांहीं कमी होत नाहीं. ते आक्ट न्याय व्यवहारास उत्तम शास्त्राधार असे आहेत. असो. क्रिमिनलप्रोसिजर आक्टास गुदस्तसालीं पुरवणी झाली आहे तशी या सालीं पिनलकोडास होण्याचा सुमार आहे.

गेले महिन्याचे १६ वे तारखेस आनरबल स्टिफेन साहेब हिंदु० मर ०च्या कायदे कौंसलचे मेंबर यांनीं इंडियन पिनलकोड दुरुस्त करण्याचे आक्टाचा मसुदा कौन्सलापुढें आणिला आहे व एक महिन्याचे आंत याविषयीं रिपोर्ट करण्याकरितां तो सिलेक्ट कमिटीकडे सोंपला आहे.

या नव्या आक्टाच्या मसुद्याचीं कलमें सोळा आहेत. तीं आम्हीं आपले वाचकांस पुढील अंकांतून कळवूं. आज त्यांचा गोषवारा सांगतों.

पहिलें कलमांत पिनलकोडचे तिसरें कलम दुरुस्त केलें आहे. दुसरे कलमांत मूळ ३४ व्या कलमाची दुरुस्ती आहे. तिसरे कलमांत चाळिसाव्या कलमाची व्याख्या अधिक केली आहे. चवथ्यांत ५६ वें कलम दुरुस्त केलें आहे. पाचव्यांत १२१ व्या कलमास पुरवणी व व्याख्या व समजुती जोडिल्या आहेत. सहाव्यांत १२४ वे कलमात पुरवणी व व्याख्या आहे. सातव्यांत १३१ वे कलमावर व्याख्या आहे. आठव्या कलमानें १९४ वे कलमांत कांहीं अधिक शब्द घातले आहेत. नवव्या कलमानें २२२वे कलमांत थोडा अधिक खुलासा केला आहे. दहाव्या कलमांत २२५ वे कलमास कांहीं नवा भाग जोडला आहे. अकराव्या कलमांत २९४ व्या कलमास पुरवणी आहे. बाराव्या कलमांत ३०७ वे कलमास कांहीं अधिक भाग जोडला आहे. तेराव्या कलमानें ३५० वे कलमांत कांहीं नव शब्द घातले आहेत. व व्याख्या दिली आहे. चवदाव्यांत ३०४ कलमास पुरवणी आहे. पंधरावे कलम, हा कायदा दुसरे विशेष व इलाख्याचे कायद्यास बाधक नाहीं, म्हणून आहे. व सोळावें कलम, सन १८४४ चा आक्ट ५ व सन १८६७ चा आक्ट ४ हे रद्द केल्याबद्दल आहे.

वऱ्हाडाकरितां मुनसिपल रूल.

(मागील अंकावरून पुढें चालू.)

१२ मुनसिपल कमिटीच्या सभा केव्हां व कोठें भरत जाव्या, त्याणीं कामें कशीं करावीं, त्यांच्या कामाच्या वाटण्या, कमिटी कडील नोकर व आफिसर यांचे पगार, नेमणुका, सस्पिंडी, व बरतर्फी इत्यादिकांविषयीं नियम करावयाचें काम सन १८६७ च्या १५ व्या ओक्टाच्यां १० व्या कलमा प्रमाणें मुनसिपल कमिटीकडेस आहे. कमिटीनें रूल करावे, व कमिशनर साहेबाच्या पसंतीनें ते कायम होण्याकरितां व रसिडेन्सी आर्डरमध्यें छापण्याकरितां रेसिडेंट साहेबाकडे पाठविले पाहिजेत. व मुनसिपल कमिटीच्या कचेरींत ते टांगून ठेवावे व शहरांत एक दोन प्रसिध्द जागीं लावावे. हे रूल तयार करण्याचे कामीं खालिल सूचना लक्षांत ठेवाव्या.

१ मुनसिपल कमिटीची प्रत्येक सभा सर्व लोकांस येण्यास खुली असावी व तींत निव्वार चालतील ते लिहून ठेवावे. सभेचे विव्वार लोकांस न कळाविण्याचें तसेंच विशेष कारण असेल तर तें कळाविलें पाहिजे.

२ स्पेशियल जनरल सभा भरण्याकरितां कमिटीपैकीं पांच किंवा अधिक मेंबर एकमताचे होऊन प्रेसिडेंटास कळविलीं तर त्यांनीं जनरल कमिटीकरितां एक सोईचा दिवस नेमावा. व प्रेसिडेंटास स्वतांच कधीं स्पेशियल जनरल सभा भरविण्याची अवश्यकता वाटेल तर ती भरविण्यास त्यांस अधिकार आहे.

३ निदान तीन तरी मेंबर हजर असल्याशिवाय कमिटीचें काम चालवूं नये.

४ मुनसिपल कमिटीमध्यें ज्या गोष्टी निघतील त्याविषयीं सर्व मेंबरांची संमती घेऊन जें बहुमत तो निर्णय ठरवावा. दोन मतें पडून दोन्ही मतांची संख्या सारखी झाल्यास प्रेसिडेंटाचे मताचें वजन आस्ती लगजून त्या मताचा निर्णय समजावा

५ जेथें होऊं शकेल तेथें प्रत्येक मुनसिपल कमिटीनें लोकांचें आरोग्य संरक्षणाचे व्यवहाराकरितां आणि शहराची स्वच्छता व सुधारणा यांकरितां एक सब कमिटी नेमीत जावी; तशीच हिशेबी कामाकरितांही एक सबकमिटी नेमीत जावी. तिचें मुख्य काम हें असावें कीं कोणत्या उपायानीं व कोणत्या मार्गांनीं खर्चाचीं कामें पुरीं पाडावयाचीं त्याचा तिनें रिपोर्ट करावा. व जे खर्च होतात त्यांचे हिशेब पहावे व तपासावे.

६ मुनसिपल कमिटीचीं कामें, होतील तितकीं, मेंबर लोकांस वाटून द्यावीं; नियमित काळच्या तपासणीचे रिपोर्ट त्यांनीं पाठवीत जावे, व लोकांस उपद्रव व पीडा नेणेंकरून होईल तें बंद करणें हें मुनसिपल कमिटीचें मुख्य व आवश्यक काम समजलें पाहिजे सबब त्यासंबंधी नियम योग्य प्रकारें अमलांत आणण्याकरितां शहरांत किंवा शहराचे भागाभागांत मेंबरांपैकीं कोणी, अगर इतर दुसरा गृहस्थ नेमणें माना.

१३ मुनसिपल कमिटीकरितां कायद्याचे अनुरोधानें दुसरे आठ कायदे पाहिजे आहेत त्यांकरितां बंगालच्या स्पानिटरी कमिशनरानीं तयार केलेले नियम आठ कायद्याचा मसुदा म्हणून पो लोनत दिले आहेत. आणखी अशी सूचना आहे कीं, वऱ्हाड प्रांतांतील मोठ मोठ्या शहरांतील मुनसिपल कमिटयांस होतील तितके हे आठ कायदे लागू करावे. म्हणजे त्यांचें त्यांचें साम्य राहील. आणि कांहीं ठिकाणीं कांहीं गोष्टी करितां कांहीं विशेष नियम करण्याचें अगत्य दिसेल तर ते ठरवून या नियमाला पुरवणी रूपानें जोडले जातील.

१४ मुनसिपल कमिटीस जेव्हां कांहीं कर बसवावयाचे असतील तेव्हां फर्स्ट व सिस्टंट रेसिडेंट यांचें पत्र नंबर २१४७ ता० २ माहे डिसेंबर सन १८६९ इसवीचें यांत रेसिडेंट साहेबांनीं जें कळविलें आहे त्याजवर नजर ठेवावी. त्यापलीकडे जे कर मंजुर झाले आहेत त्याबाहेर कोणताहीकर इलाख्याच्या सरकारचें सांगणें आणविल्या वाचून बसवूं नये.

१५ मुनसिपल कमिटीच्या सर्व प्रकारच्या कराचें जें उत्पन्न होईल तें रोजचे रोज जवळच्या सरकारी खजिन्यांत पाठवित जावें व त्यांतून खर्चाकरितां जी रकम घ्यावयाची ती सेक्रटरी व प्रेसिडेंट यांच्या सहीचे चेक देऊन घेत जावी. याविषयीं हिशेबाचे नमुने हिशेबी खात्याकडून वेळोवेळा मिळाले जातील. मुनसिपल फंड जें खजिन्यांत असेल त्याहून अधिक पैसा कोणत्याही सबबीनें मिळणार नाहीं.

१६ कमिशनर साहेबांनी आपल्या प्रांतांत जितक्या मुनसिपल कमेट्या असतील त्या सर्वांवर देखरेख ठेवित जावी परंतु कारणा शिवाय मुनसिपल कमिटी कीं कामें करील त्यांत हात घालूं नये. कमिटीचें प्रोसिडिंग वारंवारनें कमिशनर तपासतील आणि कायद्या प्रमाणें पैशाचा खर्च झाला आहे कीं नाहीं व नियमा प्रमाणें काम चाललें आहे कीं नाहीं हें पहातील. सरकारी खात्यावरचे मुख्य अमलदार इन्स्पेक्टर जनरल आफ पोलिस, डायरेक्टर आफ पब्लिक इनस्ट्रक्शन, इन्स्पे० जन० आफ डिस्पेन्सरी इत्यादिकांशीं पत्र व्यवहार प्रांताचे कमिशनराचे मार्फत चालावा.

हुकुमा वरून
डब्यु डनीडी, मेजर
आफीशि० फ० आसि०
रेसिडेंट.

पंढरपूर एथील अषाढीची यात्रा.
ज्ञानोदयाचे कर्ते यांस.

वि० वि०—या दक्षिणेंत पंढरपुराचें महात्म्य फार आहे हें प्रसिद्धच आहे. अज्ञान व भोळेपणा यांच्या योगानें लक्षावधि लोकांस पंढरीचें वेड लागलें आहे. ज्या ज्याच्या तोंडीं हेंच आहे कीं, पंढरपुरीं साक्षात बौद्धरूपी भगवान आहे." यावरून तेथें अषाढीस व कार्तिकीस मोठ्या टोलेंगा यात्रा भरत असतात. शिवाय पंढरपुराच्या आसमंतांतील बीस पंचवीस कोसांच्या आंतील हजारो लोक महिन्याची वारी करणारे आहेत आषाढी कार्तिकीच्या यात्रांस अष्टदिशांकडून समुद्राच्या भरतीप्रमाणें लोकांचे पूर लोटतात. कांहीं श्रीमान लोक खेरीज करून बाकीचे यात्रेकरी पायींच चालतात. गळ्यांत तुळशीच्या माळा, हातांत भगव्या पताका, व डोक्यावर वाटेच्या सामग्रीचें गाठोडें अशा पुरुष व स्त्रिया, तरुण वृद्ध यांच्या झुंडीच्या झुंडी एक, दीड किंवा दोन महिन्यांच्या वाटे वरून म्हणजे वऱ्हाड, नागपूर, गुजराथ, कोकण, तैलंगण, कानडा, मोंगलाई वगैरे यांच्या सभोंवतींच्या प्रांतांतून येतात. आगगाडी झाल्यानें तर यात्रेस जाण्याची मोठीच सोय झाली आहे.

यंदा यात्रा एक लक्षाच्या वर जमली होती. दरमनुष्यापासून चार आणे कर घेतात. आषाढ शुक्ल पंचमी १९ इसवीस दिला होता. यात्रेकऱ्यांस उतरण्यास जागा गोपाळपुऱ्यास दिली होती. तेथें त्यांच्या करितां दोन मोठाल्या धर्मशाळा व एक हास्पिटल नवीन बांधलें आहे. धर्मशाळा भरून जाऊन यात्रेकऱ्यांनीं राहुट्या व पालें इतकीं दिलीं होतीं कीं, तीं दुरून लष्करा च्या तळाप्रमाणें दिसत होतीं. तरी गावांत ही मुंग्यांच्या वारुळाप्रमाणें लोक गच्च भरले होते. सुखी लोकांनीं गावांतील लोकाच्या जागा भाड्यानें घेतल्या होत्या. व गरीब गुरीबें चार पांच धर्मशाळांत भरलीं होतीं. त्यांचे हाल पाहून आम्हास फार वाईट वाटलें.

रा० ब० विष्णु परशराम रानडे यांनीं एथें असतांना या यात्रेचा उत्कृष्ट बंदोबस्त ठेवला होता, म्हणून लोकांस मोठें सुख झालें आहे. यंदा असिस्टंट कलेक्टर साहेब व असिस्टंट पोलीस सुपरिंटेंडेंट यात्रेच्या बंदोबस्ताकरितां गेले होते. पाऊस विलक्ष वगैरेवरून वाला चालू होण्याचें भय होतें तरी बंदोबस्त इतका चांगला होता कीं, तसा कांहीं प्रकार दृष्टीस पडला नाहीं. जरी सर्व बंदोबस्त चांगला आहे तरी एका गोष्टीविषयीं मोठा त्रास आहे, म्हणजे शौचाकरितां जे चर खणले आहेत ते चहूंकडे गावाच्या अगदीं जवळ आहेत. त्यांची दुर्गंधी फारच चालती. त्याचा बंदोबस्त होईल तर बरें होईल.

पंढरपुरांत रात्रंदिवस ठिकाणोठिकाणीं लोकांचे मेळे जमून भजन करतात, त्या वरून टाळ, विणे, मृदंग ढोलक्या, चिपळ्या यांचा एकसारखा गजर नेहमीं ऐकण्यांत येई. वारकरी मोठ्या प्रेमरसानें तुकाराम वगैरेंचे अभंग गात, व मध्यें मध्यें "सावळ्या हरी" "विठ्ठल विठ्ठल" "ज्ञानदेव तुकाराम" "जयजय विठोबा रखमाई," या नामांचा मोठ्यानें व प्रेमानें घोष करीत. पाऊस पडत असतांही कित्येक विठ्ठलभक्त नसत्या पडत्या पावसांत व चिखलांत मोठ्या भक्तिभावानें भजन करीत व नाचत असत. केवढी ही त्यांची त्या विठोबावर प्रीति! तेथें त्यांस कर द्यावा लागतो, व पुष्कळ खर्च करावा लागतो, व बहुत दुःखें व अडचणी सोसाव्या लागतात, तरी तें त्यांस कांहीं त्रासदायक वाटत नाहीं. केवढें हें विठोबाचें वेड!

पंढरपूर ही एक व्यापारी लोकांची पेंठ च दिसती. सर्व सडकांच्या दुतर्फा मजबुत दुकानें असून त्यांत व्यापारी वगैरे लोक तऱ्हातऱ्हांचे जिन्नस घेऊन विकावास बसतात. वारकरी व दुसरे यात्रेकरी गांस लुटून पंढरी ही मोठी गबर बहती झाली आहे. यात्रेकडून तेथील सर्व लोकांस व विशेषेंकरून बडव्यांस फार मिळकत आहे. हे बडवे लोक तर मेंढ्यासारखे भोळ्या विठ्ठलभक्तांस फास घालून केवळ कुबेरच झाले आहेत. त्यांतून कित्येकांस लिहितां वाचतां येत नाहीं असें ऐकलों. ते सर्व प्रकारच्या दुर्व्यसनांत निमग्न असतात. बहुतेकांनीं पगार देऊन रांडा ठेवल्या आहेत. ते सर्व उन्मत्त व कजेदलाल आहेत. पापकारें विठोबाच्या योगानें त्यांची पोळी पिकून सध्या ते चैन भोगतात, पण पुढें त्यांच्या साठीं भयंकर ईश्वरी शिक्षा नेमली आहे. पंढरपुरचे सर्व लोक मोठे ठक व लुच्चे आहेत हें चांगल्या मनुष्याच्या सहज लक्षांत येईल. तर पहा, जे रात्रंदिवस पंढरपुरांत राहून रोज रोज त्या पवित्र चंद्रभागेचें स्नान करतात व विठोबाचें दर्शन घेतात, त्यांचीं मनें जर इतकीं दुष्ट आहेत, आणि चंद्रभागा व विठोबा यांच्या समागमानें जर त्यांचे पाप जात नाहीं, तर जे लांब लांबून येऊन या नदींत केवळ एक वेळ बुटकुळी मारून विठोबाचें दर्शन घेतात त्यांची शुद्धता कोठून होणार? आतां आ ज्ञानाचा अमल आहे म्हणून हें खूळ व आंधळी पाच्छाई चालती; पुढें ज्ञानाचा प्रसार होऊन लोक शाहाणे व विचारी होतील.

पंढरपुरच्या लडका गावाच्या डोलाप्रमाणें नऱ्याच रुंद आहेत खऱ्या, परंतु यात्रेमध्यें गर्दीनें त्या इतक्या कोंदून जातात कीं, मोठ्या मुष्किलीनें इकडून तिकडे जाणें होतें. विठोबाचें देऊळ गावाच्या अगदीं मध्यभागीं आहे, व चहूंकडचे रस्ते तेथें मिळतात. रावळाच्या म्हणजे देऊळाच्या चौफेर फरसबंदी आहे, व त्याच्या सभोंवती बडव्यांच्या मोठाल्या टोलेजंग पण बळकट्यासारख्या इमारती आहेत. विठोबाचें देऊळ हें चांगलें मजबूत चिरेबंदी असून बरेंच मोठें आहे. पूर्वेच्या बाजूस महाद्वार आहे. तेथें पहिल्यानें च विठोबाचा प्रिय भक्त चोखा किंवा चोखामेळा याच्या नावाचा एक दगड उभा केलेला आहे, त्याचें पुजारीपण करून महार पोट भरतात. पुढें देवळाचा दरवाजा चढतांना कांहीं पायऱ्या लागतात त्यांतील पहिली पायरी नामदेव म्हणून त्याचा दुसरा एक भक्त होता त्याच्या नांवाची आहे. ती पितळेच्या पत्र्यानें मढविलेली आहे; तीवर हिंदी पोट भरतात. मी महाद्वाराच्या चौकापर्यंतच गेलों होतों, तो बराच मोठा आहे; परंतु विठोबाचा गाभारा फार लहान व संकोचित आहे तो त्या दुरून पाहिला आत गेलों नाहीं. त्यास उत्तरेच्या बाजूस लोकांस बाहेर पडण्याकरितां दोन लहान दारें आहेत. त्याच बाजूस आंतल्या गाभाऱ्यासही खिडकीसारखें भोंक पाडलेलें आहे. तें उजेड व वारा यांसाठीं सरकारानें मुद्दाम पाडविलें आहे. दक्षिणेसही एक द्वार आहे. नऱ्याच्या बेलेस लोकांची बेसुमार गर्दी होऊन सर्व द्वारांत इतका रट्टा होतो कीं, पलीकडे जाण्यास फार कठीण पडतें. पुष्कळ मार व धक्के खावे लागतात तेव्हां त्या गाभाऱ्यांत जाऊन येणें होतें. पालिस शिपायांचा पहारा चोहोंकडे आहे, तरी विठ्ठ

ज्या विठ्ठलभक्तांस शिपायांचा व बडव्यांचा मार खावा लागतो, तेव्हां एकदाचें विठोबाचें दर्शन होतें. तेंही पुरतें नाहीं, पायां पडलें कीं लागलेंच शिपाई त्यांस हाकून लावतात. कित्येकांस तर तेथें जाण्याकरितां दोन दोन तीन तीन दिवस दीर्घ प्रयत्न करावे लागतात तेव्हां विठोबा त्यांच्या दृष्टीस पडतो. कित्येकांचा तर चार पांच दिवस कांहीं इलाज चालत नाहीं. त्यावरून ते फार कष्टी व दुःखी होतात आणि जेव्हां त्यांचें दर्शन होतें तेव्हा आपण कृतकृत्य झालों, आपण साक्षात भगवान पाहिला व आपल्या जन्माचें सार्थक झालें, हें मनांत येऊन त्यांस ब्रम्हानंद होतो.

पंढरपुराच्या दक्षिणेस सुमारें दीड मैलावर गोपाळपुरा आहे, तेथें गोपाळकाला होत असतो. गोपाळकाल्याच्या दिवशीं आम्ही तिकडे गेलों होतों. तेथें एक हेऊळ आहे, व देवळापुढें मोठें मैदान आहे. त्या मैदानांत गोपाळकाल्याकरितां शेकडों मेळे जमतात, व अवघें मैदान लोकांनीं भरून जातें. चोहोकडे हजारों पताका दृष्टीस पडतात. टाळ मृदंग यांचा एकच गजर होतो. "जय जय पांडुरंग हरि, ज्ञानोबा तुकाराम, असा कल्लोळाट चहूंकडून ऐकण्यांत येतो. जो तो मेळा आपापला काला करून चाखता होतो. गोपाळकाल्यांत लोक मोठ्या प्रीतीनें एकमेकांच्या तोंडांत लाह्या घालतात. पुरुषपुरुषांच्या बायका बायकांच्या, पुरुष बायकांच्या व बायका पुरुषांच्या तोंडांत घालतात. कोणी कोणाच्याहि तोंडांत लाह्या घालाव्या. कोणी मना करूं नये, अशी चाल आहे तो प्रसंग विठ्ठलभक्तांस अभेद प्रेमाचा असतो. ते आपल्या समजुतीप्रमाणें मोठ्या प्रेमरसांत असतात, व असें समजतात कीं, आज आम्ही विठोबाचे गोपाळ झालों, किती आम्ही धन्य! या आनंदानें त्यांची तहान भूक हरपती. कित्येक तर त्या प्रेमांत इतके गुंग होऊन जातात कीं ते शुद्धीवर नसतात. त्यांच्या तोंडास बुका फासलेला असून गळ्यांत फुलांच्या व तुळशीच्या माळांचीं पेंडकीं असतात व भजन करीत नाचतात. त्या गोपाळकाल्याच्या दिवशीं दहीहंडी फुटली, परंतु ती आमच्या पाहण्यांत आली नाहीं. तेथें तीन चार पालख्या आल्या होत्या एक पालखी ज्ञानोबाची होती, तिजबरोबर एक हत्ती होता. कबीराचीहि पालखी आली होती, तिजबरोबर कबीरपंथी लोकांचा मेळा होता. कबीरानें तर आपल्या एका दोहऱ्यांत मूर्तिपूजेविषयीं मोठा तिरस्कार दर्शविला आहे. तो म्हणतो;—

"फत्तर पूजे हर मिले तो मय पुजूं बडा पहाड. फत्तरसे तो चक्की भली कीं पीस खाय संसार." असें आणखी आणि कबीराचे शिष्य त्या यात्रेस देवभाळ्या समुदायांत मिळून विठोबाची भक्ती करतात हें पाहून मला फार आश्चर्य वाटलें. असो, तेथें मेळे एकामागून एक येऊन काला करून जात; असें सकाळपासून संध्याकाळपर्यंत चाललें होतें. लोक जातांना म्हणत "आजचा गोपाळकाला गोड झाला गोपाळांनीं गोड केला." दुसऱ्या दिवशीं बहुत लोकांचा गोपाळकाला होतो. त्यांत तमाशासारखीं अचकट विचकट सोंगें येत असतात असें आम्ही ऐकलें. वारकऱ्यांच्या गोपाळकाला झाल्यावर बहुतेक यात्रा फुटली.

चिनांतील मोठी कत्तल.

सांप्रत कांहीं दिवसांमागें कांहीं चिनई लोकांनीं फ्रेंच लोकांची मोठी कत्तल केली. त्यांतील पक्कें वर्तमान लिहून न आल्यामुळें सर्वांस तो समाचार अवगत होण्याविषयींची इच्छा उत्पन्न झाली आहे म्हणून त्यांतील किंचित मूळ कळवून नंतर सांप्रत तेथून आलेली कच्ची हकिकत लिहितों.

चिनई देशांत फक्त कंतान बंदर मात्र आमच्या इंग्रज बहादुरांचें आहे. तेथें यांचा प्रवेश मोठ्याच मजबूत तहनाम्यामुळें पुर्ता झाला असल्यामुळें या मुलखांत कांहीं तरी इंग्लिश सरकारचा पाय शिरकला असें ते लोक समजतात. तेथील सरकार मोठें बळकट असून लोकांचें प्रीतिपात्र आहे. यामुळें इंग्लिशांची व यांची वर्षांतून किंवा एक दोन वर्षांतून कुरकुर होय. परंतु या बद्दल प्रबल लढाई झाल्याचें दिसत नाहीं. फ्रेंच युरोपियन आणि चिनई लोक यांमध्यें कांहीं वर्षांवर बराच बेबनाव झाला होता. परंतु त्या पासून विशेषसें हांशील न निघतां सल्ला होऊन फ्रेंचांबद्दल वस्ती चिनेंत निरंतर झाली. या योगें तर चिनी लोक विस्तवासारखे पेटले आणि असें वाटलें कीं, आम्हीं फक्त इंग्रजांकरितांच मोठे बेदील झालों तों हे दुसरे त्यांस फ्रेंच मिळाले. म्हणून मध्यें पुष्कळच बंडें मोठीं झालीं तथापि फ्रेंच हटेनातसे झाले. व उत्तरोत्तर त्यांनीं जास्त बुलुख त्यांच्या पासून स्नेहानें घेतला. तथापि आतां फ्रेंच उंच प्रतीच्या लढाईच्या धंद्यांत गुंतले असें पाहून आणि आमचे इंग्लिश सरकार व कित्येक राज्य अधिकारी अलग रहाणार असें त्यांस कळल्यावर त्यांनीं पुनः उचल केली ती फारच वाईट व भयंकर व निर्दाक्षिण्य केली. व निर्दयपणा तर त्यांत इतका झाला कीं नव खंडांतही ही गोष्ट कोणीच चांगली म्हणणार नाहीं. व ही कोणीच मर्दुमीची असें म्हणणार नाहीं.

या अशा गोष्टी केवळ सरकारच्याच सल्ल्यानें घडतात असें नाहीं. पर या फक्त जंगली लोकांच्या बाडगाईनें घडतात. परंतु त्याचा भयंकर परिणाम शेवटीं चमत्कार पर येतो त्या विषयींची माहिती वाचाण्यास अलेलच. सांप्रत तिनशीन येथें झालेल्या कत्तलीचा वृत्तांत.

मूळ—फ्रेंच डाक्टर चिनई लोकांचीं पोरें धरून त्यांचे डोळे काढतात. व अशा रीतीनें त्यांचा नाश होतो ही गोष्ट त्यांच्या मनांत पुर्त्या रीतीनें ठसली. आणि जे कोणी जंगली लोक त्यांची एकांदिली होऊन त्यांनीं एकदम त्या फ्रेंच लोकांवर हल्ला केला. प्रथमच त्यांचें उदाहरण असें कीं, त्यांनीं त्यांचा देव तिनशीन एथें आहे तेथील देवालयास आग घातली. व २१ खून केले. यांत ९ बायका होत्या त्या नागव्या करून त्यांचें स्तन वगैरे लज्जास्पद अवयव कापून नंतर त्यांचे तुकडे तुकडे केले त्यांचे डोळे ठोचून ठोचून फोडले. तीन जिवारे रासेयन पळाले होते त्यांस ही पकडून त्यांचें नीव घेतले. एक बायी चिनई लढीचा पेहेराव करून पळून चालली होती व ती बांचलीही गेली असती. परंतु तिच्या पायीं बूट होते ते ओळखून तिला तत्क्षणींच मारली.

दुसरे दिवशीं चिनई व ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या भेटी झाल्या आहे चिनई सरकारानें ६०४ आसामींचें एक लष्कर फ्रेंचाच्या संरक्षणार्थ देऊं केलें. परंतु ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं तें भय फारच उलट होईल असें जाणून ती गोष्ट नाकारिली. व बोटी वगैरे तयार होत्या म्हणून त्यांत सर्व निर्वंत मनुष्यें रवाना केलीं. २३ वीस किंवा चिनी आग लावतांना, व भयंकर कृत्यें करतांना पकडून सत्ताधिशाचे स्वाधीं केलें. एक रशियन स्त्री १६ वर्षांची, व तिचा नवरा यांचें लग्न एकच आठवड्यामागें झालें होतें ते मुर्दे नदींत सापडले बायकोचें हात कापून तिचें शरीर उघडें होतें. व एकंदर शरीरावर डाग दिले होते. दोन ही प्रेतें नग्न होतीं. व तिच्या हातांतील बांगड्या काढण्याकरितां तिची ३ बोटें कापलीं होतीं. दुसरे दोन मुर्दे जातून एक चिनी व दुसरा फ्रेंच कान्सल यांचीं होतीं. ते ही मुर्दे नग्न होते या कौन्सलाविषयीं असें कळतें कीं, ही खून रेंगीची धांदल ऐकून निचारा फ्रेंच कान्सल धांवत धांवत चिनई अधिकाऱ्याकडेस येऊन जंगली लोकांना केलेलें कृत्य सांगितलें आणि बंदोबस्ता नंतर निश्चाला नें परत येत असतां वाटेंत तोडलों. व त्याचे तुकडे तुकडे करून टाकले. सु. बो.

मागाहून आलेली नोटिस.

नोटिस—बुलिदान मिरदीचंद मारवाडी दुकान उमाळी तालुके मलकापुर यांस सालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे रुपये ऐन मुदत ५५० दोन रोख्याबद्दल देणें असलेले आम्ही तुम्हास बहुत वेळ देण्यास आलों असतां रुपये घेतले नाहींत. न घेण्याचें कारण रोख सापडत नाहींत व बिन पावतीनें घ्यावें तर घेतों. असें कळविलें. हीं कारणें बरोबर नसल्यामुळें मुमच्या देण्याबाबद रुपये जेष्ठ शुद्ध ८ गुरुवार तारीख ७ माहे जून सन १८७० इसवी रोजीं सुकालचंद जसराज मारवाडी दुकान मलकापुर यांजपाशीं रोख रुपये ठेवून तेथून रोख देऊन अगर पावती देऊन रुपये न्यावे म्हणोन चौघांसमक्ष तुम्हास कळविलें होतें. तत्रापि तुम्ही आद्याप रुपये सुकालचंदचे दुकानांतून नेले नाहींत. असें समजल्यावरून ही नोटिस देत आहे कीं, सदरच्या दुकानीं मी वर लिहिलेले मिसीस रुपये ६०० सहा शें रोख ठेविले आहेत त्यांतून तुमचे ऐन रुपये ५५० त्यांचें व्याज सदर मितीपर्यंत जे हिशेबानें होईल ते असें पावती देऊन आठ दिवसांत घेऊन जावे. यावर तुम्ही रुपये न न्याल आणि कारण परत्वे विनाकारण मजवर फिर्याद कराल तर त्या फिर्यादीचे खर्चाबाबद व सुकालचंद दुकानावर रुपये ठेविले मितीचे पुढील दिवसांचे व्याजाबद्दल मी जबाबदार नाहीं. हें कळण्याकरितां ही नोटिस दिली आहे. कळावें तारीख ३१ माहे आगष्ट सन १८७० इसवी.

(सही) विक्रम बलद गरबड पाटील वस्ती मौजे उमाळी तालुके मलकापुर पांच हातची निशाणी असे.

वऱ्हाड.

बुलढाणा. (मित्राकडून) ता० २६ आगस्ट या निरुद्यांत हेऊळगांवराजा येथील मुकद्दमा उपस्थित झाल्यापासून मुलकींत काय आणि पोलिसींस काय सर्वत्र ठिकाणीं गडबड होऊन राहिली आहे, तेणेंकरून लोकांस असें झाऊन गेलें आहे कीं, उद्या आपली आब्रू कशी निभेल ती निभो, असें ते लोक भिऊन गेले आहेत. त्यांत विशेषें करून पोलिसचे लोकांस तर रात्रंदिवस चैन पडेनासें झालें आहे.

शेखलाल पोलिस इन्स्पेक्टर यांजला गुन्हा छपावल्याचे बाबतींत सस्पेंड करण्याविषयीं इन्स्पेक्टर जनरल साहेबांकडून हुकुम आला. परंतु त्याप्रमाणें इकडे त्याची व्यवस्था न राहतां हातांत हातकड्या घालून अमरावतीचे पोलिस स्टेशनांत कैदेंत ठेविले. या प्रांतांत याच प्रकारास सस्पेंड म्हणत असतीलसें वाटतें. वाचप्रमाणें रतनसिंग चीफ का० ही याच कारणामुळें कैदेंत आहे. बरें पोलिसास तर २४ तासांपेक्षां कैदेस आपले ताब्यांत ठेवण्याचा अगदीं अखत्यार नसून एक एक महिना पावेतों मा मिस्त्रेटाचे वारंटाशिवाय पर लिहिलेले उभयतां कैदी रखडत कैदेंत पडले आहेत. ही गोष्ट मामिस्त्रेट साहेबास माहित नाहीं असें म्हणवत नाहीं पण ही वेळ डांबेशाक करण्याची पडली इतकेंच म्हणणें भाग आहे. नाहीं पेक्षां बोबन साहेबासारख्या सुपरिंटेंडेंटानें असें केलें असतें तर तिकडून इन्स्पेक्टर जनरल साहेबांनीं आज्ञा अमान्य केल्याबद्दल व इकडून डिपुटि कमिशनर साहेबांनीं गैरशिस्त रीतीनें व अन्यायानें कैद ठेविलें असे रिपोर्ट मेहरबान रेसिडेंट साहेबांपावेतों पोंचविले असते पण तसें आतां करण्याची वेळ नाहीं. यांजवरून आपणास कदाचित् वाटेल कीं, इतकाच अन्याय या निरुद्यांत झाला आहे तर तसें समजूं नका. आणखी एक दोन उदाहरणें पहा.

हेऊळगावचा मुकद्दमा चालत असतां राणी अहल्याबाई या हेऊळघाटांत उतरल्या होत्या त्यांनीं आपला एक नोकर पंजाब शिंग शीक जातीचा मनुष्य यास चिठी देऊन बुलढाण्यास साहेबांकडेस पाठविलें असतां विरुद्ध पक्षांतील बाबुला लाड यांजकडे त्यांनें तुम्ही उगेच कुभांड का करितां इतकें सांगितलें व त्या वेळेस जवळ कोणी च नव्हतें असें असून लाड मनकुरानें ज्यार संभावित, पण हेऊळगावचे गृहस्थास साक्षीदार करून कलम ५०६ प्रमाणें फिर्याद केली व मामिस्त्रेट साहेबांनींही न्यायदृष्टीनें त्या गरिबास एक वर्षाची कैदेची शिक्षा दिली.

वर लिहिलेला बाबुला लाड यानें आणखी एक आरोप वामन बल्लाळ हेड का० वर असा आणिला होता कीं, हेऊळगावांत आम्ही राजुशी राने हे विष प्रयोगानें मरण पावले अशी जबानी दिली सबब हेड का० नें आम्हास धमकी देऊन म्हटलें कीं, असें बोलूं नका, बोलल्यास तुमचे पायांत बेडया पडतील. यावरून निष्यारा वामन बल्लाळ याचे हातांत हातकड्या घालून कैदेंत ठेविलें पण मि० येलियट साहेब अ० कमिशनर यांनीं पुरावा नसल्यामुळें मुकद्दमा सोडून दिला.

मौजे खरबडी एथें खून झाल्याबद्दल आपणास पूर्वी लिहिलेंच आहे त्या प्रकरणांत रामेश्वर हेड का० हा तपासास गेला होता सबब याजलाही मामिस्त्रेटाचे वारंटाशिवाय गुन्हा छपावल्याबद्दल एकदम कैद करून शृंखलाबंधन करून डांबिलें होतें पण अस्सल मुकद्दमाच सुटला तेव्हां हेड

का० बरडी गुन्हा राहिला नाहीं सबब ता रीख २३ रोजीं त्याचे पायांतील बेडया काढून त्यास पूर्वीचे कामावर पाठविलें.

मेहकर एथें मोहोरमचे महिन्यांत हिंदु व मुसलमान लोकांचा कांहीं तंटा झाला होता त्या गर्दींत बलदी हेडकान्स्टेबल हा सांपडून त्याचा पटका पडला व तलवारही त्यामांतून निसटून बाहेर आली होती याजबद्दल एका मुसलमानानें त्याच वेळस बलदी हेडकान्स्टेबलानें तलवार म्यानवर मारिली तो मी सटकयावर घेतली स बब वाचलों. अशी फिर्याद केली होती पण ती खोटी ठरली होती. आतां ही वेळ पोलिसावर साहेसाती आल्याची समजून त्या शिपायानष्टास स्फुरण येऊन त्यानें पुनः सुपरिंटेंडेंट साहेबांकडेस फिर्याद केली. मग काय! तपास ना चौकशी. एकदम बलदी हेडकान्स्टेबलास बेडया घालून पाठवावे असा हुकूम झाला. त्याप्रमाणें त्याची बुर्दशा होऊन कित्येक दिवस तो लोखंडी यंत्रास सांभाळून होता शेवटीं मॅजिस्ट्रेटानीं त्यास निर्दोष करून सोडून दिलें.

यांत आणखी आश्चर्य इतकेंच कीं, रामैय्या व बलदी ह्या उभयतां हेडकान्स्टेबलास कैद करतांच दोन्ही इसमांचे हेडकान्स्टेबलाच्या जागा अफजलखां व नागय्या यांस दिल्या होत्या. आतां उभयतांही निर्दोषी झाल्यावर साहेबांनीं काय योजना केली तीं समजत नाहीं.

रा० रा० रामसेवक दीनदयाळ असिस्टंट कमिशनर यांनाही १७०० रुपये लांच खाल्याबद्दल बडगेर एथील लोकांकडून पुरावा मिळविलेला आहे. याचा परिणाम पुढें समजेल.

याप्रमाणें या जिल्ह्यांत गडबड चालली आहे ही अशीच राहील कीं काय! अशी लोकांस भीति पडली आहे करितां ही गडबड एकदम बंद होईल अशी तजवीज होण्याचे कामीं वरिष्ठ सरकार लक्ष्य पुरवीतर बरें होईल.

चिखली तालुक्यांत चांडोळ या गावीं मोहनलाल अचलसिंग नांवाचे वीस रुपयांवर हिंदुस्थानी स्कुलमास्तर होते. त्यानीं नामदार गवरनर जनरल साहेबांस अर्ज केला होता कीं, मला तहशिलदारीची जागा द्यावी. त्यांनीं हुकुम पाठविला कीं, तसें करण्यास आम्हीं नाखुष आहों. त्या हुकुमांत मास्तरानें खोडाखोड करून नाखुष या टिकाणीं खुष असें केलें व डिपुटि कमिशनरकडे अर्ज केला कीं आम्हांस तहशिलदारीची जागा देण्यास गवरनर जनरल साहेबांची संमति आहे यानकरितां आपण जागा द्यावी. त्यांस संशय वाटल्यावरून त्यांनीं मास्तरच्या अर्जावरील जबाबाची नकल कल्याहून नक्कल मागविली व ती आल्यावर मास्तरानें खोटा कागद केल्याचा त्यावर खटला केला. व तीन महिने सक्त मजुरी कैदेची त्यास शिक्षा दिली.

खामगावच्या स्मालकाज कोर्टाचे क्लार्क रा० एकनाथ मोरेश्वर यांस तहशिलदार गेगिलें व तूर्त गलकापुरास काम करण्याकरितां पाठविलें आहे. तेथील क्लार्कची १२५ रु० ची जागा कमिशनर आफसांतील रा० विष्णु सखाराम बापट यांस दिली.

गलकापुर तहशिलदार रा० त्रिंबकराव यशवंत यांनीं सहा महिन्यांचे रजेचा अर्ज केला आहे.

रा० गोविंदराव यशवंत अकोटचे तहशिलदार यांनीं दोन महिन्यांची रजा मागितली होती ती त्यास दिली नाहीं हणून न ते आपले कामावर जाऊन रुजू झाले.

बाळापुरच्या पेठेंतील शाळेवरील मास्तर रा० हरि महादेव हे सन्निपात ज्वरानें मरण पावले.

मि० टी लाझारस सेकंड ग्रेड ओव्हरसियर यांस पश्चिम वऱ्हाडांत नेमिलें.

मि० जे जे केरी रेलवे खात्याकडील थर्डग्रेड एक्झिक्युटिव इंजिनियर यांस नागपुराकडे पाठविलें.

वाशिमास इनचार्ज असि० कमिशनराचे जागेवर मि० सालकेड यांस नेमिलें.

अकोला

कमिशनर साहेबांची स्वारी वाशिमाहून काल एथें आली.

मि० हार्डन साहेब डिपुटीकमिशनर आजरोजीं विलायतेच्या रजेवर जाण्याकरितां मुंबईस गेले. त्यांचे जागेवर कप्तान मेकेंजी साहेब वाशिमाहून मंगळवारीं येणार.

डा० नानी साहेब एथील सिविल सर्जन यांस नागपुराकडे पाठविलें व त्यांचे जागेवर असिस्टंट सर्जन स्पेन्स यांस नेमिलें.

रा० रा० लखाराम दत्तात्रय हे खामगावास तहशिलदारीचे जागेवर जाऊन रुजू झाले. त्यांची जुडिशल शिरस्तेदारीची १०० रुपयांची जागा मोडून तींतून ३० रुपये क्लार्क आफ धि कोर्ट यांस अधिक देणार व ७० रुपयांचा डिपुटि क्लार्क नेमणार.

पाऊस उघडला. हवा स्वच्छ झाली आहे. रोगराई नाहीं. नदीवरील पुलाचें काम पुन्हां झपाट्यानें सुरु झालें आहे.

वर्तमानसार

बडोद्याचे गायकवाड सरकार आपले राज्यांत शाळा कोठें कोठें किती आहेत व त्यांतून किति मुलें काय अभ्यास करितात याच्या शोधास लागले असल्याचें कळतें. मराठी राज्यास हें मोठेंच सुलक्षण समजलें पाहिजे.

पुण्याचे प्रिन्सिपल कोर्टांत रा. व. मदन श्रीकृष्ण यांनीं रेलवे कंपनीवर एक फैसला दिला. त्यांत वादीचें मागणें होतें कीं प्यासेंजर ट्रेनमधून नीयेत असतां कनेत मुक्कामीं कांहीं डबे सोडिले व ते पुढें मिक्स गाडीस जोडून नेले त्यामुळें आपले वेळाचें नुकसान झालें व मिक्स गाडीमुळें आपले मनास व शरीरास दुःख झालें त्याबद्दल ५० रु. देववावे. कंपनीनें जबाब दिला कीं वादीस खरोखर कांहीं नुकसानी झाली नाहीं व उशिराबद्दल कंपनी जबाबदार नाहीं असें टाइम टेबलांत जाहिर केलेलें आहे. व धंद्याकरितां बारा गाड्याहून जास्ती गाड्या एक वेळीं नाऊ नयेत म्हणून वादी ज्या डब्यांत बसले होता तो डबा व दुसरे डबे काढून ठेवणें जरूर झालें सबब नुकसान मिळूं नये. कोर्टानें ठरविलें कीं राहिलेले डबे नेण्याचे कामीं कंपनीनें हयगय केली सबब दाव्या प्रमाणें खर्च सुद्धां रुपये द्यावे.

कोल्हापुरचे राजे साहेब विलायतेस गेले तेव्हां वाटेंत खाण्यापिण्याचे कामीं त्यांनीं जाति धर्माचीं फार परवा केली नाहीं अशा प्रकारचा बुट बाहेर निघाला होता तो खोटा आहे. व तसा प्रकार महाराजांनीं केला नाहीं असें कळतें.

अमीरखान नावाचा वहाबी जातीचा मनुष्य कलकत्यास कांहीं राजकीय आरोपावरून कैद झाला. त्याच्यातर्फे मुंबईहून मि० अनस्टी साहेब बारिस्टर गेले होते व त्यांनीं तेथील हाय कोर्टांत कित्येक दिवस काम चालवून गवरनर जनरल साहेबांस अशा मनुष्यास कैद करण्याचा अधिकार नाहीं म्हणून एक मोठें संभाषण केलें व त्यावरून त्या प्रांतीं त्याची मोठी प्रसिद्धी झाली. शेवटीं हाय कोर्टानें ठरविलें कीं अमीर खान याची कैद खुली करण्याचा अर्ज मानला जात नाहीं. नंतर जामिनांवर सोडण्या विषयीं दुसरा अर्ज झाला आहे. त्याचा निकाल अजून झाला नाहीं

मुंबईत लष्कांटियर पलटण भरत आहे तींत ८० नेटिव गृहस्थ नावें भरून देण्यास तयार झाले आहेत.

चीन देशांत फ्रेंच लोकांवर मोठा कहर गुदरला होता. हल्लीं फ्रेंच लोकांस मदत आली आहे. व चिनी लोकांचा सूड घेण्याच्या ते तजवीजींत आहेत.

लढाईची या आठवड्यांत विशेष बातमी नाहीं. तरी दोन लहानशा लढाया झाल्या त्यांत प्रशियन लोकांसच जय मिळाला. व त्यांनीं कांहीं फ्रेंच लोक बंदिवान करून नेले व कांहीं तोफा नेल्या.

काठेवाडचे हायस्कुलांत ताकिदखाना केला आहे. तेथें राजकोटचे ठाकुर व द्रांगद्राचे राजे यांनीं जाऊन मुलांचे खेळ पाहिले व ४०० रुपये बक्षिस दिले.

जाहिराती.

संस्कृत आणि प्राकृत कोश.

ही "डिकस्नारी" यांत अमरकोश, त्रिकांडशेष, मेदिनी, हारावली, व एकाक्षरी ह्या पांच कोशांतील संस्कृत शब्दांस लिंग, अंत व प्राकृत अर्थ जितके होतात तितके लिहून अकारादि विहेवारीनें तयार करून छापणें सुरु आहे. या कोशाची सर्वांस अवश्यकता असून विशेषें करून शाळाखात्यातील मास्तर व विद्यार्थी लोकांस फारच उपयोगी आहे. हें बुक चांगलें जाडी कागदावर छापीत आहो. ज्यांस हें बुक पाहिजे असेल त्यांनीं माहे आक्टोबर सन १८७० इ० चे आंत पैसा पाठविल्यास एक प्रतीस रुपये ४ पडतील. बाहेरगांवचे घेणारे यांस डाक खाशील पडणार नाहीं पैसा पाठविणें तो हुंडीनें अगर नोटीनें किंवा पोस्टाच्या तिकिटा पाठविणें झाल्यास दर रुपयास ८१ प्रमाणें वर्तावळा पाठविला पाहिजे. सर्व टिकिटा ८८६ दराच्या पाठविल्यास वर्तावळ्याबद्दल दर रुपयास ८८६ पाठविल्यास हरकत नाहीं. हीं पुस्तके थोडीं छापीत आहो यास्तव आमची भरती होई पावेतों ज्या लोकांकडून आगाऊ पैसा येईल त्यांस हीं बुकें मिळतील. भरती झाल्यावर उशीरानें पैसा येईल तो ज्यांचा त्यांस परत करूं यास्तव ज्यांस हें पुस्तक पाहिजे असेल त्यांनीं पैसा जमकर पाठवावयाची तजवीज ठेवावी.

पुणें, ता० १७ माहे आगष्ट सन १८७० } नारो आप्पाजी गडबोले.

जाहिरात.

किंमतीचे दराव.

वर्षाची आगाऊ देणाराला... ...६
आऊ अलेर ७
सहा महिन्याची आगाऊ ३ ८
एक अंकास १

या बाहेरा बाहेरील लोकांस वर्षाचे १२ आठमहिन्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व आऊ अलेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्याचा मागील हिशेब लक्षन नवें साल चालू होई तेपर्यंत २ महिन्याची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ० १८६
इंग्रजी नोटिसीचे दर ओळीस ८ ६
एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible their subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

Proprietors of Berar Samachar

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बाजूस लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बाजूस लिहावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कागदीं नावागावाची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरु केलें त्यास अजीच वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविल्याची तसदी आमीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्र तेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व दिलगीरी करणारांचे आम्ही उपकार मानूं

वऱ्हाडसमाचाराचे मालक

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून ज्या लोकांनीं आजबद्दलची व मागील गुंतवून गेल्यासाठी बद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांनीं कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें

वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL 5 AKOLA:—SATURDAY EVENING— SEPTEMBER 10, 1870 NO 37

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १० माहे सप्तंबर सन१८७० इ०. अं ३७

लढाईमध्यें फ्रान्सदेशावर गहजब

ज्या गोष्टीविषयीं कल्पनासुद्धां नसते ती एकदम घडून आली म्हणजे लोकांस मोठें सखेदाश्चर्य होतें तसा प्रकार फ्रेंच विषयीं हल्लीं झाला आहे. फ्रेंच लोक मोठे पराक्रमी, शूर, व लढवय्ये अशी त्यांची आख्या असतां, व लढाई उकरून काढण्यास देखील त्यांचा पुढें पाय असतां याप्रसंगीं एकावर एक अपजयाचे व अपमानाचे प्रसंग त्यांवर कसे आले तें समजत नाहीं. दोन महिन्यांत शत्रूंच्या व त्यांच्या पुष्कळ लढाया झाल्या परंतु एकींतही त्यांस यश आलें नाहीं. त्यांनीं पराभूत व्हावें, पळून जावें, किंवा बंदिवान होऊन शत्रूंच्या हस्तगत व्हावें असाच प्रकार होत गेला तो आपल्या वाचकांस मागेंच ठाऊक झाला आहे. व आजच्या अंकांत लढाईसंबंधीं तारायंत्रांतील वर्तमानें घेतलेलीं आहेत तीं पाहिलीं म्हणजे तर फ्रान्स देशाचे दुर्दैवाचा कळसच झाला असें त्यांस वाटेल. खरेंच कोठेंही चार मंडळींत या लढाईच्या गोष्टी निघाल्या म्हणजे तीन हिस्से लोक फ्रेंचाची बाजू धरून बोलत, आम्हीं फ्रेंच पक्षाकडील असें म्हणत, मोठी लढाई होऊन फ्रेंचांचा पूर्ण जय झाला असें वर्तमान लवकर येईल म्हणून सांतकंठ होत्साते प्रति दिवशींच्या तारेंतील बातम्या आधीं वाचीत, कित्येकांनीं कित्येक ठिकाणीं पैजाही अशाबद्दल घातल्या होत्या, परंतु त्या सर्वांचे मनोरथ वृथा होऊन फ्रान्स देशाची मोठी अप्रतिष्ठा झाली. त्याचे आंतले भागांत राजधानी शहराजवळही शत्रू चालून आले असतां त्यांचें निवारण त्याकडून झालें नाहीं, एकाही लढाईत फ्रान्सास जय नाहीं, सुमारें एक लाख शिपाई व पन्नास सेनापति बंदीवान होऊन शत्रूचे हस्तगत झाले, व शेवटीं खुद्द नेपोलियनें बादशहाही दातीं तृण धरून शत्रूस शरण गेला. अरेरे! काय हा त्या मानी पुरुषावर प्रसंग! ज्याचे राज्यांत पुरुषमात्र लढाऊ शिपाई, जो बाजारांत साहेबां सारखा भिऊन पळणारा नव्हे, जो स्वतां बाका शिपायी, व ज्याने हौसेनें व वीरश्रीनें तरवार कंबरेस बांधून सैनाधिपत्याची धुरी अंगें पतकरली, तो निरुपाय होत्साता हात जोडून शत्रूस शरण गेला तेव्हां त्याच्या मनोवृत्ती कशा झाल्या असतील, त्यास काय वाटलें असेल, व किती घोर दुःखानें त्याचें काळीज करपून गेलें असेल? अहाहा! इतक्या पल्ल्यावर गोष्ट येईल असें कोणास स्वप्न तरी होतें काय? ईश्वरेच्छा! त्याचा मुलगा लढाईत होता तोही याच प्रसंगीं आजारी पडला!

इकडे प्रशियन लोकांस वरचेवर जय मिळत आहे, तरी पण ते वीरश्रीनें फुगून त्यामुळें वेडे झाले नाहींत. ते पारिस शहरावर जाण्याचो फार लगट करित आहेत. त्यांनीं बादशहा नेपोलियन आपले हातीं लागला म्हणून आपलें सौजन्य टाकलें नाहीं. आदरपूर्वक त्यास आपले देशांत एक गर्वी सुंदर महालामध्यें नेऊन ठेविलें व त्याच दिमतीस पुष्कळ मनुष्यें दिलीं आहेत.

इकडे पारिस शहरांत बादशहा शत्रूचे हस्तगत झाल्याची बातमी येतांच प्रजेचा आवेश अधिक दुणावला. त्यांनीं प्रजासत्ताक राज्याचा झेंडा लाविला. राज्य चालविणारे कामदार नेमिले, व आपलें पहिलें काम शत्रूस आपले राष्ट्रांतून काढून द्यावयाचें हें आहे व तें तळहातावर शीर घेऊन करावयाचें, अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली आहे. फ्रान्स देशांत आहे तोपर्यंत तहा विषयीं एक अक्षर बोलावयाचें नाहीं व कोणी बोलेल तर ऐकावयाचें नाहीं असा त्यांचा कृतनिश्चय आहे. पारिस शहरावर शत्रू येतात म्हणून त्यांनीं त्याची कडेकोट बंदोबस्ती केली आहे व वाटेंत शत्रूस दाणा पाणी मिळूंनये अशा तजविजी केल्या आहेत व तितक्या उपरही ते पारिस शहराजवळ आलेच तर शहरास आग लावून देऊ व आपणही त्यांत जळून जाऊ पण अप्रतिष्ठेनें मृतप्राय होत्साते शत्रूचे स्वाधीन होणार नाहीं किंवा आपलें राजधानी शहर त्यांचे स्वाधीन होऊं देणार नाहीं अशी प्रतिज्ञा करून आहेत. धन्य त्यांचा निश्चय, धन्य त्यांचा आवेश व शाबास त्यांच्या ऐक्यतेची!

ही गोष्ट वाचून तर आमच्या "देखने मे छबू, और चलनेमे शिवराजी" अशा हिंदुस्थान देशानें लज्जायमान होत्सातें मान खालीं घातली पाहिजे. आम्हांमध्यें देशाभिमान नाहीं, पौरुष नाहीं, व आवेश नाहीं. फ्रान्स देशास त्याच्या मोठ्या अणीबाणीच्या प्रसंगीं राजा सोडून गेला तरी लोकांनीं राज्य आवरलें आणि आमच्या देशाच्या खुलस्थितींत ही आम्हांस राज्य चालविण्याची अक्कल नाहीं म्हणून परकी लोक आम्हांस दास करून आमचें राज्य चालवितात. फ्रेंच लोक आपलें राज्यरक्षणाची प्रतिज्ञा करितात, व आमचे लोकांनीं लढाईचे वेळीं पुष्कळ बळ असतांही फितुर करून राजे दुसऱ्याचे घरांत घातलीं आहेत! फ्रेंच लोक अपमानापेक्षां मरून जाणें श्रेयस्कर समजतात, आणि आमचे लोक नित्य शतावधि अपमान, व सहस्रावधि मानहानि सोसून "आमचे पाठीवर मारा, पण पोटावर मारूं नका" म्हणून अल्लावर नजर देऊन परकीयां पुढें तोंड वेंगाडून त्यांचे गुलाम होतात; वाचकहो, हें शीर्षक प्रसंगानुरूप योग्यच आहे. पण हा सर्व कशाचा परिणाम म्हणाल तर अविद्येचा होय यांत संशय नाहीं. हल्लीं आमचे देशांत विद्येचा प्रसार बराच होत चालला आहे तर ईश्वरानें आतां आम्हावर कृपा करावी, ही शापदग्धता पुरे, बहुत वर्षें आम्हीं पुष्कळ हेरपळलों. आतां युरोपांतील राज्यप्रमाणें आमच्या हिंदुस्थानास ही सुखस्थिती द्यावी, व तिकडील लोकांप्रमाणें आम्हांमध्यें देशाभिमान, ऐक्यता, धन्यता, व आवेश द्यावा याकरितां आम्हीं त्याची प्रार्थना करितों.

वऱ्हाडांत तहशिलदार.

वाशिम जिल्ह्यांत पुसद एथें तहशिलदारीची जागा खाली आहे ती भरण्याची जी तजवीज झालेली आमचे ऐकण्यांत आली आहे ती खरी असेल तर इकडील अधिकाऱ्यांच्या निवडणुकीची फार तारीफ केली पाहिजे खरी! ब्राम्हण लोकांस तहशिलदाऱ्या देण्याचा कंटाळा, किंवा ब्राह्मण लोकांची हुशारी अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत भरत नाहीं यामुळें मुसलमान लोक तहशिलीचे उमेदवार शोधण्याचा वऱ्हाडांत फार विशेष दिसतो. याविषयीं मागें लिहिलें आहेच. तहशिलदार होऊं इच्छिणार मुसलमान उमेदवारांच्या अर्जाची एक नकल अमच बंधु सत्यप्रकाशकर्ते यांनीं थोडया दिवसांमागें केली होती कीं आम्हांस तहशिलीची जागा द्या आम्ही मराठी नागलढया शिकण्याची सुरवात केली आहे. कोणी म्हणतात आम्हांस तहशिलदारी द्याच, कारण आमचे आजास किंवा मामास मोंगलाईंत मोठें काम होतें. वाः! तहशिलदारी मागण्याचे केवढे मोठे हे हक्क! व अधिकारही अशा हक्कावर त्यांस कामें देतील असें दिसतें. कारण पुसदच्या तहशिलदारीवर ज्यांस नेमण्याची योजना झाली आहे ते मुसलमान गृहस्थ हल्लीं वाशिमांत तेथील तहशिलदाराजवळ तहशिलीचे ज्ञानाचा अभ्यास करित आहेत असें ऐकतों. एकदम ते तहशिलीचें ज्ञान संपादनास लागले तरी त्यांस बाराखडया येत असाव्या अशी कल्पना होते. दुसरें असें ऐकिलें कीं एक महिन्यांत ते त्या कामांत तरबेज होऊन पुसदेस वास पाहण्यास जाणार. वाः! धन्य त्यांच्या शहाणपणाची! हे दैववान गृहस्थ कोण आहेत ते कळण्याची वाचकांस इच्छा झाली असेल म्हणून आम्ही सांगतों कीं हिंगोलीच्या छावणींतील २५ रुपये पगाराचे हे एक रिसालदार आहेत!!

आतां काणी मुसलमान पोलिस कानस्टेबल किंवा शिपायी असतील तर त्यांनीं नायब तहशिलदाऱ्या मिळविण्याचे उद्योगास का न लागावें? इकडे हंगाम तशाचाच आहे. बी. ए. वगैरेंचा इकडे खप नाहीं. मग मालतरी अभिरुचीव खप पाहून व तयार व्हावा हें रास्त आहे.

शेतकरिस सरकारचा आश्रय.

जसा इतर सर्व प्रकारच्या कामास सरकारचा आश्रय आहे तसा शेतकरीसही आश्रय पाहिजे, आणि तसा आश्रय मिळाल्या शिवाय शेतकरीस उत्तेजन यावयाचें नाहीं; अशी जी आज पांचतीस ओरड चालली होती, तिजकडे सरकारचें लक्ष पोंचून, त्याविषयीं नुकताच एक ठराव इंग्रज सरकारानें करून, तो मुंबई सरकारकडे पाठविला आहे. असें आमच्या समजण्यांत आलें आहे त्यांत असें आहे कीं, शेतकरी गरीब असल्या मुळें त्यांस शेतांत विहिरी वगैरे कामें करण्याची शक्ति नसल्यास त्या कामा करितां सरकारानें त्यांस पैसा द्यावा. आणि तो पैसा मग मुदतशीर त्यांपासून सावकाराच्या पैशा प्रमाणें वसूल करावा. आतां सावकाराचा पैसा वसूल करण्याची रीति पाहिली तर फारच चमत्कारिक आहे. मुदतीपुढें पैसा पाहिन्यास दर रुपयास दररोज अर्धी पैशा प्रमाणें व्याज घेण्याचा सरकारचा ठराव आहे म्हणून मुदतीस दरसाल दर शेंकडा ९२ ६० व्याज पडलें. एवढा जड व्याजाचा दर गरीब लोकांस उचलेल काय?

आम्हास एक मार्ग दिसतो. तो असा कीं, जा गोष्टी शेतास उदयास यण्यास जें काहीं अवश्य असेल, आणि जें शेतकऱ्याचानें होतनसेल, तें, त्याची कबुलात घेऊन सरकारानेंच काटकसरीनें त्यास करून द्यावें. आणि त्याबद्दलचा पैसा व्याजाची आशा न धरितां, साव्याच्या पैशा बरोबर दरसाल थोडा थोडा वसूलांत आणावा. असा नव प्रकार सरकार पतकरील, तर त्यापासून सरकारचें कांहींएक नुकसान न होतां रयतेस खचित मदत होईल. झालेल्या ठरावांतल्या गोष्टी असोत परंतु व्याजाचा दर फारच जबरदस्त आहे. गरीब शेतकऱ्यास तो सोसावयाचा नाहीं. आमच्या सरकारच्या मनांत आमच्या देशाचे शेतकरीस खराखर उत्तेजन आणावयाचें असल्यास आम्हीं जी विनंती केली आहे तिजकडे आधी लक्ष पुरवावें. कापसाचे वगैरे कामांत सरकारानें नजर पुरविली आहे. त्याप्रमाणें धान्याच्या कामीही पुरविली पाहिजे. असें आज पावेतों पुष्कळ वर्तमानपत्रकर्त्यांनीं सरकारास सुचविलें आहे. शेतकऱ्याचा कामा करितां सावकारांकडून रकमा काढिल्या असतां तीं कामें होतील हें खरें आहे परंतु तीं शेतें सावकाराच्या घरांत काळें करून तरी नातील, एवढी भीति आहे ती दूर होण्यास सरकारचाच आश्रय पाहिजे. आणि तो विचार सरकारानें मनांत आणिला आहे हें फार चांगलें आहे. परंतु, त्यांत व्याजाचा व वसुलाचा प्रकार जो लिहिला आहे तो गाळून टाकिला असतां बाकी मग सर्व ठीक आहे. आमचें हिंदुस्थान हे आमच्या दयाळू सरकारचें होतकरू मूल आहे त्यास चांगलें जीव लावून पाळिलें असतां त्यापासून चांगला फायदा झाल्याचून राहावयाचा नाहीं. आणि विद्यादिकांच्या योगानें हिंदुस्थानची प्रजाही राजनिष्ठ होत चालली आहे. तेव्हां सरकारचे सर्व हेतू सिद्धीस जाण्यास काहीएक हरकत येणार नाहीं परंतु सरकारानें मात्र जरा मेहेरनजरेनें लोकांचा सांभाळ केला पाहिजे. बृ. वै.

खानदेशातील पब्लिकवर्क्स खात्याचा बोजवार.

आमचे वाचकांस आठवत असेलच कीं, आमच्या सरकारच्या आवडत्या पब्लिक वर्क्स खात्यांत बहुत दिवसांपासून गंदाधुंदी चालत आहे. असें आम्ही व आमचे इतर बंधू यांनीं बहुत वेळां सरकारास कळविलें. परंतु सरकारानें त्या गोष्टीविषयीं कांहींच पुसतपास केली नाहीं. शेवट त्या गंदाधुंदीतच तें कृत्य न आवडून प्रस्तुत जिर्णे खानदेशांत आलें भव्य स्वरूप प्रघट केलें आहे. तो प्रकार असा.

खानदेश जिल्ह्याचे एग्झिक्युटिव इंजनेर याचे आफिसांत काशिनाथ दिनकर ह्मणे या नांवाचा एक मराठी शिरस्तेदार होता. या मनुष्यास खानदेशाचे एग्झिक्युटिव इंजनेर आफिसांत राहून आज सुमारें २३ वर्षे झालीं. या मनुष्यानें आपल्या विद्येनें आपल्यावर जे जे साहेब लोक झाले, त्यांची मनें आपल्या आधीन करून घेतलीं. आपल्या पुढें कोणाचा चालुंच नये असें करण्यांत याचा केवळ जाणा होता. सबाप कर्नल फाईफ सारखे या जिल्ह्यांत एग्झिक्युटिव इं० चे अधिकारावर असतांनां या काशिनाथपंताचें फारसें चालत नसे. पुढें आमचे मि. टामसन साहेबानीं खानदेशांतील एग्झिक्युटिव इंजनेरचे कामाचा चार्ज घेतल्यापासून आमच्या काशिनाथपंताचे कारकिर्दीस आरंभ झाला. नजा एक्झिक्युटिव इंजनेर होय. टामसन साहेबाचा काय विश्वास तो एक काशिनाथ दिनकर. काशिनाथानें सांगितलें कीं, साहेब आज सूर्य पश्चिमेस उगवला आणि पूर्वेस मावळला. तर तोच गोष्ट प्राधान्य. याप्रमाणें टामसन साहेबांची खात्री. मग काशिनाथपंताच्या हे ह्मटल्याचें महात्म काय विचारावयाचें आहे? सर्व प्रकारें दादा साहेबी झाली. दादा साहेब करतील ती पूर्व दिशा! ह्या प्रकारची त्या आफिसाची दशा झाली. शेवटीं भोपळा फुटला. धुळे येथें दगडाच्या खाणी आहेत त्यापैकीं कांहीं दगड गोरा शिवराम ह्मणून एक या खात्यांतील कंट्राक्टदार आहे त्यानें आपल्या खासगी कामास वापरले. अशाबद्दल मूळ एक फिर्याद मि. प्रिचर्ड फर्स्ट असिस्टंट कलेक्टर याजकडे चालली. तेव्हां त्याची चौकशी करण्यास त्यानीं आरंभ करून ती मोठ्या दक्षतेनें केली. मुद्दा आपल्यानिशीं गोरा शिवराम याजवर खटला शाबीत झाला व त्यास प्रथम शिक्षा झाली आरंभीं मांगल्यपद्ध अशी मयूरेश्वराची पुतळा शाल्यावर मि० प्रिचर्ड साहेबाचें कार्य निर्विघ्नपणें तडीस गेलें. मग नारायण रामचंद्र यास लाकडांचे बाबतींत शिक्षा झाली. पुढें मुख्य गाणपत्य जे काशिनाथपंत व गोविंद नारायण फर्स्ट ग्रेड सब ओवरसियर व सायन्ना या त्रिवर्गास १½ दीड वर्षांच्या सक्त मजुरीच्या सजा व १००० रुपये दंड. याप्रमाणें शिक्षा होऊन धुळे येथील तुरुंगांत हल्लीं ते स्वस्थ बसले आहेत. त्यांनीं अपिलेही केलीं होतीं परंतु त्यांतही शिक्षा कायम झाल्या. या कामांत आजपर्यंत दगाबाजी की झाली त्याचे सर्व हकीकती या मि० प्रिचर्ड साहेबानीं रिव्हिन्यु कमिशनर मार्फत सरकारास रपोट केला आहे. त्याचा निकाल करण्यासाठीं क्या० डावसन हे हल्लीं पुण्यास आले आहेत. या कज्जाताल अद्याप सर्व कागद आम्हांपुढें आले नाहींत. ते आल्यावर त्याची साग्र हकीकत आम्ही आपले अभिप्रायासह वाचकांपुढें ठेवूं

प्रस्तुत या खात्यांतील वहिवाटदार पुष्कळ लोकांस बडतर्फ दिली आहे. व त्याचे जागेवर नवीन लोक ठेविले आहेत. कित्येक सब ओवरसियर लोकांच्या दुसरे जिल्ह्यांत बदल्या केल्या. ही सर्व हकीकत खबरीप्रमाणें आम्ही लिहिणार आहों. ज्ञा.प्र.

लढाई संबंधी तारेंतून आलेलीं-वर्तमानें.

ता० २ सप्टेंबर.

मेझ शहरा जवळ प्रशियन राजपुत्र फ्रेडरिक चार्लस व फ्रेंच सरदार बाझेनी यांची दोन दिवस मोठी लढाई झाली. व बाझेनीयास हाकून लाविलें. तरी फ्रेंचांनीं या लढाईंत आपलें शौर्य चांगलें दाखविलें.

मेझ शहरा भोवतालचा प्रशियन फौजेचा वेढा उठविण्या करितां फ्रेंचानीं फार प्रयत्न केला परंतु तो व्यर्थ गेला. व त्याच्या ३० तोफा घेतल्या आणि ७००० लोक कैद केले.

पहिले तारखेस जी लढाई झाली तींत फ्रेंचांनीं प्रशियाच्या ३० तोफा घेतल्या.

लढाऊ दोन राष्ट्रांच्या तहाच्या बाबदींत इतर राष्ट्रांनीं कांहीं बोलूं नये असा जर्मन लोकांचा इरादा आहे.

ता० ३ सप्टेंबर.

फ्रेंच सैन्याबर प्रशियनांनीं हल्ला केला पण त्या पासून त्यांस जनरल म्याकमोहन यानें कांहीं फळ होऊं दिलें नाहीं. त्यास मागें हटविलें, व त्यांचा फार खराबा केला. शुक्रवार सारा दिवस लढाई झाली. व तींत फ्रेंचास जय मिळाला असें फ्रेंचा कडील वर्तमान आहे.

प्रशियाच्या राजानें आपल्या राणीस कळविलें आहे कीं म्याकमोहन मेलाणी झाले. व त्यांचे जागेवर जनरल विंकेन हे सेनापति झाले. आणि त्यांचे सिडानी एथील सर्व सैन्य कैदी होऊन आपले स्वाधीन झालें. फ्रेंच बादशहाकडे सेनाधिपत्य नाहीं व तो आमच्या स्वाधीन झाला. व त्याणें सर्व काम पारिस एथील राज्यकारभारी लोकांकडे सोपविलें.

सातशे प्रशियन व दोन हजार फ्रेंच शिपायी बेलजम देशांत शिरून त्यानीं आपलीं हत्यारें ठेविलीं.

स्ट्रासबर्ग एथील फ्रेंच लोकांनीं प्रशियन लोकांवर कांहीं हल्ले केले परंतु त्यांचा पराभव झाला.

ता० ४ सप्टेंबर.

फ्रेंच प्रधानांनीं जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यांत लिहिलें आहे कीं, तीन दिवस लढाई होऊन ४००० फ्रेंच लोक प्रशियन लोकांनीं कैद केले. यावेळेस प्रशियन सैन्य तीन लक्ष होतें या लढाईंत बादशहास कैद केलें. याच जाहिरनाम्यांत आणखीं असें लिहिलें आहे कीं या पराभवानें फ्रेंच लोकांचें धैर्य कांहीं खचलें नाहीं. प्यारिस शहरामध्यें बचावाची तयारी चालली आहे आणि थोडकेच दिवसांत नवीन सैन्य तयार होईल. लायर नदीच्या किनाऱ्यावर आणखी एक सैन्य तयार होत आहे. आणि हल्लींच्या काळाप्रमाणें जी तयारी करण्याचें सरकारचे हातीं आहे ती तयारी होत आहे.

काल रोजीं सेनेट सभेंत जरा डेविड यानें समजाविलें कीं, मेझ जवळच्या प्रशियन लोकांच्या सैन्यांतून निघून जाण्याचा प्रयत्न जनरल बाझेनि यानीं केला परंतु तो सिध्दीस गेला नाहीं. म्याकमोहान यानीं बाझेनी यास मिळण्यास प्रयत्न केला तो सिध्दीस न जातां त्यास सिडान एथें जावें लागलें. पुष्कळ दिवस लढाई झाली आणि उभयपक्षांचेही जयपराजय झाले. कायदे करणारे सभेची चांगली मदत मिळाल असा प्रधान लोकांस भरवसा आहे. हल्लीं जें आपलें नुकसान झालें आहे तें भरून आणण्याजोगें फ्रान्स देशास अजून सामर्थ्य आहे. प्यारिस शहराचें संरक्षण किल्ल्यामधून, रस्त्यामधून, आणि प्रत्येक घरांतून मोठ्या निकरानें व आवेशानें केलें जाईल. आपली राजधानी शत्रूंच्या स्वाधीन करून देण्यापेक्षां आम्ही सर्वजण तिला आग घालून तिच्या राखेंत मरून जाऊ.

याचप्रमाणें कायदे करणारे सभेपुढेंही प्रधान लोकांनीं प्रतिज्ञा केली आणि देशाच्या बचावाकरितां लढाई करण्याचा निश्चय दोन्ही सभांतील सभासदानीं मोठ्या आवेशानें मान्य केला.

वर्तमानपत्रेंही असाच आवेश दाखवितात.

ब्रुसेल्स एथून वर्तमान आलें आहे कीं १२००० फ्रेंच शिपाई आपलीं हत्यारें ठेऊन बेलजम देशांत गेले.

सेनापति मांटमोडी यानें शरण जाण्याचें नाकबूल केलें.

फ्रेंच बादशहास पुष्कळ लोक व एक सेनापति बरोबर देऊन मोठ्या लवाजम्या निशीं बेलजमच्या मार्गानें जर्मन देशांत पाठविलें.

कायदे करणारे मंडळीची सभा शानिवारीं मध्यान रात्रीं भरली होती. तींत कौंट पालीकाव यानें बादशहास शत्रूनीं धरल्याचा व जनरल म्याकमोहन यांच्या सैन्याचा पराजय झाल्याचें सांगितलें. व प्रधान लोकांनीं पुढें आतां कसें काय करावयाचें त्याचा विचार करण्याकरितां उद्या दोन प्रहर पर्यंत सभा तकूब करावी असें सांगितलें.

जुलस फावरे यानीं नंतर अशी सूचना केली कीं राज्यांतून बादशहास व त्याचे वंशास जे हक्क असावयाचे ते त्यानीं गमाविले. यास्तव राज्य करणारी मंडळी आतां नवीन नेमावी. व फ्रान्स देशांतून शत्रूस हकून लावण्याच्या उपायाचें काम त्यांवर सोपवावें, व जनरल त्रोकू यांस प्यारिसचे गवरनर जनरल नेमावें.

या सूचनेवर कोणीही कांहीं हरकत घेतली नाहीं. सर्व स्तब्ध होते.

प्यारिस ता० ४ संध्याकाळ.

कायदे करणारी सभा दुपारीं एक वाजतां भरली तेव्हां कौंट पालिकाव यानें अशी सूचना केली कीं बहुमतान पाचशें सभासदांचें एक सरकार नमावें.

जुलस फावरे हे नंतर उठून ह्मणाले कीं काल्ह्या आमच्या सूचनेचा प्रथम विचार व्हावा.

इतक्यांत लोकांचा समाज मोठा जमला. व लोकसत्तात्मक राज्य करावें अशी एकच आरोळी झाली.

नंतर एम ग्यामेटा व दुसरे कित्येक डिपुटी यांनीं जाहिर केलें कीं फ्रान्स देशचे बादशाही राज्य संपलें. नंतर दुसरे निर्वांत ठिकाणीं जाऊन सभेनें राज्यकारभार करणारी मंडळी नेमली. व जनरल त्रोकू यास प्यारिसचे गवरनर नेमिलें.

प्यारिस शहरांत एकच हलकाल्लोळ झाला होता परंतु त्यामुळें कांहीं गैरव्यवस्था किंवा अतिशय उचल झाली असें नाहीं. लोकांच्या एकच निश्चय दिसून आला कीं प्रशियन लोक आपले राष्ट्रांत शिरले आहेत त्यांस एकदम हाकून लावावें.

प्यारिस ता० ८ सप्टेंबर.

सरकारी वर्तमान पत्रांत जाहिरनामा आला कीं, फ्रान्सचें राज्य लोकसत्तात्मक झालें. सिनेट, व लेजिस्लेटिक सभा काढून टाकिल्या. आणि वर्तमानपत्र संबंधीं व राज्यसंबंधीं सर्व गुन्हेगारांस माफी दिली आहे.

हत्यारें वगैरे युध्दसामग्री करण्याची व विकण्याची सर्वांस मोकळीक दिली.

लायन्स, बारडेक्स, ग्रिनोबल, एथें व दुसऱ्याही कित्येक शहरीं लोकसत्तात्मक राज्य झाल्याच्या जाहिराती लागल्या.

लंडन ता० ६ सप्टेंबर.

फ्रान्स देशचे लोक, राष्ट्राचा गार्ड, व सर्व शिपायी एकचित्त झाले.

प्रशियाच्या राजानें फ्रान्सच्या माजी बादशहास क्यासेलजवळ विलेमशोही एथें ठेवण्याची योजना केली.

अशी बातमी आहे कीं मेझ शहर शत्रूच्या हस्तगत झालें.

प्रशियाच्या राजानें पारिसकडे चाल केली व बंदीवान केलेले ९०००० फ्रेंच लोक जर्मन देशांत पाठविले.

फ्रेंच बादशहाची राणी बेलजम एथें आली आहे.

बादशाहाचा मुलगा नामर एथें आजारी आहे.

प्यारिस ता० ५ सप्टेंबर.

फ्रेंच माजी बादशहाची राणी युजिनी आपल्या मुलासहवर्तमान बेलजमकडे गेली. व मुलगी प्रिन्सेस क्लाटिल्डी स्विटझरलंड कडे गेली.

माझिल म्याकमोहन मरण पावल्याची बातमी आली होती परंतु ती खोटी ठरली व तो बरा होईल अशी आशा आहे.

फ्रान्स देशांतील सर्व प्रजेचा एकच कल दिसतो कीं शत्रू देशांत आहेत तों पर्यंत तहाचें कसलेंही बोलणें कबूल करावयाचें नाहीं. व फ्रान्स देशाचा कांहीं भाग शत्रूच्या हस्तगत होईल अशी त्यांनां कल्पना सुध्दां होत नाहीं.

ता० ६ सप्टेंबर.

प्रशियन लोक पारिस शहरावर येण्याची त्वरा करीत आहेत.

लंडन ता० ६ सप्टेंबर.

प्रशियन लोकांनीं जे फ्रेंच लोक कैद

करून नेले त्यांत ५० जनरल (सेनापति) आहेत.

फ्रान्सांतील गडबड पाहून स्पेन देशांत फौज जास्ती ठेवित आहेत.

वर्तमानसार

काश्मिरचे महाराजानीं इंग्लिशसरकारास सैन्याची कांहीं मदत मागितली असल्याचें कळलें.

सरकारी नोकरांनीं ५५वें वर्ष लागलें म्हणजे चाकरी सोडावी असा ग्यासेटड आफिसराविषयीं नियम आहे तोच सर्व नोकरांस लागू करावा व २३ वर्षांवरील वयाचा मनुष्य सरकारी चाकरींत घेऊनये. अशी कोणी सूचना केली आहे व सरकार तिच्याविषयीं विचार करीत आहे.

बंगाल इलाख्याच्या पोलीसचे डिपुटी इन्स्पेक्टर जनरल यानीं चाकरी सोडिली त्यांत सरकारानें २०००० रुपये बक्षीस दिले. त्यांची चाकरी १४ वर्षें झाली होती.

धारचे दिवाण निंभोरा एथें रेलवेस अपाय होऊन मरण पावले त्याबद्दल रेलवे कंपनीवर त्यांचे दत्तपुत्रानीं नुकसानीची फिर्याद केली होती. मुंबई हायकोर्टाच्या फुलबेंचास आनरेबल सर वेस्ट्रूप साहेब यानीं या फिर्यादीचा निकाल केलाकीं दत्तविधान मयताचे पाठीमागें त्याचे विधवा स्त्रीनें केलें सबब तो पुत्र नुकसान मागण्यास अधिकारी नाहीं म्हणून याला कांहीं मिळूं नये. मेलेल्याची नायका जानकीबाई इला ७००० रुपये व एक सहावर्षाची मुलगी मथुराबाई इला ३००० रु० मिळावे

काशीचे राजे सर देव नारायणसिंग हे गेले महिन्याचे २८ वे तारखेस मरणपावले, इंग्लिश दरबारांत यांची मोठीच चहा होती. यांचा एक पुतळा करून ठवणार आहेत.

पुण्यास सोलजर लोकाच्याकामासंबंधीं व कारागिरीसंबंधीं प्रदर्शन या महिन्याचे २१ वे तारखेस होणार आहे.

महाबी जातीचा पहिला कैदी मौलवी अमिरुद्दीन याची आलदा येथें चौकशी झाली व त्यास जन्मपर्यंत काळेपाण्याची शिक्षा झाली. याजवर राणी साहेबाविरुध्द लढाईचा उत्पन्न करण्याचा ठपका होता.

मुंबई इलाख्याचा मनिआर्डर खात्याचा रिपोर्ट छापला आहे. त्या खात्यीं त्या सरकारानें हिंदुस्थान सरकारास शिफारस केली आहे कीं हाफडा एक रुपया मनिआर्डरचें कमिशन आहे तें फार असल्याचा भोभटा आहे व त्यामुळे व्यापार कमी होतो व लोकांत मनिआर्डरपेक्षां सावकारी हुंडी स्वस्तदरानें मिळती याकरितां आठ आण्याचा दर करावा—दीडशे रुपयांच्या वर मनिआर्डर न देण्याची तजवीज आहे ती संख्या ५०० पर्यंत वाढवावी. व हिंदुस्थान आणि विलायत यांच्यामध्येंही मनिआर्डरचा व्यवहार चालावा.

मि. आनेस्टी साहेब बारिस्टर कलकत्यास जाउन जो एक मोठा महानी खटला चालला होता त्याचा अखेर निकाल असा झाला कीं त्यांनीं पाच पाच हजारांचे जामीन व मुचलके द्यावे व मोकळे व्हावे. आणि त्यांस नामदार गवरनर जनरल साहेब व लेफ्टिनेंट गवरनर साहेब यांजवर खटले चालविण्याचे आहेत ते त्यानीं विलायतेस राणीसाहेबांचे न्यायासनापुढें चालवावे.

योग दिसेल तर पुढील मार्च महिन्यांत इनकमट्याक्सचा दर सरकार कांहीं कमी करणार आहे.

असें वर्तमान आलें आहे कीं, फ्रेंच बादशाहाचें सैन्य मेत्स एथें असतां प्रुशियन लोकानीं एक बलून म्हणजे विमान उंच चढवून त्यांच्या तळाची पाहणी केली. त्या विमानांत तारायंत्र घेतलें होतें, व त्याची तार प्रुशियन सैन्यापासून बर्लिन राजधानीपर्यंत जी तार आहे तिला जोडली हे ती, आणि तिच्या योगानें फ्रेंच छावणीची स्थिति म्हणजे तिची बंदोबस्ती, पैशून्यें व रोख यांविषयीं सर्व माहिती जनरल वान मोल्टके प्रुशियन सरकारचा युद्धसंबंधी प्रधान यास दिली. हा प्रधान लढाईच्या ठिकाणापासून शेंकडों मैलांवर आहे तरी तेथून तो प्रुशियन सैन्यानें काय करावें, कोठें किती दिवस राहावें, कोणीकडे जावें वगैरे गोष्टींविषयीं हुकूम देत असतो, व त्याप्रमाणें करून सेनापति जय मिळवितात.

ज्ञा. द.

धुळें—पंधरा दिवसांपासून पर्जन्यानें उघाडी दिली आहे. मध्यंतरी तारीख २८ रोजीं थोडा पर्जन्य पडला यामुळें पिकास कांहींसा आधार झाल्यासारखें झालें. आठ चार दिवसांत एक दोन पर्जन्य चांगले होतील तर बरें होईल. इकडील जमीन बरड असल्यामुळें पर्जन्याची विशेष जरूर आहे सालाबाद प्रमाणेंच चालू साल्यांत पिकें नाहींत असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण पेरे होऊन शेतांतील पिकें माकडांनीं सपाट करून टाकलीं यामुळें शेतें पूर्ववत झालीं. त्यांत कित्येकांनीं पुनः पेरे केले व कित्येकांनीं मुळीच केले नाहींत. दात होते तेव्हां चणे नाहींत. चणे होते तेव्हां दात नाहींत. " अशी व्यवस्था बनली आहे. शहरांत वायूचा व आमांशाचा उपद्रव जारी आहे. महागाई पूर्ववत आहे.

खां. बै.

नगर—मे० चाटफिल्ड साहेब बहादूर ए० इ० मध्यभाग ह्यांची स्वारी पर्वा येथें आली. दुपारून लोकलफंड कमिटी झाल्यावर साहेबांनीं येथील हायस्कूल व सेकंडग्रेड आं० व्ह० स्कूल ह्या दोन शाळांत जाऊन कांहीं कांहीं वर्गाचे अभ्यास पाहिले तेव्हां साहेब खुष झाले असें समजतें. काल रोजीं साहेबांनीं दुसऱ्या नंबरची शाळा, मुलींची शाळा व लोकयास्ट स्कूल हीं पाहिलीं. आणि तेथें साहेब खुष झाले असें कळतें. हे साहेब मोठे विद्वान असून स्वभावानें फार गरीब व दयाळू आहेत. मि० पील साहेब यांस दुसरीकडे रिव्हिन्यु खात्यांत जागा मिळाली म्हणजे हे साहेब डाबरे बटर होणार म्हणून जी पुष्कळ दिवसापासून बोलवा आहे ती खरी झाल्यास योग्य मनुष्यास योग्य जागा मिळाली असें होईल.

रा. बा कृष्णाजी विष्णु त्रिमये सबार्डिनेट जडज हे साहुरी कोर्टास बदल गेले होते ते तेथील कामाची शिल्लक बरीच आटोपून येथें आपले कामावर आले.

येथील पूर्वीच जडज मेहेरबान रिचर्डसन साहेब हे आपली रजा पुरी झाली म्हणजे येथें यणार आहेत म्हणून लोकवार्ता आहे

हवेचें मान सकाळीं थंडावा असतो पर्जन्यांचा एखादे वेळेस थोडा फटकारा येऊन लागलीच अभ्र स्वच्छ होतें. रोगराई विशेष नाहीं. धान्याचे भाव बाजरी दर रुपयास ३॥—४ गहू १॥—२ तांदुळ ४॥—५ तुरीचीडाळ६॥—७ हरभऱ्याची डाळ४।—४॥ तूप, एकंदर असा भाव आहे. बृ० वै०

ढाका येथील बाबूपसन्न कुमारनाम यांस गिलख्रिस्ट स्कालरशिप मिळाली आणि ते ता० २४ आगष्ट रोजीं एडिंबरांच्या युनिवर्सिटीमध्यें अभ्यास करण्याकरितां विलायतेस गेले.

लाहोर येथील पत्रकर्त्यांच्या कळण्यांत असें आलें आहे कीं चिनेस लाण्याकरित पांच शिक लोकांच्या पलटणींस तयार असण्याविषयीं हुकुम झाला आहे.

नानासाहेब जिवंत असल्याचे कांहीं चिन्ह दिसेत. त्याचा कोणी मनुष्य, कोणी म्हणतात त्याचा भाऊ, नायव्य प्रांतांतील एकया शहरांत जड जवाहीर विकण्याच्या कामांत गुंतला आहे. त्याजवर सरकारी अधिकाऱ्यांची बारीक नजर आहे. ही गप्प व कल्पना किती खरी आहे कोण जाणे

—जर्मन फौज—बाविरयाहेट याच्या एकया बातमीदारानें ता० ५ आगस्टच्या कोलीन ग्यालेटमध्यें जर्मनीची लढाईत गुंतलेली फौज किती आहे त्याचा तपशील लिहून पाठविला आहे त्याजवरून पायदळ ४,४४,६००, स्वार ६२,६००, व तोफखाना ६१,६००, याप्रमाणें लोक आहेत आणि १५१२ तोफा आहेत असें कळतें. या फौजेतील सर्व लोकांचें वय १९ पासून २८ पर्यंत आहे असें समजतें.

—लग्नसंबंधी खर्च— बनारस येथें राजे सादेव नारायणसिंग यांच्या घरीं ता. १० आगस्ट रोजीं बाबू पियरीलाल यानीं कसरवाणी बनिया लोकांची सभा लग्नसंबंधीं फार खर्च करण्याची चाल आहे ती मोडण्याच्या विचाराकरितां भरविली होती. त्या सभेंत तीनशें लोक होते; त्या सर्वांच्या अनुमतें पुढें लिहिल्याप्रमाणें ठराव झाले. पहिला ठराव:—मुलीकडच्या उत्तम प्रतीच्या श्रीमान लोकानीं १२६, मध्यम प्रतीच्या लोकांनीं ६३ व गरीब लोकांनीं साडेएकतीस पर्यंत कमाल खर्च करावा. व मुलाकडच्या अनुक्रमें १५६ ७८, व ३९ पर्यंत कमाल खर्च व्हावा. दुसरा ठराव:—दारू वगैरे डामडौलाचा विनाकारण खर्च आहे तो करूं नये. तिसरा:—मुलीचे आईबाप गरीब असतील तर आंदण देण्याकरितां त्यांच्या नातलगांनीं त्यास मदत करावी. याप्रमाणें ठराव झाले. इं.प्र.

बातम्यांचीं पत्रें.

वाशिम तालुक्यांत गोप हा गांव रिसवडचे पश्चिमेस चार कोसावर आहे. ही वस्ती फार जुनी आहे. व झाडें झुडें पाणी वगैरे विपूळ आहे. हा गांव तर्फ वाटणीचा आहे म्हणजे दोन भाऊबंदाचा आहे. हल्लीं पाटिलकीचें काम जाखोजी या नावाचे गृहस्थ पहात असतात. हे गृहस्थ फार वृद्ध असून हुशारही आहेत. त्यांत दोन पुत्र होत परंतु तेही पुढें काम करतीलसे दिसत नाहीं. हा गांव जरी लहानच आहे तरी एथें व्यापाराची घडामोड बरीच आहे. एथें सरकारी शालागृह आहे व तें सरकारतूनच पैसा मिळून बांधिलें गेलें आहे. शाळेंतील मुलांचा अभ्यासही बराच चालला आहे. इकडे आज पंधरा दिवसांत पाऊस बिलकूल नाहीं. तेणेंकडून शेतांचीं कामें झपाट्यानें चाललीं आहेत आणखी असा व आठ दिवस उघडेल तर बरें होईल असें म्हणतात. यंदा आजपर्यंत सर्वप्रकारचीं शेतें बरीं आहेत. पंधरा दिवसांमागें पावसाची एकसारखी झड लागलेली होती तेणेंकडून मात्र पुष्कळ नुकसान झालें. कित्येकांच्या भिंती व घरें पडलीं. भगवानगीर गोसाव्याचे तर सगळेंच माळवद पडलें, नरें झालें कीं त्यांत कोणी माणुस नव्हतें.

लिंबलेड तारीख २७ आगष्ट सन १८७०

हल्लीं हवा फारबिघडली आहे. नरसाळीनें फार कहर केल्यामुळें शेतकीस धक्का बसला. मुखरोगाची प्रवृत्ति विशेष आढळते. महर्गता बरीच आहे. जवारीचा भाव १८ शेर. व गहू ७॥- शेर आणि तांदूळचांगले ६ शेरजनी मिळतात. तूप व चणे तर फारच महाग झाले आहेत. या गांवची पोलीस पट्टी सुमारें ६०० पर्यंत असून या गांवीं अद्यापि म्युनिसिपाल कमिटी नाहीं. याकारणानें रस्ते फार नादुरुस्त असून शौचकूपांची व्यवस्था तर स्वप्नींहि नाहीं. गावांत भंगी तर मुळींच नाहींत.

गुराचा कोंडवाडा येथून चार कोसावर किनगांवास आहे. तो या गांवीं झाला तर बरें होईल. आजपर्यंत सरकारी पैसा जागले लोक घेऊन जात होते. परंतु येथून पाटील पांडे यांनीं स्वतां पैसा घेऊन तिजोरीस जावें असा एकसा हुकूम झाला आहे असें ऐकतों. यापासून झालेची फी पावती होण्याची चांगली सोय झाली.

शाळेसाठीं गांवाच्या मध्यभागीं घर बांधून मिळावें या उद्देशानें एथील गांवकरी लोकांनीं गुदस्तसालीं ५५ रुपयांचा अर्ज डि. इ. इन्स्पेक्टर साहेब जिल्हा बुलढाणे यांजकडेस केला होता. त्याची दादला गेली असें दिसलें नाहीं सबब हल्लीं ३३ रुपयांचा पुनः अर्ज केला आहे. यावर डिप्टी कमिशनर साहेब काय हुकूम देतात हें पहावें. प्रयत्नीं परमेश्वर आहे.

गेल्या मार्च महिन्यांत एथील शाळेची ६० विद्यार्थ्यांची इ० ४—११ ची उत्पन्न झालीहोती हल्लीं आगष्ट अखेर सुमारें १२९ पेक्षां अधिक विद्यार्थ्यांची इ. १९—४—० पेक्षां जास्ती फी वसूल होईल असा अजमास आहे. यावरून काय स्थिति आहे ती पाहावी.

मेहकर, वाशीम, पुसद, डोणगांव, चिखली, देऊळघाट, देऊळगांव या ठिकाणीं मुलांची संख्या व मास्तरांची संख्या पाहिली असतां येथें दोन आशिष्टण मास्तर आणखीं पाहिजेत व शाळेकडेस अपराशी व पाणीवाला यांची नेमणूक सरकारानें करावयास योग्य आहे.

महालक्ष्मी व चंपाषष्ठी या सणांस सुट्या आहेत. ही फार गैरसोय आहे. इकडेस

शाळेंच अधिकाऱ्यांनीं चांगलें लक्षपुरवावें. आजपर्यंत हिंदुस्थानी गांवठी शाळांचीं मालिक पलकें एथील इं. म. हेडमास्तर पाठवित होते परंतु एथून हिं. इं. हेडमास्तरांनीं पाठवावीं असा हुकूम झाला असें ऐकण्यांत आलें आहे.

एथील पोलीसचें ठाणें देऊळगांवराजा चे चीफ कान्स्टेबलाचे ताब्यांत आहे तें किनगांवराजाचे चिकाचे ताब्यांत गेलें असतां तालुक्यांतले तालुक्यांत व्यवस्था राहील असें दिसतें.

LOACLA.

वऱ्हाड.

A place of Tuhusildar in Bassim District is at present vacant, and we hear, a Resaldar from Hingoolee Cavalry whose monthly Salary is Rupees 25, is a candidate for that employment, and he is now receiving rudimentary lessons from the Tuhusildar at Bassim to qualify himself for that responsible post which will in all likelihood be conferred upon him sometime during the next month.

Mr, Ram sawack Deen dyal extra assistant commissioner woon distrect, will, we hear, be brought to Akola on the 13th of this month to be tried on a charge of having taken bribe,

Ranee Uhilia bayee the widowed mother of young Raja Mansing of Dewoolgaum Raja is shortly expected at Akola for selecting and appointing a karbharee with the Consent of the Commr West Berar.

Captain Mackenzie officiating Deputy commissioner of Akola arrived on Tuesday the 6th intstant and assumed charge of his duties.

The ensuing Competitive examination will begin from the 1st of November, 1870.

उमरावतीचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. चिमणाजी राजाराम पाटक यांजवर पुसळे येथील स्कुल मास्तरानें १०० रुपये लाच मागितल्याची फिर्याद केली होती. ती त्यांवर लागू झाली नाहीं. सबब चिमणाजी पंतास त्यावर खोटी फिर्याद केल्याबद्दल उलट फिर्याद करण्यास अधिकाऱ्यांनीं सांगितलें आहे असें कळतें.

बुलढाण्यास रा. दाजी नारायण नगील यांस दुसरे कांहीं मोकदम्याचे संबंधानें एन्हा आरोपी केलें आहे असें कळतें.

देऊळगांवराजा येथील राणी अहिल्या बाई मलकापुरास आल्या आहेत व त्या एक दोन दिवशीं येथें येणार आहेत. संस्थानच्या कारभाराचे बाबदींत त्या कमिशनर साहेबांची भेट घेणार आहेत.

कुणखेड येथील मास्तराशी तेथील गावाच्यांपैकीं एक पाटलानें वाईट रीतीनें वर्तन केलें त्याबद्दल मास्तरानें अकोल्याचे तहशिलदारांकडे फिर्याद केल्यावरून चौकशी होऊन पाटलास १५ रुपये दंड झाला.

मि० निकोलेट साहेब असिस्टंट कमिशनर यांस फुलपावर मॅजिस्ट्रेटचा अधिकार मिळाला. तसाच ५००० रुपये पर्यंत दिवाणी दाव पहाण्याचा अधिकारमिळाला.

अकोला

मागील अंकांत लिहिल्याप्रमाणें क्या० मेकंजी साहेब बाशिमाहून मंगळवारीं येथे येऊन आपले कामावर रुजू झाले.

क्या० सालकंड साहेब असिस्टंट कमिशनर बाशिमास अजून गेले नाहींत.

मे० लायल साहेब कमिशनर व डा० पेटर साहेब स्पानिटरी कमिशनर उमरावतीस क्रिकेटाच्या खेळाकरितां गेले होते ते गुरुवारीं परत आले.

डिपुटी कमिशनर आफिसांतील ७० रुपयांची डिपुटी क्लार्कची जागा अजून भरली नाहीं. बाशिमाहून कोणी हणमंत रामचंद्र नावाचे कारकून येणार आहेत अशी बातमी आहे.

रा. रा. रामसेवक दीनदयाळ एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांवर लाचाचा जो आरोप आहे त्याची चौकशी येथें १३ व तारखेस सन १८५० चा आक्ट ३७ नंबरहुकूम पंच नेमून होणार अशी बातमी आहे.

शाळांकडील कापिटिटीव परीक्षा नोंवेंबर महिन्याच पहिले तारखेपासून सुरु होणार आहे.

नोटिसा.

नोटिस—नोतारांम विठल डांगे रहाणार मलकापुर व गणू वल्लद संभाजी पाटील मौजे घिरणी तालुके मलकापुर यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते ती येणेंप्रमाणें.

१ सन १२७८ फसली सालचा कजालीचा मक्ता परगणे मलकापुर व परगणे नांदुरे येथील तुमचे आमचे सरकतींत असून त्यांत खर्च वजा जाता २२२७८१५८६ नफा राहिला यांत तुमचे च्यार आण्याबद्दल ५९६८१४८६ वजा जाता बाकी आमचेहिशाबदल १६८०८१५८६ व पेशजी आम्ही दिल्ही होती त्यापैकीं रक्कम येणें राहिली ती व्याजाबद्दल रुपये १५७१८२८६ येकूण रुपये ३२५२८४८३ यांत तुम्हाजवळ ताकडे कांहीं रुपये असून कांहीं लोककडे येणे होते तेही तुम्ही वसूल केले ती रक्कम.

२ सन १२७९ सालचा तालुके मलकापुर येथील कजालीचा व अफू गांजाचा व विषयुक्त पदार्थाचा मक्ता सरकारांतून घेतला त्याकरितां आम्ही पेशजी रुपये ५५०० दिले व शिवाय सदरहु मक्तयांत जो नफा झाला त्यापैकीं आमचे निमे हिशाबदल रक्कम.

३ सन १२८० सालचा तालुके मलकापुर येथील व तालुके चिखली येथील कजाली अफू गांजाचा वगैरे मक्तयांत जो नफा राहिला त्यापैकीं आमचे सहा आण्याचे हिशाबदल रक्कम.

येणेप्रमाणें तीन रकमा आमच्या तुम्हाकडेस येणें असून सन १२७८ फसली सालांतील लोककडेस येणे राहिलेली रकम तुम्ही वसूल केली त्याबद्दल व सन १२७९ सालचे मक्तयाबद्दल कुलखागवण खर्च व नफ्याबद्दल व सन १२८० सालचे मक्तयाची कुलखागवण व खर्च नफ्याबद्दल हिशेब आम्हास समजाऊन देऊन हिशेबाअन्वये आमची रकम निघेल ती आम्हास द्यावी. म्हणून तुम्हास कितीकवळां पत्र लिहिलें परंतु अद्यापर्यंत तुम्ही उलगडा करित नाहीं व हिशेब समजावित नाहीं हे गैरवाजवी आहे यास्तव तुम्हास या लेखावरून नोटिस देण्यांत येते कीं आजतारखेपासून आठ दिवसाचे आंत तुम्ही अकोल्यास येऊन हिशेब समजाविल्यास उत्तम आहे हितरसन १२७८ फसली सालाबद्दल नफकबुल्यात येईपर्यंत जितके दिवसलागतील तितके दिवसाचा कीराया दरेन ऐक रुपया प्रमाणें तुम्हांस द्यावे लागेल व घर कफ्याल घेण्याबद्दल दिवाणीकेर्टांत फिर्याद करण्याचा जो खर्च येईल तो वकीलाचे बक्षीससह तुम्हास द्यावा लागेल कळावे. तारीख १० माहे सप्टेंबर सन १८७० इसवी मुकाम अकोले.

(सही) कादरभाई महमदभाई बोहारी दुकान अकोले

जाहिरात.

किमतीचे दराव.

वर्षाची आगाऊ देणारास	१	
साल अखेर	७	
सहा महिन्याची आगाऊ	१	८
एक अंकास		९

या शहरा बाहेरील लोकास वर्षाचे १२ आठवडयांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व साल अखेर १ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून १ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांनीही आंचा मागील हिशेब सफल नवें साल चालू होई तेपून १ महिन्याची मुदत समजावी.

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत	१ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस	०१८
इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस	०१

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible their subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

Proprietors of Berar Samachar

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कांहीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरु केलें त्यास अद्यापि वर्ष होऊन गेलें तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहिल्याची तसदी आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्र तेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व दिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं

वऱ्हाडसमाचाराचे मालक

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें ठरवून ज्या लोकांनीं आमचेकडची मागील मुदतून गेल्यासाला वहलचे किंवा येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहादररुपयास आणें आणा प्रमाणें आंस व्याज द्यावें लागेल. ता १ माहे आक्टोबर सन १८१८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकाकरितां छापून प्र. केलें.

वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL 5 AKOLA: —SATURDAY EVENING— SEPTEMBER 17, 1870 NO 8

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १७ माहे सप्तंबर सन १८७० इ०. अंक ३८

हिंदुस्थानची माहिती.

विलायतेस नुकतेंच हिंदुस्थानच्या देशस्थितीचें एक पत्रक तयार झालेलें प्रसिद्ध केलें आहे त्यावरून कित्येक उपयोगी गोष्टींची माहिती होते ती आम्हीं आपल्या वाचकांस कळवितों:—

हिंदुस्थानांत जितक्या प्रांतावर इंग्लिश सरकारचा अंमल आहे त्यास ब्रिटिश इंडिया असें म्हणतात त्याचें क्षेत्रफळ ९,१०,८५३ चौरस मैल आहे. व त्यांत १५,५३,४८,०९० मनुष्यें आहेत. हिंदुस्थान सरकारच्या आश्रयाखालीं नेटिव संस्थानें आहेत त्यांचें क्षेत्रफळ ६,४६,१४७ चौरस मैल आहे व त्यांत ४,१२,४५,८८८ लोक आहेत. परदेशीय लोकांचीं हिंदुस्थानांत कांहीं राज्ये आहेत त्यांतील फ्रेंच राज्याचें क्षेत्रफळ १८८ चौरस मैल व त्यांत २,०३,८८७ लोक आहेत. पोर्चुगीस म्हणजे फिरंगी लोकांचें राज्य १०६६ चौरस मैलांचें असून त्यांत ३,१३,२६२ लोक आहेत. व हे सर्व मिळून एकंदर हिंदुस्थानचें क्षेत्रफळ १५,५८,२५४ चौरस मैल व लोकसंख्या २०,२१,११,१२७ आहे. सन १८६९ चे मार्च अखेर जें हिशोबी साल पुरें झालें त्या वर्षाची हिंदुस्थानची इंग्लिश राज्याची जमा ४९,२६,२६,९१० रुपये व खर्च इंग्लंडातील व हिंदुस्थानातील मिळून ५३,७०,६८,३०० रुपये झाला म्हणजे ४,१४,४१,४३० रुपयांची तूट आली. (ही तूट चुकीनें आकारली होती. व तीस लक्ष रुपये फाजिल राहिले असें पुढें कळलें आहे. व ख० क०) सरकारास कर्ज आहे तें १,०२,८१,६१,८९० रुपये. व त्याचे व्याजाकरितां वार्षिक रकम द्यावी लागते ती ५,०२,५०,१४० रुपये. मागील दहा वर्षांचे हिशेब पाहतां या वर्षातील जमा, खर्च कर्ज. आणि व्याज हीं सर्वच अधिक आहेत. या वर्षांत हिंदुस्थानांत जलमार्गानें माल व खजीना ५०,९४,३१,९१० रुपयांचा आला व हिंदुस्थानांतून ५३,७०,६८,३०० रुपयांचा बाहेर गेला. व्यापाराकरितां सन हिंदुस्थानांत ३५,७७,३७,६७० रुपयांचा आला. त्यांत कापसाचें कापड १५,४८,३४,७६० रुपयांचें, कापसाचें सूत २,५३,१६,५६० रुपयांचें, धातूचें सामान कारागिरीचें व साधे ३,२१,१४,०८० रुपयांचें, कारागिरीच्या धातूचें ४५,१३,७९० रुपयांचें, रेल्वेचें सामान १,५२,१७,८०० रुपयांचें, यंत्रें ७३,०२,९५० रुपयांचीं, कच्चें रेशीम ७०,३८,४०० रुपयांचें, रेशमी कापड ३८,१८,३६० रुपयांचें, ऊर्णावस्त्रें ७२,२२,९२० रुपयांचीं, पोषाक ४८,३५,५१० रुपयांचें, जवाहिर ३७,०६,३७० रुपयांचें, बक्षार ६८,३४,५६० रुपयांचे आले. माल बाहेर देशीं गेला त्यांत कापुस १९,७०,७८,७७० रुपयांचा कापसाचें सूत वगैरे माल १,३२,९९,४४० रुपयांचा, अफू १०,६९,५१,५४० रुपयांची, रंग ३,०२,३१,४६० रुपयांचे धान्यें व द्विदळें २,६५,०८,९८० रुपयांचीं, ताग व तागाचें कापड २,०७,३२,४२० रुपयांचें, कच्चें रेशम १,२१,९४,१८० रुपयांचें, बीनें १,९२,७९,८९० रुपयांचीं, काफी १,११,२०,२७० रुपयांची, कातडीं १,२३,०९,३२० रुपयांचीं, चहा ९०,४५,१९० रुपयांचा, हस्तिदंत व हस्तिदंती सामान २२,४८,०२० रुपयांचें, व सोरमीठ ३१,०७,५७० रुपयांचें गेलें. सरकारी टंकसाळींतून रुप्याचें नाणें ५,४५,७०,८३० रुपयांचें पाडिलें. सरकारी नाटी १०,१४,५५,३३० रुपयांच्या प्रचारांत आल्या. पब्लिक वर्क्स खात्याकडे खर्च सात कोटि च्यार लक्ष रुपयांचा झाला. व शाळा आणि कालनें यांकडे खर्च ५९,०४,५२० रुपये झाला. याप्रमाणें माहिती आहे.

वतनदार.

ह्याविषयावर विचार करण्याचा प्रसंग आला आहे. कारण ह्याविषयींची वाटावाट करण्यास सरकारचे मोठमोठे कामदार कोणे एके ठिकाणीं पुण्यास जमले आहेत असें समजतें. सरकारच्यामनांत त्या कामांत पुष्कळ दिवस हात घालावयाचा आहे. परंतु, ह्यांत नानाप्रकारचे घोटाळे असल्यामुळें व वतनाविषयीं लोकांची निष्ठा अतिशइत असल्यामुळें तें प्रकरण आज पावेतों तसेंच राहिलें होतें. परंतु त्याचा एकदा उलगडा करून टाकावा असा सरकारचा निश्चय झाल्या सारखा दिसतो ह्यास्तव ह्या प्रसंगी च्यार शब्द बोलून आमचें काम आह्लांस बजाविलें पाहिजे ह्यास आम्हीं आरंभ करितों.

गावांत वतनदार मुख्य २ प्रकारचे असतात. म्हणजे कांहीं सरकारचे नोकर आणि कांहीं लोकांचे म्हणजे गावचे नोकर. त्यांत सरकार निसबत नोकर आठ असामी ते हे—

१ पाटील	५ नायकवाडी.
२ कुळकरणी.	६ मजरेखोत.
३ महार.	७ नाटकर.
४ रामोशी.	८ चौघुला.

आणि गावचे चाकर चवदा असतात ते हे.

१ देशमुख.	८ यार्दी.
२ देशपांडे.	९ वकील.
३ नाडगौंड.	१० खतेब.
४ देशचौघुले.	११ सरपाटील.
५ सरदेशमुख.	१२ सरगौंडा.
६ कानी	१३ चिटणीस,
७ हेसेब.	१४ मुश्रीफ.

असो हे सर्व कामदार आतां गावीं आहेत असें नाहीं ह्यापैकीं कांहीं कांहीं आहेत पाटील आणि कळकरणी यांचीं वतनें, फार प्राचीन आहेत. म्हणजे नवीन गांवचीं वसाहत आणि पाटील व कुळकरण्याच्या वतनाची उत्पत्ती हीं फार अंतरावर असतील असें वाटत नाहीं. म्हणजे गांवचें काम सुरक्षित चालण्यास ह्यां कामगारांची मदत अवश्यक आहे असें पूर्वी होतें आणि म्हणूनच त्यांस परमान देण्याची चाल फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. परंतु, आतां काठीस सोनें लाऊन खुशाल काशीत जाण्याची जी निर्भय वेळ प्राप्त झाली आहे, तेव्हां अर्थातच अशा लोकांचा कंटाळा येणार आहे आणि ह्याप्रमाणें स्थिती प्राप्त झाली आहे. म्हणूनच आतां वतनदाराच्या हक्काचे विचार चालले आहेत.

वस्तूच्या पुरातनपणास जर कांहीं मान असेल, तर तो सर्व मान ह्या वतनास द्यावयास कांहीं चिंतानाहीं. असें आमचें मत आहे गांवच्या व्यवस्थेकरितां मागील राज्यांत कितीएक कुळास अशा कांहीं देणग्या व असें कांहीं अधिकार [illegible] त कीं, त्यांची योग्यता ल[illegible] [illegible]क संस्थानिकांबरोबर आहे असें म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं देशमुख, सर देशमुख इत्यादि जे वतनदार पूर्वी होते, त्यांचें वतन फार मोठें असे. व त्यास प्राप्तीही तशीच असे. सरदेशमुखी ही तर शाहूराजानें आपणाकरितां म्हणून दिल्लीच्या राजापासून नवीन देणगी मागून घेतली. अशी एवढाल्या माणसांनीं जा गोष्टी मिळविल्या व लोकांस दिल्या, त्यांज विषयीं पुनः शोध करणें व त्या योग्य रीतीनें दिल्या आहेत किंवा नाहींत हें पहाणें, अशा क्षुल्लक गोष्टींकडे आमच्या श्रीमान सरकारानें मन घालूनयें.

वास्तविक पाहिलें असतां हल्लीं वतनदारास उत्पन्न म्हणण्यासारखें कांहींच नाहीं. परंतु जें काय १०,१५ रु. आहे, तें त्यापलें कायमचें आहे. त्याजवर कोणी कधीं हरकत आणूं सकणार नाहीं. अशी लोकांची पूर्ण समजूत आहे. यासाठीं ५ रुपये दरमहाचें वतन उत्पन्नासाठीं लोक दरमहा रु. २५ रुपयांचें इतर उत्पन्न सोडून भांडत असतात. वतनदारांच्या २५ रुपयांच्या उत्पन्ना करितां हजारों रुपये खर्च झाल्याची उदाहरणें पुष्कळांस माहीत आहेत ह्यावरून वतनदारीवर लोकांचा हेतु किती आहे हें सहज लक्षांत येईल.

हल्लीं जांकडे वतनें चालत आहेत त्यांस तीं कोणत्या कारणावरून मिळालीं आहेत, हें बरोबर सांगतां येणार नाहीं तथापि, त्यांस कांहीं तरी सबळ कारणें असलीं पाहिजेत ह्यांत संशय नाहीं. तीं कारणें घडून गेल्यास आज बहुत दिवस झाले. तथापि तीं अविश्वसनीय किंवा निर्बळ झालीं असें समजतां कामास नये. स्वराज्याचे जागीं नर आमचे दयाळू सरकार राज्य करीत आहे, तर स्वराज्यामध्यें लोकांत जा गोष्टींविषयीं वचनें म्हणन सनदा मिळाल्या आहेत, त्यांविषयीं आतां बारीक चौकशी चालविणें प्रशस्त होईल किंवा नाहीं, ह्याचा विचार केला पाहिजे. ही गोष्ट सर्व लोक कबूल करतील कीं हीं वतनें जीं लोकांकडे चालत आहेत तीं फार प्राचीन काळापासून चालत आहेत तीं आलीकडचीं नाहींत हीगोष्ट जर खरी आहे, आणि बहुत दिवसांची वहिवाट हें हक्काच्या शाबिदीस विशेष बलवत्तर साधन आहे असें जर आमच्या सरकारच्या कायद्यामध्येंच आहे. तर सनदा वगैरे कांहीं एक आधार जरी वतनदार लोकांपाशीं नसला, तरी, त्यांची बहुत दिवसांची अखंड वहिवाट, एवढ्याच मुद्यावर त्यांचीं वतनें त्यांजकडेस चालावीं हें बरोबर दिसतें. आतां जा वहिवाटीच्या हक्काविषयीं कायदा आहे. तो रयतेसच लागू सरकारास लागू नाहीं, असें जर कांहीं असेल तर तेथें आमचा कांहीं उपाय नाहीं.

हल्लीं कितीएक ठिकाणीं असें झालें आहे कीं, खरा वतनदार एक आणि त्याचें वतन तिसराच कोणी उपटून उपभोगित असतो हें मात्र फार वाईट आहे. जा ठिकाणीं असें कांहीं झालें असेल, तेथें सरकारानें अंधी हात घालून योग्य तजवीज करावी. असा आमचा अभिप्राय आहे. मागें कांहीं चांगलीं कामें केल्यानंतर कुळाची योग्यता वाढण्यासाठीं सरकारानें जे अधिकार अथवा उत्पन्न एखाद्या कुळास दिलें असेल, तें दुसऱ्यास विकण्यास किंवा तें दुसऱ्याकडे गहाण ठेवण्यास मालकास अधिकार आहे किंवा नाहीं ह्याचाही सरकारानें विचार केला पाहिजे. परंतु हा विषय कांहीं अंशीं वेगळा आहे म्हणून तूर्त तो आम्हीं इतकाच ठेवितों.

आतां जी कमिटी भरली आहे म्हणून आम्हीं लिहिलें, त्या कमिटीस आम्हांस दोन सूचना करावयाच्या आहेत, त्या करून आम्हीं हा विषय संपवितों:—वतनदाराच्या हक्काविषयीं विचार फार मेहेर नजरेनें झाला पाहिजे. त्यांत अतिशइत कसोशी करून उपयोग नाहीं. कारण, आमचे वतनदार म्हणजे जुन्याकाळचे लोक; त्यांनपाशीं कागदपत्र किंवा सनदा म्हणजे अगदीं नशा असाव्यात अशा नीट व्यवस्थेनें ठेविलेल्या असतील, असें नाहीं. यास्तव हक्काच्या संपादनाच्या चौकशीच्या कामीं जरा ढळती नजर ठेविली पाहिजे. वतनदार लोकांस चांगले अधिकार दिलेले असले, व सरकार त्यांस चांगलें समजत असलें, म्हणजे त्यांचें वजन लोकांत पडून त्यांचे हातून गांवचा बंदोबस्त चांगला राहतो. आणि अशा प्रकारच्या लोकांचीं गरज खेडेगांवांत फार असते. ह्यास्तव अशा लोकांचा मरातब जितका राखवेल तितका सरकारानें राखावा. जा लोकांस सरकारचे नोकर समजून त्यांच्या बदल्या वगैरे कराव्या. असा सरकारचा इरादा एकदा आम्हीं मागेंए

किंवा हेतू तो खरा असेल, तर याजविषयीं आमचें सुचविणें असें आहे कीं, हा विचार ठीक नाहीं. बहुल्यानें त्यांचे मतन दारीचा मान राहत नाहीं. ह्या सूचनेकडे लक्ष पुरवून ह्या विषयाचा विचार आमची कमिटी करील अशी आशा आहे. वृ. वें.

गणेशशास्त्री मालवणकर

हें नाव अलिकडे थोडे दिवस मागें पडलें होतें तें या आठवड्यांत पुन्हा लोकमुखीं आलें. यांस खोटय साक्षीचे आरोपावरून पुण्याचे सेशनजडज्यांनीं कैदेची शिक्षा दिली होती व तिजवर हायकोर्टांत अपील करून हे जामिनावर खुले झालेले आहेत तें त्यांचें अपील गेल्या बुधवारच्या मागील बुधवारीं मुंबईस निघालें होतें व हायकोर्टानीं फेरतपास परत चौकशीस पाठविला त्याची थोडक्यांत हकिकत आम्ही कळवितों.

मि० जस्टिस गिब्ज व मि० जस्टिस कैनाल हायकोर्टाचे जडज यांच्या पुढें हा मुकद्दमा निघाला. मि० मेकफर्सन साहेब कैदीतर्फे बारिस्टर. व मि० शांताराम नारायण सरकारतर्फे वकील होते. आधीं च जस्टिस गिब्ज साहेब म्हणाले कीं, आरोपितानें आपले बचावाकरितां दिलेले साक्षिदारांच्या साक्षी घेतल्या नाहींत त्या घेण्याकरितां मुकद्दमा परत पाठवावा असें आमचें मत आहे. यावर मि० मेकफर्सन साहेब म्हणाले कीं, जे साक्षी झाले आहेत त्यांच्याच पुराव्यावरून झालेली शिक्षा रद्द व्हावी याविषयीं माझें बोलणें आहे तें कोर्टानें ऐकावें व त्यानंतर कोर्टास शिक्षा रद्द करणें बरोबर न वाटेल तर मुकद्दमा परत पाठविण्याचा हुकुम करावा. कोर्टानें त्यांस बोलण्याची परवानगी दिली. नंतर त्यांनीं जें भाषण केलें त्यातील तात्पर्य.

आरोपितानें झालेले जबानीवरून त्यावर खोटे साक्षीचा च्यार्ज ठेविला आहे, तींत शंकर भटा वरील आरोपासंबंधीं एक प्रश्न किंवा उत्तर नाहीं. हायकोर्टाच्या नियमाप्रमाणें व इंग्रेजीशास्त्राच्या आधारें तशा प्रकारानेही च्यार्ज ठेविला पेतो परंतु येथें इतकेंच सांगावयाचें कीं, आप्रासंगिक प्रश्न घालून आरोपाच्या शाबिदीचें स्वरूप कसे बनविलें आहे तें पहावें. तीं आप्रासंगिक प्रश्नांचीं उत्तरें खोट्या साक्षीच्या च्यार्जास कशी योजनापूर्वक लागू केलीं आहेत व शब्दपांडित्य कसें केलें आहे तें पहावें. जेव्हां आरोपी म्हणाला कीं, व्यंकटशास्त्र्याचे घरीं माझी जबानी घेण्याकरितां काशिनाथबाबा बरोबर मी गेलो नव्हतो. तेव्हां त्याचे या म्हणण्यांत हा मुद्दा होता कीं " जबानी घेण्याच्या उद्देशानें,, मी गेलों नव्हतों. तसेंच त्यानें म्हटलें आहे कीं" मी जाहिरात छापण्यास पाठविली नाहीं " यांत तशी जाहिरातीची माहिती त्यास असल्याविषयीं तो नाकबूल नाहीं, त्यानें ती पाठविली नाहीं इतकाच त्याचा मुद्दा आहे. व्यंकटशास्त्र्याचे घरीं त्याची जबानी होतेवेळीं आरोपी तेथें हजर होता व जाहिरातीच्या प्रती त्यानें वाटल्या असें साक्षीदार सांगतात तरी जबानी घेण्याच्याच उद्देशानें तो तेथें गेला होता व त्यानेंच जाहिरातीचा मसुदा छापण्यास पाठविला असा प्रकार कोणताही साक्षीदार सांगत नाहीं. व कैदी त्या जबानीचे वेळेस फार गोंधळून गेला होता व त्यानें माजिस्ट्रेटापुढें सर्व प्रश्नास येकच साधारण उत्तर दिलें कीं मला कांहीं आठवण नाहीं तेव्हां अशी मनाची स्थिती व सर्व कोंगास अपराधी ठरविणें निर्भय नाहीं व आणिलेला आरोप केवळ क्षुद्रक असून तो दुफळीच्या चुरशीमुळें आलेला आहे. तर नामदार साहेबांनीं याजविषयीं मनन करून कैदेचा ठराव रद्द करून कैदीस सोडून द्यावें व असे मुकद्दमे न होण्याविषयीं ताकीद द्यावी.

मि० शांताराम नारायण यांनीं उत्तर दिलें कीं, या मुकद्दम्यांत अप्रासंगिक प्रश्न मुळींच झाले नाहींत. यांत खरी गोष्ट अशी आहे कीं व्यंकटशास्त्री याजवर आरू घेतल्याचा मुकद्दमा होता त्यांत त्यानें त्या प्रसंगीं मी तेथें नव्हतो हा पुरावा करण्याकरितां तीन साक्षीदार दिले होते व कोर्टास तो पुरावा खोटा वाटला. म्हणून त्यापैकीं एक साक्षीदार शंकरभट यास कोर्टानें खोट्या साक्षीच्या कयाद्यावर सेशनांत कमिट केलें. त्या शंकरभटावरील आरोपाची पूर्व चौकशी मागिस्ट्रेटापुढें चालली असतां असें दिसून आलें कीं, तो खोटा पुरावा सत्यवक्त्यात गणेश बापुजी याचा हात आहे आणि ती जबानीवर व्यंकटशास्त्री पुण्यास ज्या घरांत रहात होते त्या घरीं झालेली आहे. त्यावरून कैदी गणेश बापुजी यास कोर्टानें प्रथम प्रश्न हा केला कीं, व्यंकटशास्त्री राहतात तो नाना तुम्हास ठाऊक आहे काय? त्यावेळेस त्यानें अगदीं कानावर हात ठेऊन स्पष्ट सांगितलें कीं मला ठाऊक नाहीं. व कोणतेही कारणाकरितां मी त्यांच्या घरीं गेलों नाहीं. हें धडधाडीत खोटें असावें. कारण फिर्यादीतर्फेच्या पुराव्यानें स्पष्ट शाबिद झालें आहे कीं निदान दोन वेळां म्हणजे एक वेळ व्यंकटशास्त्री याची जबानी घेण्यास, व एकवेळ जाहिरातीवर त्याची सही करून घेण्यास त्याचे घरीं कैदी गेला होता व त्याबद्दलची अठवण करून सांगण्याविषयीं कोर्टानें त्यास विचारिलें व त्यानें स्पष्ट नाहीं म्हटलें. व मग आडेवेढे घेऊन धड होय नाहीं, नाहीं नाहीं. म्हणजे त्याची जबानी घेण्याच्या उद्देशानें गेलों नाहीं अशा प्रकारचें उत्तर देऊन कोर्टास गोंधळांत पाडण्याचा इलाज केला. यावरून कैदी स्वतां गोंधळून गेला होता किंवा डावपेंच करित होता हें कोर्टास दिसून येईल. आणि या प्रमाणें खोटसाळपणाची जर हकीकत आहे तर मग दुफळीचा आकस सुचविण्याचें वगैरे कांहींच कारण नाहीं. फिर्यादीतर्फे जो पुरावा झाला आहे तो आरोपाचे शाबिदीस पाहिजे त्याहून अधिक आहे. सेशन जडजांनीं त्यास दोषी ठरवून जी शिक्षा दिली ती स्वतःच्या खात्रीनें दिली. कैदीवर जी आरोपाची शाबिदी झाली ती त्याजवरोबर हमेशा असणारे, त्यात जामीन होऊन सोडविणारे, व त्याकरितां बायाबाच्यानें करून झटणारे अशा लोकच्या साक्षी पुराव्यावरूनच झाली. दुसऱ्यापक्षीच्या लोकांस त्यांत कांहीं एक अधिकउणें करण्याची गरज लागली नाहीं.

एथपर्यंत शांताराम नारायण यांचें भाषण आलें तेव्हां जस्टिस गिब्ज साहेब म्हणाले कीं आरोपाचे मजबुदीकरितां हा झालेला पुरावा पुरेसा आहे. तथापि कैदीनें दिलेले साक्षीदार लोकांच्या साक्षी घेत ल्याबाचून या मुकद्दम्याचा अखेर निकाल आम्ही सांगूं शकत नाहीं. साक्षीदार आपले साक्षीनीं आमुक गोष्ट शाबिद करितील असें पूर्वीच अनुमान करण्याचा जज्जांस अधिकार नव्हता. अयोग्य रीतीचे प्रश्न केले असतां ते साक्षीदारास न घालतां कारणासहित दप्तरीं लिहून मना करण्याचा जज्जास अधिकार आहे. याकरितां हायकोर्ट आमा हुकूम करतें कीं या मुकद्दम्याचे कागदपत्र परत पाठवावे व ज्या साक्षीदारांच्या साक्षी घेणें नाकबूल केलें त्यांच्या साक्षी घेऊन मुकद्दमा पुरा करावा व इकडे परत पाठवावा.

स्टांप विकणारे वैंडर यांजपाशीं वकीलीचे स्टांप न मिळाल्या मुळें लाकडावर झाले ला निवाडा.

(दाना तीन आण्याचा)

पुणें जिल्ह्यांतील दौलता पाटील वादी यांची फिर्याद प्रतिवादी दोन स्टांप वैंडर व एक घोडनदीचे मामलेदार बापुजी पुरुषोत्तम या तिघांवर अशी कीं एक आण्याचा स्टांपकागद वैंडराजवळ विकत मागितला असतां त्यानें आण्याखालचा शिलक नाहीं असें त्यानें सांगितलें व जरुरी करितां चार आण्याचा स्टांप घेतल्यामुळें तीन आणे नुकसान झालें तें मिळावें.

यावर सरकारी वकील अशी तक्रार करितात कीं, जें आकस्मिक कारण टाळण्यासारखें नव्हतें त्यामुळें ही फिर्याद झाली आहे. आणि योग्य अधिकारी यांजला वादीनें अर्ज केला असता तर ही रकम त्याजला वसूल करतां आली असती. आणि प्रतिवादीच्या कसुरीनें ही गोष्ट झाली नाही सबब त्याजवर खर्च पडूं नये.

ज्या कोर्टांवर अवल फिर्याद केली होती ते स्टांप कागद विकणारे होते आणि सबऑर्डिनेट जज्जानें मामलेदार यांजला पक्षकार अवल त्याजवर फिर्याद केलेली नव्हती.

ठरावाचा मुद्दा.

१ खर्च कोणी द्यावा.

प्रतिवादीनें खर्च द्यावा म्हणून कोर्ट ठराव द्यावें.

ठरावाचें कारण.

स्टांप विकणारे जातीनें जबाबदार नाहींत हें उघड आहे असें कोर्टाच्या निचारास येतें. मुलकी अधिकारी त्याजला स्टांप देतात तितकेच काय ते विकूं सकतात. ह्यावरून खरोखरी म्हटलें असतां ही फिर्याद वादी व सरकार यांच दर्म्यान आहे.

जर वादीला मुलकी अधिकारी यांस अर्ज करावा लागला असता तर सन १८६७ चा आक्ट २६ परिशिष्ट (न) यातील ठरावा प्रमाणें त्यानला आठ आण्याचे स्टांपावर अर्ज द्यावा लागता अशा कारणानें उघड त्याचा तोटा झाला असता. आणि कोर्टांत आल्या शिवाय त्याजला इलाज काय करतां येत होता हें कोर्टास दिसून येत नाहीं. ही आकस्मिक गोष्ट टाळण्यासारखी नसेल परंतु या आकस्मिक गोष्टी मुळें वादीस कोर्टांत येणें प्राप्त झालें. यास्तव सरकारा कडून त्याला खर्च वादीस वसूल करण्यास अधिकार आहे असें कोर्टाच नजरेस येतें.

वादी तर्फे ३ आणे व खर्चसुद्धा हुकूम नाना केला असे. ज्ञा. च.

वऱ्हाड.

रा. रा. सखाराम दत्तात्रय यांस खामगावास तिसरे प्रतीचे तहशीलदार नेमून सेकंड क्लास सबार्डीनेट माजिस्ट्रेटचा व १०० रुपये पर्यंत दिवाणी दावे पाहाण्याचा अधिकार दिल्याचे रेसिडेन्सी आर्डर मध्यें प्रसिद्ध झालें आहे.

खामगावच्या धर्मार्थ दवाखान्यावरील डाक्टर कोलीन यांस काढून टाकिलें.

बाशिमचें मनी आर्डर आफीस फेब्रुवारी महिन्या पासून बंद झालें होतें तें या महिन्या पासून पुन्हा चालू केलें व मि. वेकटचिलम यांस तेथें एजंट नेमिलें.

यवतमाळचे नायब तहशीलदार रा० तुकाराम कृष्ण यांस वणीस नेमलें. वणीचे रा० रामचंद्र हरी यांस दारव्हास नेमिलें व दारव्हाचे रा० पुरुषोत्तम पांडुरंग यास यवतमाळास नेमिलें व त्याप्रमाणें त्रिवर्ग आपआपले कामावर जाऊन रुजू झाले असें कळतें,

अमरावती—या आठवड्यांत पाऊस न पडून सावलींत पारा ८८।९० अंशावर असतो. गरमी फारच होते. एखादे वेळेस आकाश आच्छादित असतें. त्या वेळेस तर गरमीची परमावधीच होत. परंतु इतकेंच चांगलें आहे कीं, सध्या पाऊस न पडला तरी पिकास नुकसान नाहीं.

पोस्ट आफीस—इतके दिवस पोस्ट आफीस शहरांत होतें आतां गांवाबाहेर नव्या चौकांत नवीन बांधलेल्या इमारतींत गेलें. या चौकांतील सर्व इमारती तयार झाल्या झणजे यास फारच शोभा येईल.

रा. रा. गिरिराव आण्णा हे डिप्टी कमिशनर कचेरींत आपल्या पूर्व जागेवर आलें.

मि० बापुजी रंगनाथ एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर कोर्ट कर्जा यांच्या शालकांनीं त्यांच्याच घरांतील एक सोन्याचा गोफ चोरल्याबद्दल कायद्या प्रमाणें तजविज होण्याकरितां. आरोपित व त्यांच्या संबंधाचे म्हणणे त्यास मदत वगैरे करणारे इतर लोक पोलीस मार्फत रोनिक साहेब असिस्टंट कमिशनर बढनेरा यांजकडे रवाना झाल्याचें आम्ही मागील बकात लिहून कळविलेंच आहे. सदहूं मोकदम्याची चौकशी होऊन मुख्य आरोपितास २५ रुपये टके व दागिना आटणाऱ्या सोनारास २५ फटके मारण्याची शिक्षा मिळाली. व ज्या कसाबिणीस आरोपितानें दागिन्याचा कांहीं अंश दिला होता तिजला एक महिना पांच दिवसांची सक्त मजुरीची कैद मिळाली. सदहूं कसबिणीकडून फिर्यादी यांस १९ तोळे सोनें देण्याचा ठराव मागिस्ट्रेट साहेबानीं करण्याचें आम्हीं ऐकतों. पक्का शोध लागला नाहीं. या प्रमाणें मोकदम्याचा निकाल झाला.

सदहूं खटल्यांत मुख्य आरोपितास व दागिना आटणाऱ्या सोनारास सारखीच शिक्षा मिळाली हें बेकायदा काम झालें. वास्तविक पहातां मुख्य आरोपितास फारीक शिक्षा असावी परंतु तो मोठ्या मनुष्याचा आप्त असल्यामुळें साहेबानीं त्यांनकडे दयादृष्टीनें सर्व लोकांत केलें असावें असें अनुमान होतें सोबार विचार निराळे त्यास चार धक्के

अकोला

मि० रामसेवक दीनदयाळ यांजवरील आरोपाची चौकशी १३ वे तारखेस कमि

शनर साहेबांचे आफिसांत शुरूझाली मे० ल यळसाहेब कमिशनर, मेजर जेन साहेब पोलि स इन्स्पेक्टर जनरल, व कप्ता० मेकेंजी सा हेब एथील डिपुटी कमिशनर असे त्रिवर्ग पंच होते. व फिर्याद चालविण्याकरितां मि० एलियट साहेब असि० कमिशनर यांस बुल ढाण्याहून मे. अलार्डाइस सा० नीं पाठविलें होतें. या चौकशीच्यावेळेंच कोर्ट उघडें नव्हतें असें दिसतें, कारण कोणी कोणी आंत जाऊन बसण्यास परमाणगी मागित ली असता दिली नाहीं असें समजण्यांत आलें. व त्यामुळें तथा माहिती मिळाली नाहीं, तरी त्या चौकशीसंबंधी आम्हांस जें ठाऊक झालें आहे तें आम्हीं वाचकांस कळवितों.

मि० रामसेवक यांजवर च्यार आरोप आहेत. एक, कोणार तळ्यांतील खाराचा मक्ता सरकारांतून हरासानें कांहीं लोकां नीं घेतला त्यांत यांनीं एक आण्याचा भा ग ठेविला होता. दुसरा, बडनेर ता० मलें कापुर एथील व्यंकटराव देशमुख हा ११०० रुपये लांच देत होता तो यांनीं परत केला परंतु वरिष्ठास त्याची खबर दि ली नाहीं. तिसरा, बडनेरचा बाबु शिंग देशमुख यास रमण्यापकीं कांहीं नंबर वहितीस दिले त्याबद्दल १७०० रुपये लांच ठरविला. व चवथा, बडनेरच्या जोगारमल शेट यांच्या दुकाना शीं व्यापार ठेविला व त्यापासून कर्ज घे तलें. या च्यारी आरोपबद्दलच्या साक्षी दारांच्या साक्षी १३ वे तारखेस झाल्या. १४ वे तारखेस कांहीं काम चाललें नाहीं. १५ वे तारखेस मि० रामसेवक यांनीं कां हीं आरोपाबद्दलचा जबाब दिला. व कांहीं माहितीकरितां बडनेरचे त्या संबंधाचे सरकारी कागदपत्र पाहावयास मागितले. व ते येण्यावर २० वे तारखे पर्यंत जबाबा स मुदत मिळाली. २० वे तारखेस जबाब झाल्यावर पंचाचे अभिप्रायासहित सर्व प्र करण रेसिडेंट साहेबांकडे जाईल व तिकडून लिहून येईल त्या प्रमाणें अखेर हुकुम होई ल. मुकद्दमा चालत असतां मध्यंतरीं अभि प्राय देण्यास वर्तमानपत्रकर्त्यास अधिका र नाहीं म्हणून आम्हीं स्तब्ध राहतो तरी आम्ही आपल्या वाचकांस इतकें कळावितों कीं मे० लायल साहेब बहादुर यांच्या हा तून जी गोष्ट व्हावयाची ती न्यायच होईल असा भरवसा आहे.

एथील डाक्टर नानी साहेब यांस ना गपुराकडे पाठवून डा० स्पेन्स यांस एथें नेमिलें होतें तो नेमणूक सरकारानें रद्द क रून नानी यांस एथेंच ठे[illegible]

डिपुटी कमिशनर आफिसांतील ७० रु पयांचे जागेकरितां वाशिमाहून हणमंत रा मचंद्र नावाचे मनुष्य आणविलेले एथें आले व आपलें काम पाहूं लागले.

आतांशी हवेचें मान चमत्कारिक झालें आहे. ऊष्मा मनेस्वी होतो. कधीं मधीं पा ऊसही थोडा येतो पण त्यापासून दाह मोडत नाहीं. चांगल्या पावसाची फार अ पेक्षा आहे.

देऊळगावचे राजे मानसिंग व त्यांच्या मातुश्री राणी अहिल्याबाई एथें आल्या आहे त. व त्यांबरोबर रा० रामचंद्र काशिनाथ लोंढे हे आले आहेत. यांस त्या संस्थान त कारभारी नेमण्याचा घाट आहे.

बुलढाण्याच्या रिव्हिन्यु डिपार्टमेंटचे तीर्थरूप मेहे. सयद कमालुद्दीन साहेब नागपूरहून एथें आले आहेत.

कमिशनर आफिसांत ७५ रुपये पगा राच्या क्लार्कची एक जागा रिकामी आहे दोन आठवड्यांत तीन च्यार उमेदवारांस थोडथोडे दिवस ठेवून त्यांचे कामाची प रीक्षा पाहिली परंतु अजून कोणास मुक्रर केलें नाहीं असें ऐकतों.

मागाहून आलेली नोटिस.

नोटिस—नागदेव वलद फकिरजी पटी ल रहाणार मौजे पातुर्डे तालुक ज ळगांव जिल्हा अकोलें यास उजाळाबाई वद्दे शिवनी राम अगरवाल रहाणार कलब पा तुर्डे इजकडून देण्यांत येते कीं तुझास मी तारीख २ माहे जून सन १८७० रोजीं मुकद्दमापत्र दिलें व त्या मुकद्दमापत्राप्रमा णें तुह्मीं आमच्याशीं वागला नाहीं व उल टया जोराच्या गोष्टी सांगतो याजबद्दल या नोटिसीने असें कळवितों कीं तुमचें मुक द्दमापत्र ही नोटिस दिल्या तारखेपासून र द केली आहे आपणास कळावें व यापुढें तुह्मीं आमचे तर्फे कांहीं काम केल्यामुळें आ मचें नुकसान अगर तोटा झाल्यास त्याचा जाबसाल तुम्हांस द्यावा लागेल. कळावें ता रीख १६ माहे सप्तंबर सन १८७० इस वी.

(सही) पितांबरदास वलद शिवनी राम.

वर्तमानसार

लढाई संबंधी—युरोप खंडांतील लढा ई अजून शमली नाहीं. पारिस शहरांतील राज्यकारभार पाहणारें मंडळ टावर्स एथें गेलें आहे त्यांनीं एक जाहिरनामा लाविला आहे कीं प्रशियन राजाचा संकेत फ्रेंच बादशहा बरोबर लढाई करण्याचा होता आणि बादशहा तर धरला गेला. तेव्हां अ जून ही लढाई पुढें चालवावयाची कीं का य? प्रशियन लोक फ्रान्स देशांतून निघून जातील व सुईच्या अग्रइतकाही फ्रान्सचा मुलुख मागणार नाहींत तर आम्ही तह क रण्यास सिध्द आहो. प्रशियन राजाचा या जबाब अजून कांहीं जबाब मिळाला नाहीं. इंग्लिश सरकारानें तिन्हाइती नात्यानें प्रशिया स लढाई तकूब करण्याविषयीं पत्र पाठविलें आहे. पारिस शहरावर चाल करून जा ण्याचें प्रशियाचें पाऊल अजून पुढें च आ हे फ्रेंच लोकांनीं पारिस शहरावर यावया च्या रस्त्यांतील दोन रेलवे पूल मोडून टाकि ले व शहराचा बंदोबस्त भक्कम केला आ हे. सेनापति म्याक माहन जखमेलागून म रण झाला होता तो मरण पावला. फ्रेंचा चे भारमार फौजेनें मोठाली किल्लेक ज र्मन लहानें पकडलीं प्रशियनानीं फ्रेंचाचें लायन शहर घेतलें परंतु त्यांत प्रशियन शिरताहेत तों फ्रेंचानी किल्ल्यास सुरंग करून उडवून दिला तेणेंकरून प्रशियना चा फार नाश झाला. इटालीच्या राजानें रोम शहरावर चालकरून जाण्यास आप ल्याफौजेस हुकूम दिले.

गेल्या महिन्याचे अखेर पावेतों महाब ळेश्वरास २०९ इंच पाऊस पडला व माथेरानास २८९ इंच पडला.

मद्रास इलाख्यांत कळवा पलटणी ४० आहेत. व त्या प्रत्येकींत ६०० शि पायी आहेत. त्यांतून सोळा सोळा कमी केले व ५८४ ठेविले असें कळतें.

मुंबईस मिशनरींनीं मुलींची शाळा आ ह तिजवर मिस प्राट नावाची युरोपियन स्त्री सुपिंटेंडेंट नेमिली आहे. ही योजना मि स मेरी कार्पेंटरबाईची होय.

मोरघाटांत रेलवेस अपाय होऊन कि त्येक लोक मागें मेले त्यांच्यातून जिवेकां क्या वारसांनीं मुंबई हायकोर्टांत रेलवे कंपनीवर फिर्यादी केल्या आहेत व या आ ठवड्यांत दोन पारशी जातीच्या मनुष्यांस निवाडे मिळाले. एकास नुकसान ७००० व दुसऱ्यास ९०००रु० देवविले.

रेलवे स्टेशनावरून तांब्याचें नाणें टि किटाबद्दलच पैशात घेत नाहींत. रुप्या चें नाणें मागतात हें बरोबर नाहीं असें असें बंगालसरकारापुढें जाऊन तांब्या चें नाणें घेण्यास नकार नये असा ठराव झाला.

मुंबईस इन्कमटयाक्स कलेक्टरचें काम मि० डोसाभाई फ्रामजी यांनीं चालविलें त्याचा सरकारास रिपोर्ट केला तो छापून प्रसिध्द झाला आहे त्यावरून कळतें कीं २३७६ लोकांवर कर बसला त्याचा आका र ११,८१,५९६ रुपये झाला. मुंबईची वस्ती आठ लक्षांची आहे त्यावरून माण सीं सरासरी एक रुपया पाच आणे सात पै आकार बसला.

मुंबई इलाख्याचें कायदेकौन्सल १९वे तारखेस पुण्यास भरणार होतें.

इराण देशामध्यें धान्याचा मोठा दुष्का ळ पडला आहे. कराची, मुंबई वगैरेकडून तिकडे धान्य जाऊन आमच्या हिंदुस्थाना स त्याचा संसर्ग लागणार कीं काय?

अमेरिका खंडांत विर्जिनिया प्रांतांत तं बाकु फार चांगला होतो. त्याचें बीज बर द्वानच राजानें आपले संस्थानांत आणून लाविलें आहे.

बेलोर एथें टिपुसुलतानाच्या कुटुंबांतील मनुष्यांच्या कबरा आहेत त्यांच्या दुरुस्ती करितां दीड हजार रुपये मिळाले आहेत.

येत्या नोवेंबर महिन्यापासून आगगाडी च्या वेळांत कांहीं फेरफार होणार आहेत. व मुंबई आणि कलकत्ता यांमधील जा ण्याच्या अवक शांत कांहीं अवर कमी केले जाणार आहेत.

मद्रास इलाख्यांतील निजामपुरच्या रा जानें मद्रास सरकारावर दीड लाख रुपयां चा दिवाणीत दावा केला होता त्याचा फै सल त्याविरुध्द झाला. मलबार प्रांतांती ल त्याचे कांहीं जंगलाचा वाद आहे. व त्याकरितां तो हायकोर्टास व कारण लाग ल्यास प्रिव्हिकौन्सलास अर्ज करणार आ हे.

सातारा—आकाश निरभ्र होऊन ऊन जगदीं कडक पडत आहे, आतां मघराजा नीं आठ च्यार रोजांत तरी चांगली पर्जन्य वृष्टी केली तरच पिकाचें मान बऱ्या प्र कारच्या स्थितींत राहिल असें लोक बोलूं लागले आहेत.

वाई—तालुक्याचे मामलेदार यांनवर हेशिंग यांनीं फिर्याद केली होती त्या कामांत रानिनमा होशिंग देणार आहेत असें समजतें.

मंगळवारच्या तळ्यातलें पाणी काढून लावण्याच उद्देशानें बीस बेचीस हजार रुपये खर्चून मो चर खोणिला व पैसा शि लक नसल्यामुळें तें काम तसेंच बंद पडलें तेणेंकरून चरापळीकडे राहाणारे आणि आसपास राहणारे यास मोठें दुःख भोगावें लागत आहे. शु. सु.

पुराणिकीण—नगरास भाद्रपदमासीं श्रीमत् भागवताचे वार्षिक सप्तदोत्साह होत असतात, त्याप्रमाणें सालमजकुरीं या नुष्ठानास प्रारंभ होऊन गेल्या शुक्रवारीं समाप्ति झाली. हीं अनुष्ठानें सुमारें बावन्न ठिकाणीं बावन्न पुराणिकांनीं केलीं. खास विशेष हें कीं सदहूंबावन्न पुराणिकांच्या संख्येस एक विद्वान पोक्त स्त्रिया होती. तिनेंही सात दिवस अनुष्ठान केलें. ही बाई भागवताचें उत्तम पुराण सांगते. आ णखी असें कळतें कीं तिनें स्वतः समग्र भागवत ग्रंथ लिहिला आहे. या बाईचा निर्वाह बहुत करून पुराण सांगण्यावरच चालतो. न्या. सि.

बेळगांव—मागील आठवड्यांत पर्जन्य लागण्याचीं जीं चिन्हें होतीं तीं अगदीं नाहीं झालीं होऊन कडक ऊन पडत आहे. रात्री थंडीही पडते यावरून लोकांमध्यें काळजी उत्पन्न झाली आहे. ऐन हंगामाच्या वेळेत जर पर्जन्यानें दगा दिला तर मग त्या सु खास पारावारच नाहीं.

गोकाक एथें पटकीचा आजार सुरू हो ऊन १५ | २० दिवस नाहले. आलीकडे तर दररोज १ | २ मनुष्यें तिचे पदारीं पडत आहेत, गोकाक हें गांव पटकीचें मा हेर घर आहे, म्हणूनच अशा थंड हवेत बाई नें आपला अंमल चालविला. ईश्वरकृपेनें तिचें पाऊल पुढें न जातां मागें हटो असें आम्ही इच्छितों. बे. स.

धुळे—ह्या आठवड्यांत पर्जन्य नाहीं. ह वेत फार उष्णता झाली आहे. आकाश आ च्छादित रहात असल्यानें हवा कुंद र हाते. बरसातीच आरंभास पर्जन्य जसा प डला तसा वक्तावर पडत गेला नाहीं सामु ळें पिकास व्हावा तसा गुण झाला नाहीं. पाहिल्यानें पर्जन्य अधिक झाला म्हणून गव त फार वाढलें. पिकें मोडावीं लागलीं. मो डलें पिकात पुनः पर्जन्य वेळेवर झाला नाहीं यासाठीं पेरण्या होणें राहिल्या. हल्लीं उघा डी असल्यापासून ऊन धरलात. सारांश प र्जन्य पुष्कळ होऊन उपयोग व्हावा तसा झाला नाहीं. व या कारणानें हवेतही फरक झाला. उत्तरा नक्षत्रास आरंभ होण्यापूर्वी व त्या नक्षत्रांत चांगले पर्जन्य झाल्यास कांहीं सा उपयोग होईल. धुळ्याचे हवेत प्रस्तुत वाताधिक्य ज्यास्त असल्यानें लोकांस वा यूचा आजार लागलेच उत्पन्न होतो.

नामेंबर मामलेदार माधवराव दाजी व नासिराबादचे विष्णु हरी वैद्य मामलेदार, शाहदे एथील पांडुरंग सदाशिव मामलेद र यांजला हुजूर हजर होण्याविषयीं हुकुम झाले आहेत. येण्याचें कारण शेंदुरणीकर जाह गिरदार यांची तुमाले गांवांतील कांहीं ज मावंदीत तक्रार सुरू असून त्यासाठीं बो लाविलें आहे असें समजतें.

भुसावळकर पेशवे मामलेदार यांनला ही भुसावळचे जमाबंदींत तक्रारी आहेत. सबब त्यांचे निवृत्यर्थ पाचारण झाले असे त्याचें समजतें. ला. वे.

रेलवे—"टैम्स" पत्रावरून कळतें कीं, मद्रास रेलवे लोकरच तुंगभद्रेपर्यंत सुरू होईल व ग्रेटइन्डियन पेनिनसुला रेलवे कृष्णेपर्यंत लोकरच सुरू होईल. आणि ह्या दोन्ही रेलवे रायचूर येथें सन १८७१ सालांत मिळतील.

धारचे मयत दिवाण रघुनाथ नारायण गुणे यांची विधवा जानकीबाई व तिच्या च्यार मुलींपैकीं तीन मुलींचीं लग्नें झा लीं आहेत. चौथी मुलगी मथुरा ही ६ वर्षां

यांच्या विधवेने विनायक नांवाचा आपल्या कुळांतलि एक मुलगा दत्तक घेतला. या दत्तक मुलाने आपणास, आपल्या आईस, व आपल्या अविवाहित बहिणीस रेलवे कडून नुकसान मिळावे म्हणून फिर्याद आणली. या फिर्यादीचा निकाल हायकोर्टाचे चीफ जस्टिस वेस्ट्राप साहेब यांनी तारिख २९ आगष्ट रोजी केला. मुद्दे ४ होते. त्यांपैकी रेलवे कामदारांच्या हयगईमुळें अपघात झाला याप्रमाणें मनबूदा पुराना असून ती गोष्ट रेलवेनें कबूल केल्यामुळें प्रथमचे दोन मुद्दे सोडून दिले. दुसरे दोन मुद्दे—दत्तक मुलाचा नुकसानी विषयीं हक्क पोचतो कीं काय; व त्यास गुणे यांच्या विधवेकरितां नुकसान मागण्याचा हक्क आहे कीं काय? यांत पहिल्या मुद्याचा निकाल केला कीं, दिवाण यांनीं दत्तक घेण्यास आज्ञा दिली नव्हती पण त्यांनीं दत्त घेण्याविषयींही आज्ञा दिली नव्हती. तेव्हां इकडे ने हिंदुशास्त्राचे नियम चालू आहेत त्याप्रमाणें दत्तक झाला हें कायदेशीर झालें. विनायक हा, दिवाण मरण पावले हें समजून उमजून दत्तक झाला व त्याच्या बापानेंही मान्यता दिली. येणेंकरून त्याचें नुकसान कांहीं झालें नाहीं. उलट त्यास दिवाण यांच्या मिळकतीवर हक्क मिळाला हा त्याचा फायदाच झाला. सन १८५५ चा कायदा १३ अशा प्रकारच्या नुकसानविषयीं झाला आहे त्यांत "मुळें" या शब्दाची परिभाषा दिली आहे; त्यांत दत्तक मुलगा गणलेला नाहीं, इत्यादि कारणावरून विनायक याचा हक्क नुकसानास पोंचूं नये. दुसऱ्या मुद्याचा निकाल असा केला कीं, विनायक हा दिवाणाचा दत्तकपणाच्या संबंधानें कायदेशीर प्रतिभू आहे; तेव्हां त्यास आपल्या आईकरितां व बहिणीकरितां नुकसान मागण्याचा हक्क आहे; व त्यांस नुकसान मिळणें रास्त आहे. हें नुकसान किती मिळावे याबद्दल विचार; त्यास, दिवाण दोन हजार येथे २५० रुपये पगार होता. ज्यास इतकी ताहा हा यात दरमाहा प्राप्ति असते, तो दिवाण यांच्या म्हणते ४० वर्षांचा वयाचा असला तर त्याच्या कुटुंबास ४० हजार रुपये नुकसान मिळावे असा इनशुरन्स कायदा आहे पण तो कायदा या कजांत लागू नाहीं कारण दिवाण यास कोणत्याही वेळीं हार सरकारांतून रजा झाली असती, तेव्हां त्याची प्राप्ती तहा हायात नव्हती. पण गुणे हे विद्वान असून लोकांत त्यांचें वजन चांगलें होतें. यासाठीं जरी त्याची चाकरी गेली असती तरी त्यांनीं कांहीं प्राप्तीचा धंदा केला असता. याकारणाचा वगैरे विचार करून त्यांची विधवा जानकीबाई इला सात हजार व मुलगी मथुरा इला तीन हजार नुकसान रेलवेनें द्यावें. व हा पैसा वादीचा मुखत्यार, गुणे यांचा जावई कृष्णाजी सिद्धेश्वर व त्याचा मुखत्यार वि. नारायण बाळकृष्ण ऊर्फ रावजी भाजेकर यांनीं आपसात निमानिम वांटून घेण्याबद्दल ठराव केला आहे असें त्यांच्या मुखत्यारनाम्यावरून कोर्टास दिसलें. त्या मुखत्यारनाम्याबद्दल बाईची सहीही नाहीं. यासाठीं तो पैसा तिच्या हातीं पोंचता करण्याविषयीं रेलवे कंपनीस हुकूम झाला. ही मुखत्यार पत्रें अयोग्य आहेत असेंही जज्जांनीं आपलें मत प्रदर्शीत केलें,

नोटिसा

नोटिस—कादरभाई वल्द महमदआली बोहरी दुकान आकोटें यास खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येते ऐशीनें तुम्ही तारिख १० सप्तंबरचे वर्तमानपत्रांत आम्हास नोटिस दिल्ही ती आम्हास अद्याप पावली नाहीं पण परस्पर मालूम झाली आहे सबब तिचें उत्तर देतो तें—सेखलाल वल्द खाडजी साबुन्यार याचे मकान आम्हापासी गिरवी आहे त्या गिरवीखतांत सेखलाल याची असी शर्त आहे कीं पाच वर्षें पावेतों घर तुमचे (आमचे) कबजांत राहील व पुढें आम्ही रुपये देऊ आणि घर सोडवून घेऊ. यास्तव जरी आणीं तुम्हास खरेदी दिल्ही असेल तरी खरेदी पूर्वीं जी त्याणीं गिरवी खतांत शर्त केली आहे तीरद होत नाहीं आणि पूर्वींची गिरवीची असलेली शर्त मान्य करून तुम्ही खरिदी घेतलें असें होतें. कारण गिरवीची खबर खरिदी पूर्वींच तुम्हांस मालूम झालेली आहे तेव्हां गिरवी खतांतील मुदत संपे पावेतों मकान कबज्यांत मागण्याचा हक्क सेखलालास मुळी नाहीं तेव्हां त्यापुढें तुम्ही खरिदी घेतलें असलें तरी तुम्हांसही तसा हक्क येत नाहींच मुदत सरल्यावर रुपये देऊन मकान सोडविण्याचा हक्क सेकलाल यास अगर त्याचे तरफ कोणासही आहे त्याप्रमाणें मुदती नंतर कोणीही रुपये देईल तर मकान परत देण्यांत येईल याखेरीज तुमचे नोटिशीप्रमाणें भाड्याची वगैरे कोणतीच जबाबदारी आम्हावर नाहीं सबब ह्या नोटिसीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल हें तुम्हांस कळावें तारीख १४ सप्तंबर सन १८७० इसवी.

(सही) तेजराम नेठमल दस्तुर खुद.

नोटिस—व्यंकटराव व हरबाजी शिवराम देशपांडे परगणे फतेखेडे यास खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं आम्ही सन १२७५ फसली साली परगणे मजकूरच्या आंबराईचा हरास चार इसमांनीं मिळून सरकारांतून घेतला पैकीं जानकळ येथील आंबराईची व्यवस्था आम्ही आपले मार्फत करून त्रिवर्ग सर्कती यांचें आमचें बनेना सबब त्यांचे हिशाचा तंटा साफ करून बाकी परगण्यातील एकंदर गावचा तुमचे आमचे विचारे निमे निम हिशा ठरला नंतर गांवकरी पाटील व बागवान लोकांनीं आंबराया उतरल्यावर तुम्ही व आम्ही त्यांस बोलावणें करून पैसा एकंदर रक्कम तुमचे पाशी जमली त्याचा तपशील:—

६० मौजे असोळें.
१२५ मौजे कोळोरे.
६० मौजे दरेगांव.
४० तांदुळवाडी.
७५ मौजे अंबळवाडी.
८० मौजे शिवणी.
८० मौजे आलि.
५० मौजे सावखेड.
९० मौजे मुरादपूर.
१५० मौजे मोहाडी.
२५ बोडखी कांबगी.
७५ बिसरूळ चिंचखेड.
१२० मौजे गागलगांव.
२५ मौजे हिवरे.
१० मौजे उमणगांव.
१०० कसबे फतेखेडे येथील महालक्ष्मी.
७५ फतेखेडे येथील गळा व खड.
६० अवळीमळा फतेखेडे.
१५० आंठरे.
४० बायगांव.
३० गुंजाळा.
५० टेंभारे बोरगांव.

१५७०

येणेंप्रमाणें पंधराशें सत्तर रुपये व शिवाय गावचाळे लोकांनीं माल उचलून नेला त्याबद्दल आमचे व तुमचे शिपाई मार्फत बोलावणें करून त्या लोकांकडून उक्ता ठराव करून उगवणी केली ती अशमासे रुपये ४३० एकूण रुपये २००० ची रक्कम त्या वर्षीं तुमचे जवळ आलामत असोन फक्त तुमच्या व आमचा हिशेब होणें राहून पैसा निमे हिशाप्रमाणें वाटून घेणें राहिला आहे. तो आपलेस द्यावा परंतु आमचे कुटुंब निर्वाहाकरितां आम्ही मुलें लेकरांच्या अडचणीस्तव आपले घरीं निघून आलों येते समयीं हमेशाचा रोहिला मेहेरबान र याजवर तुम्ही सवाईक रुपयांपैकीं रुपये १५० याचा अकडा आम्हास दिला आणि आम्हास सांगितलें कीं हरास संबंधी कागद पत्र असतील ते घेऊन यावे आणि हिशाची रक्कम जमा जहाल्ली वाटून घेऊ त्यावर कागद पत्र तुमचे हवाली केलें आणि आमचें कुटुंब पडल्यामुळें व घरचे तारांबळीमुळें आमचे येणें झालें नाहीं नंतर एक महिन्यानें आम्ही तुम्हाकडे आलों त्यावेळेस तुम्ही आम्हास म्हणलें कीं आपण कुळाचे हिशेब होणें आहेत त्याचा निकाल जहाल्यावर व राहिलेले कुळांवर फिर्याद करून पैसा उपन्न जहाल्यावर हिशेब करून पैसा तुमचा तुम्हास देऊ. नंतर पुढें आम्ही पैसा मागत गेलो आणि तुम्ही चाळवीत गेला असा दोन वर्षें जहाल्यावर तुम्ही कांहींच ठिकाणा लागू द्याना असें जहाल्यावर मौजे आली येथील आंबराईबद्दल सरकारांत फिर्याद केल्यावर रुपये ४० चा फैसल जहाल्याबद्दल आली येथील दर्याजी पाटील यांचे नांवें फैसल होऊन ते ४० रुपये मी घेतले. कावखेडें येथील आंबराईबद्दल ५० रुपयांची फिर्याद दिली त्यांत हरबाजी शिवराम देशपांडे यांची व नाटुमिया देशमुख अशा उभयतांच्या साक्षी हे त्या त्यांत तुम्ही खोटाईकरून साक्ष नरोबा दिली नाहींत. यामुळें माझे खर्चाचे वगैरे मिळून ३५ रुपयांचें नुकसान जहालें हल्लीं आमचे तुम्हाकडेस रुपये २००० पैकीं एक हजार येणें. पैकीं अत्री बद्दल रुपये ४० वजा जातां बाकी रुपये ९६० व कावखेडे येथील खर्चाचे नुकसानीबद्दल रुपये ३५ एकूण रुपये ९९५ ही नोटिस पावले दिवसापासून २० दिवसाचे आत व्याजासुद्धां आणून द्यावे नाहीं तर हाच पुरावा सरकारांत देऊन रीतीप्रमाणें तुम्हावर फिर्याद करू. आणि अलाहिदा तुम्ही आम्हास बोडक्ष रुपयांचा अकडा दिला होता त्याबद्दल तुम्ही आम्हापासून जो पुर्जा घेतला आहे त्याचे व्याज मुद्दलसुद्धां रकम वजा घेऊन तुमचे रुपयांचा सदरहू लिहिल्याप्रमाणें निकाल करून नर करितां आताही तुम्ही पूर्वीप्रमाणें चाळाचाळ कराल तर आम्ही बिलकुल ऐकणार नाहीं आणि या नोटिशीबद्दल जो खर्च होईल तो ही कायदा मिळविला जाईल कळावें तारीख ३ माहे आगष्ट सन १८७० इसवी मुकाम जानेफळ.

(सही) ननुखा वल्द सुलायतखा निशाणी हातची खुद.

जाहिरात.

किमतीचे दराव. रु. आ.

वर्षाची अगाऊ देणाराला... ...१
डाक अलेर ७
सहा महिन्याची अगाऊ ३ ८
एक अंकाला १

या बाहेरा बाहेरील लोकांस वर्षाचे १२ आठवडयांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व डाकअलेर १ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र देण्याचे सुरु तारखेपासून १ महिनेपर्यंत असजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होतें तेपून १ महिन्याची मुदत असजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस . १८१
इंग्रजी नोटिसीचे दर ओळीस ८१

एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास, दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible their subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

Proprietors of Berar Samachar

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बाजूस लिहिण्यास फार चांगलें. निशान मनुष्यांचीं व गावांचीं नांवें तरी बाजूस असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरु केलें आज अडीच वर्षें होऊन गेलीं तर अजून मजूर न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हास मदत करावी. उदीर करून त्या योगें वारंवार पत्रें लिहिण्याची तसदी आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यास ही विनंती आहे. व दिलेला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं

वऱ्हाडसमाचाराचे मालक

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून त्या लोकांनीं आजबद्दलची व मागील गुदरून गेल्यासाला बद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहाहररुपयास अर्धे आणा प्रमाणें आज व्याज खर्चे लागेल. ता १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकाकरितां छापून प्र. केलें.

वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL 5 AKOLA:—SATURDAY EVENING— SEPTEMBER 24, 1870 NO 39

स्तकप ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २४ माहे सप्तंबर सन१८७० इ०. अंक ३९

मराठी संस्थानांतून रेलवे.

हिंदुस्थानावर कराचे वगैरे बोजे गैरशिस्त रितीनें बसताहेत हें वाईट आहे तरी याच काळांत आमचे लोकिवलोक व इतरही सामान्य प्रतीचे नव्हत, राजे किंवा संस्थानिक देशसुधारणेच्या कामीं उत्साहपूर्वक लक्ष देण्यास सिद्ध झाले आहत म्हणून त संबंधी आनंद अशा दिलगिरीच्याही दिवसांत आमच्यानें व्यक्त करून दाखविल्यावाचून राहवत नाहीं.

ग्रेट इंडियन पेननसुला रेलवे सोलापुराकडून मद्रासेकडे गेली तिच्या वाटेवर कलबुर्गा शहर आहे व तेथें आगगाडीचें स्टेशन आहे. तेथून हैदराबाद सुमारें पाऊणशें कोस आहे. हैदराबादेस जाण्याचें व तिकडून महाराष्ट्र देशांत येण्याचें तेंच हल्लीं स्टेशन झालें आहे. म्हणून इंग्लिश सरकारचे मनांत आलें कीं, सरकारी रेलवे कलबुर्ग्यापासून हैदराबादेपर्यंत करावी व ती रेलवे बांधण्यास जो खर्च लागेल त्यापैकीं निमा तरी खर्च निजाम सरकारानें द्यावा. याविषयीं त्या सरकारास विलायत सरकारचे सूचनेवरून पत्र लिहिलें. त्या दरबारीं नामदार सर सालरजंग साहेबांसारखे मुत्सद्दी दिवाण असल्यामुळें त्यांनीं अर्धाच काय पण सर्व खर्च हैदराबाद संस्थानांतून देण्याचें कबूल केलें. या कामाकरितां सुमारें एक कोटि रुपये खर्च लागेल असा अनमास केला आहे व ती रकम निजाम सरकार आपले दरबारांतून व राज्यांतल्या सावकार लोकांकडून वर्गणानें जमा करून देणार. व रेलवेवर मालकी आपली ठेवणार. रेलवे तयार करण्याचें व तिची व्यवस्था राखण्याचें काम निजाम सरकारानें इंग्लिश सरकारकडेसच सोपविलें आहे. परंतु त्यांवर देखरेख ठेवावयाची ती निजाम सरकारचे हुकुमानें रेसिडेंट साहेबांनीं ठेवावी असें ठरलें आहे.

या रेलवेचें ओझें इंग्लिश सरकारावर किंवा हिंदुस्थानचे जमाबंदीवर बिलकुल पडलें नाहीं. यांबद्दल हिंदुस्थान सरकारास व विलायत सरकारास फार आनंद व समाधान झालें व तत्सूचक त्यांनीं त्या दरबारास पत्रें लिहून त्यांचे आभारही मानिले.

याचप्रमाणें दुसरी रेलवे खांडव्यापासून इंदूरपर्यंत करविण्याचे कामीं होळकर सरकारांनीं इंग्लिश सरकारास मदत देण्याचा निश्चय केला आहे. त्यांनींही एक कोटि रुपये इंग्रज सरकारास या कामाकरितां देण्याचें याजिलें आहे परंतु ते रेलवेची मालकी वगैरे आपलेकडे ठेवित नाहींत व इंग्लिश सरकारास सदरहु रकम कर्जाऊ देऊन त्याजपासून दरसाल दरशेकडा साडेचार रुपयांप्रमाणें व्याज घेणार व नफा होऊं लागला म्हणजे निमा नफा घेणार. ही तजवीज निजाम सरकाराप्रमाणें सरदारी बाण्याची नसून व्यापारी बाण्याची दिसते तरी वाईट आहे असें म्हणावयाचें नाहीं. व देशास दोहींचाही सारखाच उपयोग आहे. होळकर सरकारानीं भांडवल एकदम न देतां साखबंदीनें सात वर्षांत देण्याचा बेत केला आहे यावर्षीं २५ लक्ष रुपये, पुढल्यावर्षीं २० लक्ष रुपये, व नंतर पांचवर्षें अकरा अकरा लक्ष रुपये देणार. या त्यांच्या चांगल्या कृत्याबद्दल इंग्लिश सरकारानें त्याचे आभार मानिले.

निजाम सरकाराकडून रेलवेची पाहणी करण्यास इंजिनियर, सर्वेयर, बंदोबस्तकरितां पोलिस वगैरेही नेमिलें व काम झपाट्यानें चालू आहे व इंग्लिश सरकारानें त्यास लवकर काम तयार करून देतों असें आश्वासनही दिलें आहे. तशीच खंडव्यापासून इंदुरापर्यंत सरासरी पाहणी झाली व आतां पर्जन्यकाळ संपतांच तिकडे ही काम चालू होईल. तरी भांडवलाचे प्रकारावरून त्याचा सात वर्षांचा बायदाच दिसतो. व होळकर सरकारचे एक कोटि रुपयानें हें काम पुरें होण्याजोगें नाहीं ह्मणून अधिक लागेल तो पैसा सरकार स्वतांचा खर्चकरणार आहे.

हीं दोन कामें आमचे देशांत या नबाब साहेबांनीं व महाराज साहेबांनीं अति उत्तम केलीं यांत संशय नाहीं यणें करून इंग्लिश सरकारांत त्यांनीं आपली योग्यता व बोज राखिला, अक्षय कीर्ति केली व दुसऱ्या राजे आणि संस्थानिक लोकांस चांगलें उदाहरण दाखविलें. आतां यांची साथ आणखीं कोण कोण करतात पहावें. शिंदे सरकारांनीं ग्वालेरपासून आग्रा पर्यंत रेलवे करविली तर महाराजांस कांहीं अशक्य नाहीं व ब्राम्हणांचीं लक्ष भोजनें भागवताचीं सहस्र दानें वगैरे परलोकसंबंधी श्रेयस्कर कर्में जशीं त्यांस अवश्यक वाटतात, तशींच इहलोकीं आगगाड्यासारखीं कर्में आवश्यक वाटलीं पाहिजेत व तसा मनावर संस्कार उठला पाहिजे. ह्मणजे हें घडणें सुलभ आहे. बडोदे सरकारानींही ही गोष्ट मनावर घेण्यासारखी आहे. व ते मनावर घेतील तर त्यांच्या औदार्याच्या विशालदृष्टींत हें कृत्य जमेंत धरण्यजोगें देखील नाहीं, केवळ साहजिक आहे. मोठी रेलवे त्यांच्या लगत्यानें गेली आहे तथापि शाखारेलवे त्यांनीं आपल्या राष्ट्रांत केल्यास प्रजेस व व्यापारास मोठें सौख्य होईल.

आतां दक्षिण महाराष्ट्रदेशाकडे वळून पाहिलें तर तिकडे रेलवेचा थोडा देखील तुकडा जवळपास नाहीं. कोणी नमुना पहावयाचा तर नकाशांत अगर चित्रांत पाहावा. सरकार हुबळीकडून सातारमार्गें धोंडच्या स्टेशनावर शाखा आणून जोडण्याचे विचारांत होतें, परंतु तो बेत त्यांनीं सोडून दिला सबब तिकडील राजे व संस्थानिक यांनीं आपल्याकडून कोशिस होईल तितकी करून रकम जमाविण्याची खटपट केली व बरचे खाल रुपये जमवून सरकारास कर्जाऊ जरी दिले तरी त्यांचें नाव व देशाचें काम होऊन मोठें महत्विक एक कृत्य उभारल्यांचें त्यांस श्रेय येईल तर या गोष्टीचा तिकडील संस्थानिकांनीं विचार करावा अशी आम्ही त्यांस शिफारस करितों.

कायद्याचा वर्ग.

पुण्यास सार्वजनिक सभा या नावाची एक मंडळी सर्व लोकांच्या हितार्थी कामें करण्याच्या उद्देशानें स्थापन झाली आहे तिनें मुंबई सरकारास नुकताच एक अर्ज केला आहे कीं कायद्याचें ज्ञान शिकावयास महाराष्ट्र देशांत मुंबई बाहेर कोठें सोय नाहीं. व त्या ज्ञानाची फार आवश्यकता आहे याजकरितां सरदार व जहागिरदार लोकांनीं राजपुत्र डयूक आफ एडिंबरो, यांचे स्मरणार्थ सुमारें ३५००० रुपये फंड जमविला आहे त्याच व्याजावर एक कायद्याचा वर्ग पुण्यास काढावा. व तितकी रकम पुरी होणार नाहीं म्हणून त्याच्या भरतीस लोकल फंडांतून व मुनसिपल कमिटीकडून कांहीं रकमा द्याव्या. कारण हें काम विद्यावृद्धीचें व लोकोपयोगाचें आहे.

आमच्या मतें हा अर्ज या सभेनें उत्तम केला. कायद्यासंबंधीं ज्ञान मिळविण्याचें साधन पुण्यासारख्या शहरांत अवश्य असावें. अशी बहुत दिवसां पासून अपेक्षा आहे. व ती पुरी होण्यास याप्रसंगीं साधन ही घरें दिसत आहे. इतकेंच कीं सरकानें मेहरबानीची नजर पुरविली पाहिजे.

पीनलकोडची सुधारणा.

आमच्या देशांत इंग्रज सरकार आल्यापासून जे कित्येक उपयोगी व निरुपयोगी कायदे झाले आहेत त्यांमध्यें इंडियन पीनलकोड ह्मणजे हिंदुस्थानांतील अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा हा फार उत्तम. त्यांत बुद्धी, ज्ञान, व विद्या हीं उत्तम दिसून येतात. कायद्यामध्यें हें एक केवळ रत्न आहे अशी त्याची ख्याती आहे. लार्ड मेकोलेसारखे थोर थोर विद्वान त्याचे कर्ते होते त्याप्रमाणें फलही झालें आहे. फार तर काय पण विलायतेचा फौजदारी कायदाही त्या आमच्या कायद्याच्या अनुरोधानें हळू हळू बदलेल असें बोलतात. त्या प्रकारची त्या कायद्याची एकंदरींत थोरवी आहे. तेव्हां ती जितकी राहील तितकी राखणें सरकारचा धर्म होय व तसें करण्यापासून त्यांस फायदाही आहे. तसेंच त्या थोरवीवर जर कांहीं कालिमा येण्याचा संभव दिसत आहे तर ती दूर करण्याकरितां परिश्रम करणें हें वर्तमानपत्रकर्त्यांचें व दुसऱ्याही देशहितेच्छु लोकांचें कर्तव्यकर्म होय. हें मनांत आणून पीनलकोडास कालिमा लागण्याचा जो प्रस्तुत प्रसंग आला आहे त्या संबंधानें पुष्कळ थोर थोर व विद्वान् गृहस्थांनीं जरी लेख लिहिले आहेत तरी त्याविषयीं चार शब्द बोलल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

इंग्रज लोकांचा साधारण डौल असा आहे कीं, जेथें ह्मणून आमचा अंमल आहे तेथें स्वतंत्रता आहे. त्यांचे मोठमोठे विद्वान न्यायाधीशही उघड कोर्टांत असें बोलतात कीं, जिकडे जिकडे इंग्रज जातात तिकडे तिकडे त्यांचे पाठीमागून त्यांचे कायदे, स्वातंत्र्य हींही जातात. अशी नेहमी इंग्रज प्रौढी मारतात व पुष्कळ अंशीं असा डौल करण्यास त्यांस योग्य कारणही आहे ह्यांत संशय नाहीं. पहा कीं आमच्या देशांत तर काय पण सुधारलेल्या युरोपांतील कित्येक सुधारलेल्या राष्ट्रांतही सरकारास दूषण देण्यास कोणास परवानगी नाहीं. सरकारच्या संबंधानें जर एखादा निबंध एखाद्या वर्तमानपत्रकर्त्यास छापणें झालें तर सरकारानें जो एक त्या कामावर अधिकारी नेमला असेल त्यास तो निबंध पाहिल्यानें दाखवावा व त्यानें तो मान्य केला तर छापावा, नाहीं तर छापूं नये. अशी युरोपांतील कित्येक देशांत चाल होती व अद्याप ती अगदीं नाहींशी झाली आहे असें आम्हास माहीत नाहीं. ही कित्येक देशांची स्थिति आहे पण इंग्लंडांत पाहिलें तर ह्यांतील कांहीं नाहीं. तेथें सरकारविषयींही इमानानें कांहीं बोलण्याचा रयतेस अधिकार आहे. तद्वत्च हिंदुस्थानांत ही आजपर्यंत आहे. सरकारच्या कृतीविषयीं जें वाटेल तें बोलण्याची मोकळीक जी इंग्रज सरकारानें दिली आहे तिनबद्दल सर्व प्रकारचे, सर्व मतांचे लोक त्यांची तारीफ करतात व त्यांच्या ह्या औदार्यास वाहतात. तसेंच जेथें सरकार व रयत एकच आहे असा जो इंग्लंडदेश तेथें जर ही मोकळीक उपयोगी पडते तर जेथें रयत व सरकार निराळीं आहेत, जेथें रयतेचें नफा नुकसान तिनें सांगितल्यावांचून सरकारास चांगलें समजण्याचा संभव नाहीं, अशा ह्या हिंदुस्थान देशांत तर तिचा दसपट अधिक उपयोग घडतो हें स्पष्ट आहे. ह्याप्रमाणें ह्या आमच्या देशांत आज पर्यंत इंग्रज सरकारानें कृपा करून ही मोकळीक चालविली आहे, परंतु लिहिण्यास दुःख वाटतें कीं, आतां ह्या मोकळिकीस लोप बसण्याचा संभव दिसतो. मि० स्टीफन साहेबानीं नव्या निबंधांत जें एक ह्या संबंधी कलम घातलें आहे त्यावरून ह्या वरील कल्पना आम्हास सुचल्या. बाहेरून दिसण्यांत ह्या कलमांत कांहीं वाईटपण नाहीं व स्टीफन साहेबांचाही मनांत वेगळा घालण्यामध्यें दुष्ट हेतु आहे असें हें नाहीं. परंतु त्याचा परिणाम वर जी आम्हीं इंग्रज सरकारची देणगी ह्मणून जी मोकळीक सांगितली ती नाहींशी होईल असा आहे, ह्यांत आम्हांस बिलकुल शक वाटत नाहीं. अशी म्हण आहे कीं, कोणत्याही राष्ट्राच्या कायद्याकडे पाहिलें असतां त्या राष्ट्राची स्थिति पुष्कळ अंशीं कळते.

म्हणजे लहान पोरें मारूं नये असा जर एकाद्या राष्ट्रांत कायदा असेल अगर मनुष्यें खाऊं नयेत असा असेल तर त्या राष्ट्रांत ह्या दुर्गुणाचें प्राबल्य आहे असें अनुमान होतें. ह्या न्यायानें स्टीफन् साहेबांनीं नवीन घातलेल्या कलमाकडून जर अनुमान केलें तर असें होतें कीं, इतक्या दिवसापेक्षां आतां हिंदुस्थानांत बंड उत्पन्न व्हावें अशा हेतूनें बोलणारे व लिहिणारे फार झाले आहेत. पण हें अनुमान सर्वथा खोटें आहे हें जास्त लक्षांत नेटिवांची यत्किंचित् माहिती आहे त्यास वाटल्यावांचून राहणार नाहीं; एक तर आमच्या देशांत लिखारी किंवा विद्यास्थनीन फार आहेत असें नाहीं. पूर्वी जसे ग्रीक लोकांत पुष्कळ वक्ते होते तसे आमच्या देशांत कधींच नव्हते व अद्यापही आहेत असें नाहीं. कदाचित बंगाल्यामध्यें जर कांहीं थोडे असतील तर ते इंग्रजी शिकलेले व इंग्रजी राज्याचे हितचिंतक असले पाहिजेत. तेव्हां राज्यांत बंड उत्पन्न व्हावें अशा रीतीनें बोलणारे वक्ते हिंदुस्थानांत नाहींत म्हटलें तरी चालेल व त्याच कारणानीं असे लिहिणारेही नाहींत ह्मणण्यास हरकत नाहीं. बरें कदाचित असे वक्ते व लिहिणार आहेत असें घटकाभर म्हटलें तरी ही त्यापासून भय नाहीं. कारण आमचे लोक इतके गरीब आहेत कीं, एकादें भाषण ऐकून अगर लेख वाचून हिंदूलोक चेततील व बंड करतील असें मानणें म्हणजे मुंगळा गुळाची ढेप उचलून नेईल, अगर गोंगलगाय आगगाडीच्या वेगानें जाईल असें मानण्यासारखें आहे आम्हास तर स्वप्नींही अशी गोष्ट होण्याचा संभव दिसत नाहीं. इंग्रजी राज्य नको होतें, इंग्रजांच्या धर्माचा, मतांचा, तमजुतींचा कार तर कायपणत्यांच्या शरीराच्या रंगाचा व पोषाखाचाही येथील लोक तिटकारा करीत होते तेव्हां देखील अशा कायद्याची गरज पडली नाहीं. मग आतां कोठून पडणार. तेव्हां एकंदरीत पाहिलें असतां हें कलम घालण्याचें कांहीं प्रयोजन आहे अगर त्यापासून कांहीं फायदा आहे असें नाहीं. उलटी नुकसानें मात्र अनेक प्रकारचीं आहेत. लिहिण्याचें व बोलण्याचें स्वातंत्र्य हें जें माणीक तें माशानें गिळून टाकलें असें होण्याचा संभव आहे; कारण सरकारच्या विरुद्ध भषण केलें म्हणजे लागलीच तें ह्या कलमांत येतें असें नाहीं पण हें कलम असें आहे कीं, एकाद्या मॅजिस्ट्रेटाच्या मनांत सरकारच्या विरुद्ध कोणतेंही भाषण त्यांत आणण्याचें असेल तर त्यास तें आणतां येईल बरें इतकें कदनही त्यानें दिलेली शिक्षा पुढें कायम राहीलच असें नाहीं हें खरें, पण विषाची परीक्षा पहावी कोणी. ह्या न्यायानें सरकारच्या विरुद्ध म्हणून बोलणें अगर लिहिणें आपोआप बंद होण्याचा संभव आहे याकरितां आम्ही आशा करितों कीं, असले श्राप आमचें कलकत्याचें कौन्सिल अगर स्टीफन् साहेब न घेवोत. ज्ञा. प.

कायद्याची घडामोड.

आमच्या इंग्रजी राज्याचे कार्कीर्दींत जितक्या जलदीनें कायदे नवे होत आहेत त्याच प्रमाणें झालेल्यांत कमजास्त रद्द होत आहे; आणि कांहीं तर सर्वथैव लयास जात आहेत. कोणत्या नव्या कायद्यानें कोणतें जुनें कायदे सर्व अथवा अंशतः रद्द झालें अथवा निरुपयोगी झाले हे पाहण्याबद्दल हिंदुस्थानच लेजिस्लेटिव कौन्सिलाचा एक सेक्रेटरी नेहेमीं लागलेलाच आहे; दरएक कायदा नवा घडते वेळेस जितक जुन कायदे किंवा कलमें रद्द करण्यांत येतात तीं त्याच कायद्यांत स्पष्ट रीतीनें रद्द करण्याचा शिस्त आहे. परंतु आमचे कायदेकारांचा प्रसंगीं इतका झपाटा चालतो, कीं त्यांचे कायद्यानें परंपरेनें किंवा वस्तुतः जुनें किती कायदे ठोठे पांगळे केले जातात किंवा ठार केले जातात याचा बरोबर त्यावेळेस थांग लागत नाहीं. आणि याच कारणाकरितां सर्वांशीं किंवा अंशतः व्यर्थ झालेले कायदे फक्त झाडून टाकण्याकरितां कायदे कौन्सिलास हल्लीं केरसुणी घ्यावी लागते. व्यर्थ झालेले कायद्यांचें प्रमाण केवढें आहे, हें फक्त आक्टांची किंवा कलमांची रद्दी करण्याकरितां आलीकडे किती वारंवार स्वतंत्र कायदे करण्याची जरुर पडत आहे याचा विचार केला म्हणजे समजेल. चालू वर्षांचे दोन तृतीयांश गेले नाहींत तों अशा प्रकारचे दोन कायदे झाले म्हटलें पाहिजे. १८७० चा आक्ट १४ मागील एप्रिलांत पास झाला; त्यांत दोन शें आक्ट किंवा कायदे सर्व किंवा अंशतः रद्द झाले. यास चार महिने लोटण्यापूर्वीच आणखी एक रद्दी करणारा नवीन आक्ट कायदे कौन्सिलांत घडण्यास आरंभ झाला आहे यांत एकशें छत्तीस कायद्यांत कमजास्त होत आहे. शिवाय हें ध्यानांत ठेविलें पाहिजे, कीं चालूसालांत झालेल्या दरएक नव्या आक्टानें अनेक जुन्या कायद्यांत पुष्कळ रद्दी केलेली आहेच. शिवाय नवीन आक्टाचे खर्डे कौन्सिलासमूर अनेक आहेत. त्यांतील दोन मुख्य येणें प्रमाणें:—(१) हायकोर्टांवांचून दुसऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास "युरोपियन ब्रिटिश सबजेक्ट" याचा फौजदारी न्याय करण्याचा अधिकार नाहीं व ठिक ठिकाणचे सरकारास अशा विरुद्ध कायदे करण्याचा अधिकार नाहीं. अशाबाबे मुंबई हायकोर्टानें थोड्या दिवसांपूर्वीं ठराव केला आहे त्याविरुद्ध म्हणजे आज तागायत बेकायदा झालेली वहिवाट कायम करण्याकरितां व वरील अधिकार ठिक ठिकाणचे सरकारास देण्याबद्दल; व [२] इंडियन पीनलकोड यांत कमजास्त करण्याकरितां. ता० १६ आगष्ट रोजीं कच्चे आक्ट व्हाइसराय यांचे कौन्सिलापुढें आणिलेले आहेत. त्यांतील सविस्तर मतलब अजून समजलेला नाहीं. ने. बो.

वऱ्हाड.

देऊळगावराजा—(मित्राकडून) ता. १५ सप्तंबर. या मेहकर तालुक्यांत कांहीं दिवसांपासून एक नवीन रोग उद्भवला आहे. ह्या रोगाचीं सर्व लक्षणें व चिन्हें महामारी बाई साहेबांचेच लक्षणाप्रमाणें व चिन्हाप्रमाणें असतात, म्हणजे प्रथम ढाळ होणें नंतर ओकणें व सर्व शरीर शिथील होणें इत्यादि प्रकार सर्वच होतात. परंतु मनुष्य मरत नाहीं इतकेंच याचे व त्याचें अंतर आहे बाकीचीं सर्व साम्यता आहे. या रोगाचें नांव इकडील लोकांनीं "हुंदाडा" असें ठेविलें आहे आणि खरोखरच हें नांवही त्या रोगास लाजत आहे. ह्या हुंदाडा महाराजांची स्वारी या प्रांतीं आलेदिवसांपासून पुष्कळ गांवीं बहुत लोक आजारी झाले व बेर झाले आहेत. हा रोग कोणते कारणानें उत्पन्न झाला याजबद्दल सानिटरी कमिशनर वगैरे लोक विचार करून यास नाहींसे करण्याचे प्रयत्न करतील तर बरें होईल. याचे सपाट्यांत आलेल्या माणसांस पुन्हा शरीरीं शक्ति येण्यास सहा महिने लागतात.

वऱ्हाडप्रांताचे मुख्य पोलिस अधिकारी मे० मिलेट साहेब हे बिलायतेहून इकडे येण्याकरितां गेले महिन्याचे २७ वे तारखेस निघाले ते बहुधा दोन चार दिवसांत या प्रांतीं येऊन दाखल होतील. हे साहेब स्वभावानें फारच चांगले व दयाळु असल्याकारणानें यांचे येण्यापासून पोलिसचे लोकांस फारच आनंद होत आहे.

उमरावती जिल्ह्यांतील कारंजे तालुक्याचे पोलिस इन्स्पेक्टर रा. बाळाप्रसाद हे इलिचपुरास गेले आहेत याचें कारण असें समजतें कीं धनज येथें एक खून झाला त्या प्रकरणांत सदरहू इन्स्पेक्टर व गोविंदराव चीफका० या उभयतांनीं लांच खाऊन आरोपी चैनीराम थिरपाल मारवाडी याचा बचाव करून खून झाला नाहीं असें सिध्द केलें असा पत्ता मिस्तर चौथमल पोलिस इन्स्पेक्टर यांस मिळून त्यांनीं सरकारास रिपोर्ट केल्यावरून तपासास आरंभ होऊन इलिचपुरास बाळाप्रसाद व वऱ्हाडास गोविंदराव चीफ असे उभयतांस पाठवून दिलें आहे. या वर्षांतच पोलिस लोकांचे पापाचे कलश परिपूर्ण झाले आहेत असें वाटतें.

अकोट स्टेशनचा अगंत रामचंद्र हेड क्लार्क यानें तारीख ३ रोजीं आपले हातानें च बंदुकीची गोळी मारून घेतली पण ती दैवयोगानें चुकली. हे हेडक्लार्क इकडून बांचले खरे पण तिकडे पिनलकोडाचे ३०९ कलमाचे तडाख्यांत सांपडून तीन महिनेपर्यंत न्यायमंदिरांत वास कर्ण्यास तूर्त गेले.

बुलढाणें जिल्ह्यांत कामदार लोकांनीं श्री बाळाजीहेब संस्थान देऊळगाव येथील पैसा खाल्याबद्दल मुकदमा चालू आहे निकाल अजून झाला नाहीं.

उमरावतील जिल्ह्याची सेडिंग ठ्यांक येत्या सोमवार पासून चालू होणार. हिंज मध्यें पाहिजे त्या मनुष्यानें येक रुपयापासून ५०० रुपये पावेतों येक वर्षांत आनामत ठेवावी. दरमाहा दर शेकडा पाच आण्याचें व्याज मिळेल. तीन हजारावरें रकम गेली म्हणजे व्याज मिळणार नाहीं रकम पाहिजे तेव्हां परत मिळेल ब्यांकेचें काम दर सोमवारीं दोन वाजेपर्यंत चालेल ह्मणून वगैरे जाहिरनामा प्रसिद्ध झाला आहे.

उमरावतीचे डिपुटि कमिशनरचे आफिसांत ही आकोल्या प्रमाणेंच जुडिशियल शिरस्तेदार मोडून ७० रुपयांचा डिपुटी क्लार्क करून रेविन्युशिरस्ते दाराला १५० रुपये पगार व क्लार्क आफ धि कोर्ट हा हुद्दा देण्याचा निश्चय झाला व ७० रुपयांची जागा रा. व्यंकटराव यांस दिली.

अकोला

असें ऐकण्यांत आलें आहे कीं लश्करी खात्याकडून दोन आडीच लक्ष रुपये खर्च होऊन एथें रेलवे स्टेशना शेजारीं मोठ्या सुशोभित उंच बराका तयार झाल्या आहेत त्या बांधण्यांत चूक झाली असे सरकारास आतां समजलें आहे. ती चूक कोणती म्हणाल तर त्या बांधावयाच्या न व्हत्या ही कारण जबलपुराकडील रेलवे सुरू झाल्यानें भुसावळेवरून त्यामार्गानें पर भारें लश्करें येतील व जातील. इकडून लश्करें येण्याचा संसर्ग आतां राहिला नाहीं. म्हणून त्या इंग्रज सरकारास नको आहेत. व पैसे तर खर्च होऊन चुकले आहेत तेव्हा हल्लीं असा बूट काढला आहे कीं अकोल्यास निदाखात्याकडे, स्यानिटरी खात्याकडे, इंजिनियर खात्याकडे, इरिगेशन खात्याकडे वगैरे आफिसें पाहिजे आहेत त्यांच्या उपयोगास या बराका द्याव्या व त्यांचे बांधण्यास लागलेले रुपये निजाम सरकारातून द्यावे. वा: चूक सुधारण्याची खरशी युक्ती निघाली! याचें नांव शहाणपण व कौशल्य!

या आठवड्यांत एक दोन दिवस चांगला पाऊस पडला. नदीला तर पूर येऊन तीनचार दिवस पाणी अधिक होतें. आता पुन्हा हवा थंड आणि रमणीय अशी झाली आहे.

मि० आयझट साहेब एक्झिक्युटीव इंजिनियर यांस कलबुर्गाकडील स्टेट रेलवेकडे नेमिल्याचें कळतें.

वर्तमानसार.

मुंबईचे एक पारशी गृहस्थ मि. आरदेसर होरमसजी यांनीं विलायतेंतील हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी यांजवर मुंबईचे हायकोर्टांत फिर्याद केली होती कीं, कुरला एथें आमची १३९८७ यार्ड जमीन असलेली सन १८५७ चा आक्ट ६ अन्वयें मुंबई सरकाकारानें ग्यांझेटांत नोटिस देऊन रेलवे करितां आम्हापासून घेतली. व तिच्या मोबदला रुपये ५८२७८ आम्हांस देण्याविषयीं तीन पंचाचा बहुमतानें निवाडा झालेला असतां अजून रुपये दिले नाहींत ते व्याजसुध्दां देवविणे.

हायकोर्टानें सात मुद्दे काढिले त्यांत पंचाचा योग्य निवाडा झाला आहे कीं काय हा पहिला मुद्दा होता व तो साबीत झाला नाहीं. दोन पक्षकारांच्या तर्फे दोन पंच नेमिले होते. व तत्र १८५७ च्या ६ व्या आक्टाच्या १२ व्या कलमाप्रमाणें त्या दोघांनीं तिसरा पंच नेमिला पाहिजे होता, तसें झालें नाहीं. वादी तर्फेच्या एकट्या पंचानें पत्र लिहून तिसरे पंचाची नेमणूक केली. व तो सदरहु पंचाइतीचें काम चालले त्या त्या वेळीं हजर नव्हता सबब पंचाचा निवाडा कायदेशीर नाहीं असें ठरवून आनरबल मि० जस्टिस बेली साहेबांनीं प्रतिवादीतर्फे खर्चसुध्दां निवाडा दिला.

मोंगलाई पैकीं ११ गाव नागाईताचे संबंधानें सोलापुराकडे दिले.

खानदेशांतील दंगा अजून मिटला नाहीं. तिकडील लोक परकी लोकांवर बेदील झाले आहेत. नांकीन येथील फ्रेंचाचा व्हाईसराय यास ठार मारण्याचा कट झाला होता. परंतु तो वाचला. तथापि मृत्यु पंथांतच आहे. फ्रेंचाचे मिनिस्टरांनीं नि

श्चय केला आहे कीं ९ दिवसांचे आंत म ख्य अपराधी आणून दिला नाहीं तर त्याव र चाल करावयाची.

गव नर जनरल साहेबांची स्वारी आग्टो, दर म हिन्यांत सिमल्याहून निघून अंबाला मुत्रा, भरतपुर, जयपुर, अजमीर, नाशिराबा द, आग्रा, प्रयाग आणि काशी इतक्या ठि काणीं जाऊन नोवेंबरचे ७ वे तारखेस क लकत्यास परत जाईल असें समजलें आहे.

हिंदुस्थानच्या सिविलसर्व्हिसची परीक्षा सन १८७१च्या मार्च महिन्याच्या २८ वे तारखेस विलायतेंत लंडनशहरीं होणार तिचे जाहिरनामे छपून प्रसिध्द झाले आहेत.

पुढील वर्षाचे हिवाळ्यांत हिंदुस्थान सरकार म्हणजे गवरनर जनरल स ह पु ण्याची हवा पहण्याकरितां आसिलास वर्तमान येणार अशी बातमी आहे.

मुलींचे न मॅलस्कूल पुण्यास आणण्याचा ठराव झाला आबरहुकूम जाउनये म्हणून गवरनर साहेबांकडे एक अर्ज झाला आहे व त्याजवर शिक्षकीच कामकरणाऱ्या १९ स्त्रियांच्या सह्या आहेत.

करसनदास माधवदास मुंबईचे येक प्रसिध्द सावकार यांनीं ६०००० रुपयां ची एक दगाबाजी केल्याचा थांजवर आरो प येऊन यांत ३ वर्षे सक्तमजूरी कैदेची शिक्षा झाली.

हिंदुस्थानच्या लोकांनीं विलायतेस सि विल सरवीसच्या परीक्षेस जातांना योग्य वय असल्याविषयीं इलाख्याच्या सरकार चा दाखला नेत जावा असा ठराव झाला.

मेक्यानिकल म्हणजे यंत्रसंबंधी शाळा मुंबईस आहे तिला सरकारातून दरमहा ३५० रुपयांची नेमणूक होती ती बंद झाली.

साळी पासून तांदूळ निराळे करण्याचें व त्यांचे कूट न होऊ देतां उत्तम रितीनें सडण्याचें अमेरिकेतलि एक कारागिरानें एक उत्तम यंत्र तयार केलें आहे. व स्टेट सेक्रटरीनीं मागवण्यासाठीं एक यंत्र हिंदुस्था नांत पाठविण्याचा विच्यार केला आहे. याची किंमत ३०० रुपये आहे.

येका युरोपियनानें मुंबईस बीभत्स चित्रें विकावयास मांडिलीं होतीं त्याकरितां त्यास १५० रुपये दंड झाला.

धुळें—या आठवड्यांत मेघराजानें लोकांचे करुणाशब्द श्रवण] करून त्यावर अमृतवृ ष्टि करण्यास सुरुवात केली आहे. तारीख १२ रोजीं आकाशमेघानें आच्छादित हो ऊन नारानर एक वाजल्यानंतर अर्ध ता स पर्यंत थोडासा पर्जन्य पडला. त्या दिवसा पासून दररोज थोडा बहुत पडत आहे. आ जरोजीं घातल्या अवडंबरा वरून मो ठा पर्जन्य पडेल असें चिन्ह दिसत आहे. या आठवड्यांत ऊष्मा इतका होत आहे कीं, त्यापासून केवळ चैत्र वैशाखाप्रमाणें लोकांस भास होऊं लागला. तथापि त्या उ ष्याचें फळ लोकांस लौकरच मिळेल असें आज सुचिन्ह दिसत आहे. यावर मेघराज काय करतील तें खरें. भरपूर पर्जन्य पडेल तरच मागाहून बाजऱ्या येतील. उत्तरा नक्ष त्राचे पर्जन्याची इकडे अवश्यकता असते. बाजार भावांत मागील आठवड्यापेक्षां १ रुपया दर ज्यास्त झाला आहे. शहरां त महालय श्राद्धाची गर्दी होऊन राहिली आहे भिक्षुक लोकांचा दररोज २।२ आण दर वाढत आहे. ज्वराचा व वायुचा आ जार सुरू आहे. कपाशीच्या मंदीमुळें सर्व व्यापारास मंदी आली आहे.

तळोद्याचे अवल कारकून पांडुरंग हण मंत यांनीं आपले कामाचा राजिनामा दि ला सबब त्यांचे जागेवर हुजूरांकिल पांडुरं ग दिनकर यांस अवल कारकून नेमिलें.

खा. वै.

पोलिस खात्यांत नायकांची योजना.—लोकांस समजून देतां बारीक रीतीनें आंतून शोध करण्याच्या कामांत मध्य प्रांतां त कांहीं ठिकाणीं व बंगाल इलाख्यांतही नायकांस डिटेक्टिव पोलिस नेमलें. त्यामुळें किसेक गुन्ह्याचा चांगला शोध लागला असें समजतें.

कोल्हापुरचे राजे साहेब—येत्या नोवेंबर महिन्यांत कोल्हापुरचे महाराज विलायतेहून परत येतील असें आम्ही ऐकलों.

मुंबईत दररोज निघणारें नवीन वर्तमा नपत्र.—मुंबईत इंग्रजी दोन दररोज निघ णारीं वर्तमानपत्रें होतीं तीं आतां या महि न्याच्या पहिल्या तारखेपासून तीन झालीं. याचे नांव स्टार आफ इंडिया असें आहे. या पत्राची किंमत फारच कमी ठेविली आ हे. वर्षाचे अगाऊ बीस रुपये आहे खेरीज टपालखर्च बीस रुपये. या पत्राचा साचा इं ग्रजप्रकाश पत्राएवढा आहे. हें पत्र सुरळीत चांगलें व निरंतर चालेल अशी आम्ही आ शा करतों. हिं. रि.

सातारा—परवां पासून थोडा थोडा पाऊस केव्हांकेव्हां पडत होता परंतु काल पासून तो चांगला पडत आहे, येणेकरून आतां पिकें टवटवीत दिसावयास लागून सर्वत्रांस आ नंद झाला आहे.

बेळगावचे कलेक्टर मे. ग्रे साहेब यां ची स्वारी पुण्याहून येथें येऊन पुढें बेळगा वांकडे गेली.

श्रीमंत जाहगिरदार साहेब संस्थान क लटण यांची स्वारी आपले चिरंजिवासह ये थें आली आहे. शु. सू.

नासिक—घोटीकर बगंभट यांची वि धवा कन्या गंगा इनें मि० नरसिंग अप्पा सं गापा इगतपुरी तालुक्याचे मामलेदार य जवर अब्रु घेतल्याबद्दल केलेला अर्ज मे० मेकंझी यांनीं घेण्याचें नाकबूल केल्यावरून गंगानें अपील करून सदरहू अर्ज फैसल क रावा म्हणून जजाचा हुकूम मिळविला हो ता त्याप्रमाणें मे. मेकंझी साहेबांनीं तो अ र्ज फैलावर घेऊन रितिप्रमाणें चौकशी क रून रद्द केला.

रा. रा. लक्ष्मण मोरोळ निफाड तालु क्याचे मामलेदार यांस ता० १३ मंगळवा रीं देवाज्ञा झाली.

कोणे एका ब्राम्हणाचे स्त्रीचा प्रेत संस्का र तीन असामींनीं गुप्त रितीनें केल्याचा पुकारा झाला होता असें आमचें मागील अंकांत लिहिलें होतें. आजनवळ हल्लीं असें समजतें कीं ती बाई तिघांमध्यें गणपत राव पाबगे यांचे घरीं मेली असून तिला च्यार मनुष्यांनीं रीतिप्रमाणें दहन क ली. मयत इनें आपल्या निसर्गाबद्दल मृत्यु पत्र करून ठेविलें आहे. उठलेली लोकवा र्ता निराधार आहे.

मे. चपाटफिल्ड साहेब आठ दिवसांपा सून येथेंच आहेत. इंग्रजी शाळेस मराठी शाळेकरितां होत असलेली जागा दिली मराठिशाळा कोठे जाते पाहावें. ज्ञा. मं.

नोटिसा.

नोटिस—रा० हरि भास्कर टिळक ज्ञान मंदारकर्ते मु० नाशिक यांस दे ण्यांत येतें कीं तुमचेकडे जून व जुलई महिन्याचे वऱ्हाड रिपोर्टर पुस्तकाचे मसुदे छापावयास पाठवून ३॥ महिने झाले. तुम चा करार प्रत्येक बूक मसुदा पाचल्यापासू न बारादिवसांत पावतें करित जाऊ अ सा आहे. त्यास इतके दिवस बूक न निघाल्यामुळें जें कांहीं आमचें पैशाचें नुक सान झालें व बुकाचे संबंधानें बदनामी झाली त्याबविषयीं आपल्यावर फिर्याद के ली जाईल. आतां जून महिन्याचें बूक तयार झालें असल्यास तें. किंवा तयार न सल्यास जून व जुलईचे मसुदे ८ दिवसांचे आंत परतें पाठवावे. कळावें ता० २३ माहे सपटंबर सन १८७० इसवी.

[सही] देवराव विनायक वकील
वऱ्हाड रिपोर्टरचे
म्यानेजर.

नोटिस—मारुत्या वलद बिंदनाक महा र राहणार देऊळगावमाळी तालु के मेहकर यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमकडे मुद ल रुपये २४।- व व्याज रुपये १७ येणें तसाच कापूस २ मण मेहकरमापी सन १२७८ सालचा येणें तो दिंडीसुद्धां ही नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांत पाठवा वा. तसें न केल्यास तुमचर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून व माल जप्त करून रुप ये घेऊं. कळावें तारीख २१ सपटंबर सन १८७० इ.

(सही) सुरजमल दौलतराम सा हू दुकान देऊळगावमाळी.

नोटिस मारुती वलद महादजी पोरे राह णार बाभूळखेडे तालुके मेहकर यास खालीं सही करणाराकडून नोटिस दे ण्यांत येते कीं तुमकडे कापूस ७॥ मण मेहकरमापी सन १२७२ सालचा येणें तो दिंडीसुद्धां नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांत द्यावा तसें न केल्यास तुमचर दि वाणी कोर्टांत फिर्याद करून व माल जप्त करून रुपये घेऊं. कळावें तारीख २१ माहे सपटंबर सन १८७० इसवी.

सही) सुरजमल दौलतराम साहू
दुकान देऊळगावमाळी

नोटिस तुळजाजी तुपकर छोटा राहणार गुंज परगणे खळकें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमकडे ज्वारी मेहकरमापी ५ पाय ल्या येणें तिला दाहा वर्षे झालीं तरी दिंडी सुद्धां आठ दिवसांत आणून द्यावी. नाहीं पेक्षां तुमचर दिवाणी कोर्टांत फिर्याद क रून व माल जप्त करून रुपये घेऊं कळावें तारीख २१ सप्तंबर सन १८७० इ.

(सही] सुरजमल दौलतराम साहु
दुकान देऊळगावमाळी

नोटिस—दत्ताजी वल्द मल्हारजी सूर्य वंशी राहणार देऊळगावमाळी तालु के मेहकर यांस खालीं सही करणार यांज कडून देण्यांत येते कीं तुम्हांकडून मुद्दल रुपये ९३।- व व्याज रुपये २५॥ यावया चे ते ही नोटिस पोचल्यापासून ८ दिवसां चे आंत द्यावें. नाहींपेक्षां तुम्हावर फिर्याद केली जाईल. व माल जप्त करून रुपये घे तले जातील. कळावें तारीख २१ सप्टंबर सन १८७० इ.

(सही) सुरजमल दौलतराम साहू
दुकान देऊळगावमाळी.

नोटिस—दनु वलद राघोजी गारोळे र हणार सायाळें तालुके मेहकर यास खालीं सही करणाराकडून नोटिस दे ण्यांत येते कीं तुम्हाकडे मेहकरमापी ३ पा यल्या गहू सन १२७१ सालचे येणें ते दिंडीसुध्दां ८ दिवसांत द्यावें न दिल्यास तुम्हावर फिर्याद करून व माल जप्त करून रुपये घेतले जातील. कळावें तारीख २१ माहे सप्तंबर सन १८७० इ.

(सही) सुरजमल दौलतराम साहू
दुकान देऊळगाव माळी.

नोटिस—नंदाजी वलद बेसाजी गारोळे राहणार वरोडे तालुके मेहकर यास खालीं सही करणाराकडून नोटिस दे ण्यांत येते कीं, तुम्हाकडे आमचे मुद्दल ६ रुपये शिके सुरती येणें व त्याचे व्याज ७ रुपये मिळून तेरा रुपये ही नोटिस पो चल्यापासून ८ दिवसांत द्यावे. न दि ल्यास तुमचर फिर्याद करून व माल जप्त करून रुपये घेतले जातील. कळावें तारीख २१ माहे सप्तंबर सन १८७० इसवी.

(सही) सुरजमल दौलतराम साहू
दुकान देऊळगावमाळी

नोटिस—रेवजी वलद सुकोजी तुपकर राहणार सौंगी थोकयाची तालु के मेहकर यास खालीं सही करणाराकडू न नोटिस देण्यांत येते कीं तुमकडे जवा री एक मण चवदा पायल्या मेहकरमापी यावयाची व रुपये २६ यावयाचे ते ही नोटिस पोचल्यापासून आठ दिवसांत द्यावे न दिल्यास तुमचर दिवाणी कोर्टांत फि र्याद करून व माल जप्त करून रुपये घे तले जातील कळावें ता० २१ माहे सपटंबर सन १८७० इ.

(सही) सुरजमल दौलतराम साहू
दुकान देऊळगांवमाळी.

नोटिस—नारायणजी वलद तिमाजी भ गत राहणार कवाळें तालुके मेहक र यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हाकडे कापसाबद्दल रु० ४० व जवारीबद्दल १२ मिळून ५२ रुपये आज मितीस यावयाचे ते आठ दि वसांत द्यावे न दिल्यास तुम्हावर दिवा णींत फिर्याद करून व माल जप्त करून रुप ये घेऊ कळावें तारीख २१ माहे सपटंबर सन १८७० इ.

(सही) सुरजमल दौलतराम साहू
दुकान देऊळगावमाळी.

नोटिस—सदाशिव वलद भिकाजी पंचा ळ राहणार चायगांव तालुके मेहक र यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुम्हांकडे ज्वारी एक मण मेहकरमापी सन १२७२ सालची येणें त्यांत ६ पायली वसूल आला. बाकी दि ढी सुद्धां सर्व ज्वारी ८ दिवसांत आणून द्यावी. न दिल्यास तुम्हांवर दिवाणी कोर्टां त फिर्याद करून व माल जप्त करून रुपये घेऊ. कळावें. तारीख २१ माहे सपटंबर सन १८७० इ.

(सही) सुरजमल दौलतराम साहू
दुकान देऊळगाव माळी.

नोटिस—जान्या वल्लद असदनाक महार राहणार देऊळगावमाळी तालुके मेहकर यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं तुजकडे उवारी ९ पायली मेहकरमापी, कापूस ५ पासऱ्या व गवताबद्दल रुपये २ सन १२७२ साल्चे येणें ते अजून दिले नाहीं तर दिडीसुध्धां सर्व हिशेब ८ दिवसांत चुकता करावा. न केल्यास तुजवर फिर्याद करून माल जप्त करून रुपये घेतले जातील. कळावें तारीख २१ माहे सप्तंबर सन १८७० इसवी.

(सही) सुरजमल दौलतराम साहू
दुकान देऊळगावमाळी.

नोटिस—भिऱ्या व शिऱ्या महार रहाणार देऊळगांवमाळी तालुके मेहकर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हांकडे घेणें पुदल रुपये नउ व सवाअकरा त्यांत वसूल आठ व दहा रुपये दिलात बाकी राहिलेली रक्कम व व्याज साडेबारा रुपयेतशीच तुम्हाकडे जवोरा ९ पायल्या मेहकर मापी सन १२७४ साल्चीं येणें व गहू एक पायली येणें त्याची दिडीसुध्धां सर्व रकमेचा उलगडा नोटिस पोचल्यापासून आठ दिवसांत करावा. न केल्यास दिवाणींत फिर्याद करून माल जप्त करून रुपये घेतले जातील. कळावें ता० २१ माहे सप्टंबर सन १८७० इ०

(सही) सुरजमल दौलतराम साहू
दुकान देऊळगांव माळी.

नोटिस—सदाशिव वल्लद महादाजी चे राहणार शेंदुरजण यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हांकडे उवारी मण ३॥. व कापूस मण १२ मेहेकर मापी सन १२७२ साल्चा येणें तो ही नोटिस पोचल्यापासून दिडी सुध्धां ८ दिवसांत पाठवावा. नाहीं पेक्षां तुम्हावर फिर्याद करून माल जप्त करून रुपये घेतले जातील. कळावें तारीख २१ माहे सप्तंबर सन १८७० इ.

(सही) सुरजमल दौलतराम साहू
दुकान देऊळगांव माळी.

नोटिस दुरुस्ती.

रामचंद्र विश्वनाथ डांगे मु० मौजे पळसदेव यास कळावें कीं तुम्हास ता० १३ आगष्ट सनमजकुरचे वऱ्हाड समाचारपत्रात नोटिस दिली आहे तिचे पांचवे ओळींत सर्व नंबर "१६" असा अंक पडला आहे तो चुकीचा आहे त्याठिकाणीं "१३" हा नंबर समजावा. व सदर ता रखेच्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें जलद व जरूर तजवीज करावी. कळावें तारीख २१ सप्टंबर सन १८७० इसवी.

(सही) विठ्ठल आत्माराम डांगे मु०
देऊळगावराजा.

नोटिस—निरदीचंद धनसुखदास मारवडी वस्ती उकळी तालुके जळगाव यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं तुम्ही आम्हापासून सरकी खंडी ९० घेण्याचा सवदा करून त्या पैकीं ४६ खंडी घेऊन गेला बाकी ४ खंडी नेली नसून नेले सरकीचे किमतीबद्दल रुपये ही दिले नाहींत सबब ही नोटिस देण्यांत येते कीं आमपासून ८ दिवसांत ९० खंडी सरकीबद्दल रुपये २६२८८ आणून देऊन बाकी राहिलेली सरकी न्यावी. वरील मुदतींत रुपये आणून देऊन सरकी न नेल्यास तुम्हावर दावा करण्यांत येईल कळावें तारीख २० मो सप्तंबर सन १८७०

(सही) कोंडजी वल्लद परसाजी
राहणार देऊळगावमाळी
याचे हातची निशाणी.

नोटिस—गिरधारीलाल सुरजमल दुकान केळींबळी परगणे दाहिहडा तालुके आकोट यास नोटिस देण्यांत येते कीं आमचे दुकानचीबाकी ऐन रुपये ९४॥=सिवाय व्याज २३॥— एकुण रुपये ११८८= नोटिस पावताच चुकते करून द्यावे. न दिल्यास आम्ही कोर्टांत नालीश करूं. नोटिसीचा खर्च तुम्हांस द्यावा लागेल कळावें तारीख २१ माहे सप्टंबर सन १८७० इसवी

(सही) जोरावरमल गंगाधर साहू
दुकान आकोटें.

नोटिस—देवजी वल्लद जानजी ठाकूर राहणार उमरण तालुक मेहकर यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हाकडे उवारी दीड मण मेहकर मापी येणें त्यास दहा वर्षे झालीं तर दिडीसुध्धां आठ दिवसांत आणून द्यावी. न दिल्यास तुम्हांवर फिर्याद करून माल जप्त करून रुपये घेऊं कळावें ता० २१ माहे सप्टंबर सन १८७० इसवी

(सही) जानजी येसाजी पाटील
देऊळगाव माळी.

नोटिस—नारायणजी वल्लद संताजी राहणार गडाळें तालुके मेहकर यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हांकडे आम्ही दोन खंडी तेरा मण पंधरा पायली गहू तुमचे कोठारांत ठेविले होते. त्यापैकीं तेरामण पंधरा पायल्या गहू जळाले असें तुम्हीं सांगितलें. व राहिलेले गहू दोन खंडी तुम्ही लोकास दिले त्यास साक्षीदार १ रामजी बोरे, १ महादजी सांवत, १ कृष्णाजी ढेपे वगैरे आहेत व या गोष्टीस दहा वर्षे झालीं तर दिडीसुध्धां आमचे गहू आठ दिवसांत आणून द्यावे. असें न कराल तर तुम्हांवर दिवाणींत फिर्याद करूं व तुमचा माल जप्त करून रुपये घेऊं. कळावें तारीख २१ माहे सप्तंबर सन १८७० इसवी.

(सही) नामजी येसाजी पाटील
देऊळगावमाळी.

नोटिस—लालू वल्लद मोहना डाहारा राहणार देऊळगावमाळी तालुके मेहकर यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हाकडे मुद्दल रुपये ९। व व्याज दरमहा दरशेकडा दोन रुपयाप्रमाणें येणें त्यांत अडीच रुपये वसूल दिला. बाकी राहिलेले व्याजासुध्धां सर्व रुपये आठ दिवसांत आणून द्यावे. न दिल्यास तुम्हावर दिवाणींत फिर्याद करूं व तुमचा माल जप्त करून रुपये घेऊ. कळावें तारीख २१ माहे सप्तंबर सन १८७०इसवी.

(सही) लछमणदास रतनचंद साहू
वहिवाटदार द्वारकादास द. खु.

नोटिस—रानदारखां देऊळगांवकर हल्लीं वस्ती घोडेगाव तालुके आकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हांकडे माझे रुपये शाकतीबद्दल ६२२ व सेताबद्दल १२० व चिल्लर ३०० एकुण रुपये १०४२ घेणें असून तुम्ही देत नाहीं करिता नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही आज तारिखपासून पंधरादिवसांचे आंत माझा फैसला करून द्यावा अगर न दिल्यास सिरस्ते प्रमाणें योग्य कोर्टांत दाखल करून व्याज व खर्चसुध्धां रुपये घेण्यांत येतील कळावे तारीख २२ माहे सप्तंबर सन १८७० इसवी

[सही] मुरादबेग वल्लद इनायत बेग याचे हातची निशाणी.

नोटिस—सुनायतखां वल्लद महंबुबखां वस्ती घोडेगांव तालुके आकोट यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही माझा नौकर सेखबीराम याजला फंद देऊन आपले घरीं ठेऊन माझी रकम देईन म्हणून बबूक केले असून अद्याप पावेतों दिल्ही नाहीं करिता आज तारखेपासून पंधरा दिवसांचे आत तुम्हे माझे मनुष्यास माझे एथे नौकरीस पाठवून देणें अगर माझी रकम देणें अगर याप्रमाणें तुमचे कडून न झाल्यास शिरस्तेप्रमाणें फिर्याद करून खर्चासुध्धां रुपये भरून घेण्यांत येतील कळावें तारीख २२ माहे सप्तंबर सन १८७० इसवी.

(सही) मुरादबेग वल्लद इनायत बेग याचे हातची निशाणी.

नोटिस—रावजी वल्लद संभाजी भोजे मोकदम मौजे बलमंडळी परगणे कारंजे यास नागोजी वल्लद कान्होजी मोकदम मौजे हातोले परगणे पिंजर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमची मुलगी गुनाई इच्याशी तुमचा गंधर्व झाल्यास सुमारें १२ वर्षे झालीं. त्यांत ५ वर्षे तुम्हीं आमच्या मुलीचें पाळगृहण केलें परंतु आमकडे सात वर्षे तुम्हीं तिला घेऊन जात नाहीं व सारहाण करितां त्यावरून तुम्हांस या नोटिशीवरून कळवितों कीं तुम्ही १५ दिवसाचे आंत आमचे मुलीस घेऊन जावें व चांगल्याप्रकारें नांदवून बोभाटा येऊं देऊं नये. आणि तसें करण्याची तुमची खुशी नसेल तर तिच्या पोटापाण्याचा सात वर्षांचा पैसा दरसाल ५० रुपयेप्रमाणें रुपये ३५० देऊन सोडचिठी द्यावी. असें न कराल तर तुम्हांवर कायदेशीर तजवीज केली जाईल. कळावें तारीख २२ सप्तंबर सन १८७० इसवी.

(सही) नागोजी वल्लद कानोजी याचे हातची रेघ.

जाहिरखबर.

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं आमचा मुलगा मनू वल्लद लालचंद खत्री राहणार खामगाव हा चांगले प्रकारें वर्तत नसून बाईट चालीच्या लोकांच्या संगतीस लागला आहे व तेणेंकरून अयोग्य कामीं पैसे उधळतो सबब आम्ही त्यास पैसे देणें मना केलें आहे व दुसरे इतर लोकांनींही याजपर त्यास बिलकूल पैसा देऊं नये असें आमचें त्यांस सांगणें आहे. इतकेपाउपर कोणी दिल्यास त्याचे जबाबदार आम्ही होणार नाहीं व तो त्याचा पैसा बुडेल असें समजावें. तारीख २१ सप्तंबर सन १८७० इसवी.

(सही) लालचंद वल्लद भारमल खत्री.

जाहिरात.

किमतीचे ठराव.	रु.	आ.
वर्षाची आगाऊ देणारास... ...	६	
साल अखेर	७	
सहा महिन्याची आगाऊ	३	८
एक अंकास		१

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे १२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पहिले तो ३ रु. ४ आणे व सालअखेर १ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईतेपून २ महिन्यांची मुदत समजावी.

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस . १८६
इंग्लिश नोटिसींचे दर ओळीस ८ ४

एकच मजकूर नांवांवर छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible their subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

Proprietors of Berar Samachar

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास तीन वर्षे झालीं वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं

वऱ्हाडसमाचाराचे मालक

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं आजबद्दलची व मागील गुदरून गेल्यासाला बद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहादररुपयास अर्धे आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालककरितां छापून प्र. केलें.